**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675,Issue NO, 278 (CCLXXVIII) D
ISSN : 2278-9308
March, 2021

# DEPRESSION- INDUCED PROBLEM FOR SPORTS MAN AND THEIR REMEDIES

Dr. Avinash L Titarmare
ShriLemdeo Patil Mahavidyalaya, Mandhal, Dist. Nagpur
Email Id:-avinashltitarmare@gmail.com

सारांश **(Abstract)**:–

आपल्या देशामध्ये वेगवेगळया पातळीवर विविध क्रीडा स्पर्धा खेळल्या जातात खेळाचा स्तर, खेळाचे महत्व व खेळाडूची मानसिक स्थिती, खेळांमध्ये लागणारे निर्णय, त्यातही अधिकाऱ्याकडून कधीकधी चुकीच्या निर्णयामुळे खेळाला मिळालेली कलाटणी अशा कोणत्याही स्थानिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय सांघीक व व्यक्तिगत क्रीडा स्पर्धा मध्ये एक जिकंतो तर दुसरा पराभूत होत असतो. हारल्यानंतर प्रत्येक खेळाडूमध्ये वेगवेगळया प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त होत असते. काही खेळाडू राग व्यक्त करून स्वत:ला दोष देतात काही खेळाडूंचा राग एवढा अनावर होतो की विरोधी संघातील खेळाडूना अपशब्द व अर्वाच्य शब्दात टोमणे मारतात किंवा शिव्याची लाखोली वाहताततर काही खेळाडू अधिकारी, पंचांना दोष देतात तर काहींचा सामना हरल्यानंतर स्वत:च्या मनावर ताबा राहात नसल्यामुळे मैदानावर किंवा मैदानाच्या बाहेर शब्दांशब्दांनी वाद वाढून मारामारी पर्यत प्रकरण येत असते. एवढेच नव्हे काहींची मजल आत्महत्या पर्यंत गेली आहे .तर काही खेळाडू एकदम सामान्य प्रतिक्रिया व्यक्त करतात कारण अशा प्रकारचा पराभव ते सहजतेने घेतात किंवा फारच कमी मनाला लावून घेतात. त्यांना पराभवामुळे फारसा फरक पडत नाही कारण हया बाबीकडे ते व्यक्तीगत रूपाने फार कमी प्रमाणात पाहतात. काही खेळाडू असेही असतात की जे हारल्यानंतरही प्रसन्नचित्त मुद्रेत दिसतात, कारण खेळत असतांना त्यांचा व्यक्तीगत प्रदर्शन फारच चांगला झालेला असतो परंतु संघ हारलेला असतो. हयामुळे त्याच्यात निराशा उत्पन्न झाली नसते. बहुतेक वेळेला तर संघ हारल्यानंतरही खेळाडू मात्र आंनदी दिसतो कारण त्याला एखादया खेळाडू मुळे बऱ्याच कालावधीपासून संघात संधी मिळत नसल्यामुळे व प्रतिस्पर्धी खेळाडूंचा चांगलाप्रदर्शन झाला नसल्यामुळे संघावर पराभवाची नामुष्की येते. सर्वाधिक स्वाभाविक प्रतिक्रिया निराशेच्या रूपातच होत असते आणि काही वेळपर्यंत तरी खेळाडूंच्या मनावर उदासिनतेची पडछाया कायम असते. परंतु एखादया स्पर्धेचे महत्व किती यावरच खेळाडूंची उदासीनता अवलंबून असते.

मुख्य शब्द **(Key word) :खेळाडू आणि नैराश्य**

**प्रस्तावना(Introduction)**:

शिक्षण,शारीरिक शिक्षण तथा खेळ यांचा एक दुसऱ्याशी घनिष्ठ संबंध आहे कारण तिन्ही विषय हे जैविक, भौतिक, मानसिक तसेच सामाजिक व्यवहाराचे प्रतिनिधित्व करतात हया तिन्हीचा मुळ उद्देश मनुष्यातील विकास व व्यक्तिमत्वातील परिपूर्णता घडवून आणणे हा असतो. आधुनिक शिक्षण शारीरिक शिक्षण हे खेलाशिवाय अपूर्ण मानल्या गेले आहे. कारण सुदृढ शरिरातच सुदृढमन वास करित असते. तरीही व्यायाम व खेळाशिवाय सुदृढ शरिराचा विकास शक्य नाही.

**गोडफ्रे थॉमसन** यांच्या मतानुसार,'शिक्षण व्यक्तिवर पडणाऱ्या वातावरणाचा तो प्रवाह आहे ज्यामुळे त्याच्या विचार आणि व्यवहारातील प्रवृत्तीमध्ये बदल घडून येत असते. आजीवन चालणारी ही विद्या, व्यक्तिला प्रभावशाली रूपात भौतिक आणि सामाजिक वातावरणात व्यवस्थित होण्यासाठी संधी प्राप्त करून देते'.

शारीरिक क्रिया आणि खेळातील खेळाडूचा अभ्यास तसेच प्रतिस्पर्धी पक्षाशी संबंधीत व्यवहार प्रणालीचा अभ्यास तसेच खेळाडूंच्या मानसिक स्थितीतील श्रेष्ठतम प्रदर्शनाच्या उद्देशाने योग्य आणि आवश्यक मार्गदर्शन,शारीरिक शिक्षण खेळाच्या तुलनेत कितीतरी अधिक विस्तृत विषय आहे. क्रीडा कौशल्याशिवाय क्रीडा मानसशास्त्रावर अधिकारदिला जाणे आवश्यक आहे. खेळाडूचे मानसिक कौशल्य, मानसिक प्रशिक्षण व मानसशास्त्रीय दृष्टिनेही प्रतिस्पर्धात्मक खेळात भाग घेणाऱ्या खेळाडूंची समस्या व नंतर पराभवातून आलेले नैराश्य व नैराश्यातून निर्माण झालेली समस्या अधिक गंभीर गुंतागुंतीची व विषम असल्याचे दिसून येते.

याच अंगाने विस्तृतपणे सांगायचं झाले तर काही खेळाडू पराभवातील दु:खातून खूप दिवसानंतर बाहेर पडतात स्पर्धा विशेष रूपाने महत्वाची आहे आणि स्पर्धेने एक विशेष स्थान असेल तर खेळाडूची प्रतिक्रियाही तेवढीच तीव्र

असते. उदा. भारतातील २०११ च्या जागतीक क्रिकेट चषकातील भारत पाकिस्तान उपांत्यफेरीतील सामना पाक सामना हरल्यानंतर बरेच दिवस पाकिस्तानी खेळाडू अनेक आरोप भारतावर नैराश्येपोटी लावत होते. काही वेळा एखादा खेळाडू अशा प्रकारच्या नैराश्यातुन कधीच वर येत नाही व लांब कालावधीपर्यंत एकातंवासात चालला जातो. उदा. शारजा येथील आस्ट्रेलेशिया कपमध्ये क्रिकेटच्या अंतीम सामन्यात जावेद मियांदादने चेतनशर्माच्या शेवटच्या चेंडूवर षटकार ठोकल्यामुळे चेतन शर्मापुन्हा आंतरराष्ट्रीय क्रीकेटमध्ये यशस्वी ठरला नाही. काही खेळाडू पराभवातील दुःख पचवू न शकल्यामुळे आत्महत्तेलाही कवटाळतात उदा. १७ च्या वर्षाच्या कुस्ती खेळाडू रीतिका फोगट राजस्थानातील भरतपूर येथील लोहगड मध्ये सब ज्युनिअर स्पर्धेत फक्त एका अंकाने पराभूत झाल्यामुळे निराश होत फाशी लावत आत्महत्या केली. अशा विविध पातळीवरील नैराश्यग्रस्त खेळाडूंचा अभ्यास आवश्यक आहे.

नैराश्यग्रस्त खेळाडू खालील प्रकारचे असतात.

१) स्थिर निराशा(Chronic Depression):

हया प्रकारचा खेळाडू बहुधा दोन प्रकारे सर्वात अधिक प्रभावित होत असतो त्याच्यातील स्फुर्ती कमी होते हालचाली एकदम मंदावतात तो शारीरिक रूपाने अशक्त होतो जनुकाही त्यांच्यातील शक्ती काढून टाकली आहे असे वाटावे. तो थकलेला जानवतो जनुकाही निद्रारोग झालेला आहे किंवा योग्य आहाराकडे दुर्लक्षकरीत असावा अशा प्रकारच्या नैराश्यग्रस्त खेळाडूचे आणखी एक लक्षण म्हणजे तो बराच वेळपर्यंत झोपून राहतो व तरीही त्याला जानवत राहते की त्याने पुर्णआराम केलेला नाही.

त्याच्या सरावात तसेच खेळातील प्रदर्शनातच कमतरता येत नाही तर किंबहुना त्याच्या अन्य हालचालीतही अभाव जानवतो जर त्याच्यात नैराश्य कायम स्वरूपात राहत असेल तर तो पूर्ण रूपाने स्थिर होत जातो. अशा वेळेला तो संघाला सोडू पण शकतो.

२) उत्तेजक निराशा (Excitable Depression):

हया प्रकारचा नैराश्यग्रस्त खेळाडू साधारणतः अधिक चुस्त होत जातो परंतु प्रत्येक वेळेला त्याच्या खेळातील प्रदर्शनस्तर कमी होत जातो, तो कोणत्याही घटनेशी खुश होत नाही परंतु तो स्वतःशी, आपल्या सरावाशी, आपल्या खेळातील प्रदर्शनाशी आणि आपल्या खेळातील योग्यतेच्या प्रति खुप अधिक आशावादी असतो. तो अधिक काळपर्यंत खूप सराव करीत राहतो. याचा अर्थ असा होतो की, चुका होत जाऊन त्याच्यातील शारीरिक हालचाली त्याच्या पराभवात प्रतिबिम्बीत होत जातात खालच्या स्तरावरील सराव व खालावलेल्या प्रदर्शनामुळे बहुतेक वेळा त्याला खेळाला रामरामच ठोकावा लागतो.

३) सक्रियता नैराश्य(Persistent Depression):

अशा प्रकराच्या खेळांडूचे जे चित्र आपल्या समोर येते ते हे की, बराच काळपर्यंत अशी प्रतिक्रिया ते व्यक्त करतांना दिसतात ज्यामुळे आपल्या लक्षात येते की ते पराभूत झालेले आहेत व ते अशाप्रकारे परिस्थिती तयार करतात की ते स्वतःच पराभवाला जबाबदार असून स्वतःला शिक्षा देत राहतात. बहुधा असे होते की, काही खेळाडू आपल्या पराभवाला एवढं मनाला लावून घेतात की त्यांचे अयशस्वी होणे पक्के होत जाते. अशी परिस्थिती साधारणतः सत्राच्या सुरूवातीला होत असते नंतर त्यांना अशी अनुभूती होते की ते काहीही करण्यायोग्यतेचे नाहीत जेव्हा की मूळ लक्ष्याप्रती ते पोहचू न शकल्यामुळे स्वतःलाच शिक्षा देतात. उदा. १९९० च्या दशकात बिजॉर्नबोर्गने ओळीने पाचदा टेनीस मध्ये विंबल्डन स्पर्धा जिकल्यानंतर व सहाव्यांदा विबंल्डनमध्ये पराभूत झाल्यामुळे निवृत्ती पत्करली.

४) समस्येची सोडवणूक(Solution to the Problem):

नैराश्यग्रस्त खेळाडूच्या समस्येची सोडवणुक करणे व त्यांच्यातील मानसिक गोंधळ स्पष्ट रूपात पाहण्यासाठी आम्हाला नैराश्याची कारणे जवळून पाहावे लागतील व कारणांचा शोध घ्यावा लागेल नैराश्यतेचे कारण जर कोणता माणुस असेल तो कोणत्याही वस्तूच्या तुलनेत अधिक खतरनाक व गुंतागुतीचा असू शकतो तो मित्र सहकाऱ्यासाठी नेहमी मोकळा असू शकतो. निराशाग्रस्त खेळाडू विशेषतः एखादा ॲथलीट आपल्यातील रागाला जाहीर करण्याचा एक विशिष्ट प्रकार तो स्विकारतो ज्या कारणामुळे त्यांच्यामध्ये निराशा उत्पन्न झाली आहे त्यावर सरळपणे आपण राग व्यक्त करण्यापेक्षा तो आंतरमुखी होतो तो आपल्या मित्रावर राग नाही काढत किंबहूना तो स्वतःवरच राग काढत असतो. जर त्याला वाटत असते की दुसऱ्याने त्याचं काही अहित केलं असेल तरी त्यांना शिक्षा न देता किंबहूना तो स्वतःलाच शिक्षा देतो. अशा वेळेला क्रीडा मानसशास्त्रज्ञाची भूमिका महत्वपूर्ण ठरते. त्याच्यातील गुणवत्ता किती आहे, त्याचे महत्व व योगदान खेळासाठी व संघासाठी किती आत्मशासकआहे संघ त्याच्यावर किती अवलंबन आहे त्याच्या निराशग्रसीत बद्दल महत्व आपातांना त्याच्यातील

आत्मविश्वास कशा प्रकारे उंचावता येईलहे प्रशिक्षक, कर्णधार, सहकारी,पालक, मित्रमंडळीइत्यादींनी त्याच्या अंर्तमनाचा शोध घेतलयाशिवाय समजणार नाही. मानसशास्त्राज्ञालाही वेगवेगळया कसोटया तपासून पाहाव्या लागतील.

५) **निष्कर्ष(Conclusion)**:

अशा प्रकरच्या नैराश्यग्रस्त खेळाडूंची संख्या आपल्या देशात व जगातही खूप मोठया प्रमाणात दिसून येते ही समस्या केवळ आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पानतळीवरच आहे असे नाही तर स्थानिकपातळीवरही ही समस्या खूप मोठया प्रमाणावर आहे. सांघीक खेळाशिवाय व्यक्तीगत खेळामधील खेळाडूंची ही समस्या मोठया प्रमाणावर आहे उदा. ॲथलेटिक्स, जलतरण कुस्ती किकेट अशा खेळातील ही समस्या खूप असून रीतिका फोगट ने केलेली आत्महत्या किंवा २०१५ मधील इंगलड येथील टेस्ट किकेटमध्ये नैराश्यामुळे कोहलीला आलेले अपयश अशा नैराश्यग्रस्त खेळाडूंचा शोध घेऊन क्रीडामानसशास्त्र केंद्राची निर्मिती व खेळाडूंच्या अंर्तमनाचा शोध घेणारा प्रशिक्षक उपलब्ध करून दिल्यास ही समस्या सुटू शकते. असे अभ्यासावरून दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ( Reference)**:

१) शिक्षा एवं खेल मनोविज्ञान भाग १ – डॉ. रवि अम्बष्ट– योगराज थानी, प्रकाशन खेल साहित्य केंद्र अंसारी रोड दर्या गंज नई दिल्ली,२००६

२) शिक्षा एवं खेल मनोविज्ञान भाग २ – डॉ. रवि अम्बष्ट – योगराज थानी,प्रकाशन,खेल साहित्य केंद्र अंसारी रोड दर्या गंज नई दिल्ली,२००६

३) क्रीडा मनोविज्ञान – डॉ. रवि अम्बष्ट– प्रकाशन,खेल साहित्य केंद्र अंसारी रोड दर्या गंज नई दिल्ली,२००६

Volume-7, 2021

ISSN 2394-6903

# RAINBOW

*Multidisciplinary Peer Reviewed Annual Journal*

Shri Nagpur Gujarati Mandal's

V. M. VASANT COMMERCE, J. M. THAKAR ARTS & J. J. PATEL SCIENCE COLLEGE

Wardhaman Nagar, Nagpur-8

Volume-7, 2021

ISSN 2394-6903

# RAINBOW

Multidisciplinary Peer Reviewed Annual Journal

**Shri Nagpur Gujarati Mandal's**

**VMV Commerce, JMT Arts and JJP Science College**

**WARDHAMAN NAGAR, NAGPUR-440008.**

Ph.: 2764391, 2733941, 6508158

E-mail: vmvnagpur@gmail.com, rainbowvmv@gmail.com

Website : www.vmvnagpur.org

| | | | |
|---|---|---|---|
| 42 | भूमंडलीकृत समाज में विकास बनाम विस्थापन | भावना पी.एच.डी. | 253 |
| 43 | हिन्दी और तेलुगु में वैज्ञानिक और तकनीकी शब्दावली का निर्माण | सुर्य कुमारी.पी. | 259 |
| 44 | बलुतेदारी प्रथा और महार मांग संबंध | सोनकांबळे पिराजी मनोहर | 264 |
| 45 | अस्तित्व की लडाई और डॉ.धर्मवीर | घाटे कैलास बलिराम | 271 |
| 46 | समाजातील समाजाचा परिवर्तनिय महामेरु- राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | डॉ. दिलीप चव्हान | 276 |
| 47 | माझी जन्मठेप : वाङ्मयीन महात्मता | डॉ. तीर्थराज कापगते | 280 |
| 48 | आदीवासी मराठी कविता | डॉ. राखी जाधव | 287 |
| 49 | The Great Indian Robbery And Two Contemporary Historians | Dr. Supantha Bhattacharyya<br>Dr. Purabi Bhattacharyya | 292 |


## Gujarati


| | | | |
|---|---|---|---|
| 50 | ચાલો, શિક્ષણ જગતની યાત્રાએ... | શ્રીમતી વોલ્ગાબેન સંજયભાઈ ઠાકર | 298 |
| 51 | મધ્યકાલીન ગુજરાતી સાહિત્યમાં ધર્મ કેન્દ્ર સ્થાને ? | ઉર્મિલા વૃજલાલ શુક્લા | 302 |
| 52 | ગાંધી - ગીતા | ડૉ. પુજા પંડ્યા | 305 |
| 53 | શિક્ષણમાં માતૃભાષાનું મહત્વ | વિનયભાઈ ચંદુલાલ કાકુ | 307 |
| 54 | "ગુજરાતી અને સાહસ" | ડો. ભાવેશ ચંદ્રકાન્ત ભૂપતાણી | 310 |


## Science


| | | | |
|---|---|---|---|
| 55 | Synthesis of Benzimidazole Schiff's Bases & Its Derivative Catalysed by Copper Nanoparticles and Employment of India | Jay A. Tanna<br>R. B. Patil | 312 |
| 56 | Using Raspberry PI as OPC UA Device with Orange Wit Analytics Platform | Mrs Mugdha M. Ghotkar | 318 |

# माझी जन्मठेव : वाङ्मयीन महात्मता

डॉ. तीर्थराज कापगते
श्री.लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ जि.नागपूर

देशभक्तांच्या अलोट स्वार्थत्यागावर आजचा भारत उभा आहे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात ज्यांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवलं आणि आयुष्याची राखरांगोळी केली त्या सर्वच स्वातंत्र्य योद्धयांना प्रचंड यातनांमधून जावे लागले. मातृभूमीवर अलोट प्रेम करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही स्वातंत्र्यासाठी अपार हालअपेष्टा भोगल्या आणि अतुलनीय त्याग केला. त्यांचे जीवन उत्तुंग होते आणि व्यक्तिमत्त्व असामान्य होते, त्यांचे वाङ्मय हे त्यांच्या अशा उत्तुंग जीवनाचे आणि असामान्य व्यक्तिमत्त्वाचे प्रकटीकण आहे. अनंत काणेकरांनी शाईने लिहिणारे लेखक आणि रक्ताने लिहिणारे लेखक असे लेखकांचे जे दोन प्रकार सांगितले आहेत. सावरकरांचे लेखन हे रक्ताने लिहिलेले लेखन आहे. त्यांच्या लेखणीत मातृभूमीच्या मुक्तीसाठी लढ्णाऱ्या ध्येयधुंद क्रांतिकारकाचे रक्त होते.

सावरकरांची कवी, कादंबरीकार ,नाटककार, इतिहास लेखक , निबंधकार,आत्मकथनकार आणि वक्ता अशी विविध वाड्.मयीन रूपे होती. 'माझी जन्मठेप' हे त्यांचे महत्त्वाचे आणि प्रसिद्ध आत्मकथन आहे.

ते महाकवी होते. कमला, गोमंतक आणि महासागर ही तीन खंडकाव्य म्हणजे त्यांच्या संकल्पित महाकाव्याची उपांगे होत. 'महाकाव्य : स्वरूप व समीक्षा' या ग्रंथात डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणतात की, सावरकरांना पानपत या विषयावर वीररसपूर्ण महाकाव्य लिहायचे होते. अंदमानाच्या अंधेरीत त्यांनी नी ही इच्छा अंशतः पूर्ण केली . कमला , विरहोच्छ्वास , गोमंतक आणि महासागर हे चार असंबद्ध खंड उपलब्ध आहेत. एका अपूर्ण महाकाव्याचे हे सर्ग वाचून त्यांच्या अपूर्ण पण अपूर्व अशा महाकाव्याची ची समीक्षक कल्पना करतात व महाकाव्य न लिहिलेला महाकवी असे त्यांचे वर्णन करातात.

त्यांची अत्यंत ओजस्वी कविता देशभक्तीच्या प्रत्यक्ष अनुभूतीतून निर्माण झाली आहे आणि त्यांच्या देशभक्तीबद्दल त्यांचा शत्रूदेखील अनादर दाखवू शकत नाही. सावरकरांच्या एकूणच जीवनकार्याचा अविभाज्य भाग मातृभूमी आहे य मातृभूमीच्याप्रेमासाठीच त्यांना आयुष्यभर दाहक अशा अनुभवांना सामोरं जावं लागलं. अंदमानात त्यांना हलाहल पचवावे ती दहा वर्षे. त्यानंतर कारागृहात जाच सहन केलेली तीन वर्षे य आणि पुढे चौदा वर्षांची स्थानबद्धता अशी एकूण सत्तवीस वर्षांची असह्य यातना. या यातनेत खरेतर लौकीक अर्थाने संपूर्ण तारूण्यच संपून गेले होते य पण अशा असह्य यातना

भोगूनही त्यांची मातृभूमीवरची निष्ठा अढळ राहिली.

खरे तर वीररसाने ओथंबलेल्या सावरकरांच्या चरित्रामध्ये अनेक रोमांचकारी पर्व आहेत. क्रांतीच्या ध्येयाने भारलेला सावरकरांच्या आयुष्यातले पहिले पर्व अत्यंत रोमहर्षक असे आहे. आयुष्यातील १९२१ पर्यंतच्या या कालखंडातील हकीकती माझ्या आठवणी , शत्रूच्या शिबिरात माझी जन्मठेप ही त्यांची तीन आत्मकथनात्मक पुस्तकांमध्ये त्यांनी लिहून ठेवल्या आहेत. आठवणीं ' चे तीन भाग आहेत. त्यातील पहिले आहे पूर्वपीठिका. सावरकरांच्या जन्मापूर्वी १८५७ च्या स्वातंर्त्य समरापासूनच देशात सशस्त्र क्रांतीला सुरूवात झाली होती. आपल्या राजकीय जाणिवेचा उगम आणि विकास हा आपल्या जन्मापूर्वीच्या काळातील राजकीय नि परिस्थितीचा परिणाम आहे. म्हणूनच या पूर्वपीठीका ग्रंथात साधारणतः १८६० ते काळातील घडामोडींचे दर्शन अपल्याला घडते.

त्यानंतरच्या त्यांच्या आत्ममकथनाचे दोन भाग आहेत. त्यांचे जन्मगाव भगूर आणि तेराव्या वर्षी इंग्रजी शिकण्यासाठी नाशिकला गेले ते नाशिक या दोन गावांवर हे कथन केंद्रित या दोन्ही ठिकाणी त्यांचे शालेय शिक्षण झाले. त्या काळात सावरकरांच्या बालमनावर कोणते झाले आणि मनात स्वातंर्त्याची ओढ कशी निर्माण झालेली याचे वर्णन या दोन भागात आहे. दुसरे पुस्तक 'शत्रूच्या शिबिरात.' या आत्मचरित्रात पुण्याच्या कॉलेजमध्ये महाविद्यालयीन झाल्यावर बॅरिस्टर होण्यासाठी म्हणजे १९०६ मध्ये ते इंग्लंडला जातात, तेव्हापासून जन्मठेपेची शिक्षा होईपर्यंतचा वृत्तांत कथन केला आहे. हे पुस्तक १९६५ मध्ये म्हणजे साधारणतः एक वर्ष आधी त्यांनी लिहिले. या सर्वच आत्मचरित्रांधून जाज्वल्य देशभक्तीने सावरकरांचे दर्शन आपल्याला होते. मुळात त्यांचा एकूणच जीवनप्रवास स्फोटक घटनांनी अतिशय अद्भुतरम्य असा आहे.

१९१० मध्ये त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली आणि ते अंदमानात गेले, तेव्हापासून त्यांना शिक्षा व सुटका होइपर्यंतचा कालखंड ' माझी जन्माठेप ' या ग्रंथात आला आहे. आत्मकथनांच्या पुस्तकांपैकी या ग्रंथाला उच्च ललित साहित्यकृतीचा दर्जा प्राप्त झाला. अभिजात असा हा ग्रंथ आहे. असीम निग्रहाने आणि असामान्य धैर्याने अंदमानाच्या छळाला सामोरे गेले. त्या जीवानामृत्युच्या झुंजीचे वर्णन केलेलं या ग्रंथात आहे. आत्मचरित्रांमधून जाज्ज्वल्य देशभक्तीने भारावलेल्या सावरकरांचे दर्शन आपल्याला होते. त्यांचा जीवनप्रवासच स्फोटक घटनांनी भरलेला व अतिशय अद्भुतरम्य असा आहे. सावरकरांना ही पदवी आचार्य अत्रे यांनी दिली. आपल्या क--हेत चे पाणी या ग्रंथात ते लिहितात. पिढतील तरुणांना सावराकरांविषयीव इतके आकर्षण होते की नुसते त्यांचे घेतले पराक्रम आणि अचाट चामात्त्काराचे वर्तुळ डोळ्यांपुढे झगामगायचे !

सावरकरांचे सर्वच लेखन हे व्यासंगी , विद्वत्तापूर्ण , प्रक्षुब्ध. अंतर्भेदी दृष्टीचे, दौलदार

 ISSN 2394-6903

प्रतिभा आणि प्रचितीचे असले तरी माझी जन्मठेप हा त्यांच्या सर्वच साहित्याचा मुकुटमणी शोभेल असा ग्रंथ आहे य आणि महाकवी प्रमाणेच आत्मचरित्रकार हे त्यांचे वाङ्.मयीन रूप या आत्माचरित्राने सर्वमान्य केले.

डोस्टोव्हस्कीने 'द हाऊस ऑद डेड' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी कारागृहाच्या अनुभवांवर लिहिली तर 'द प्रोफन्डीस' हा ऑस्कर वॉइल्डच्या पत्रांचा संग्रहही कारावासात लिहिला आहे. या जागतिक दर्जाच्या ग्रंथांच्या तुलनेत या आत्मचरित्राकडे पाहिले जाते. खरे तर अंदमानातील थरारक पार्श्वभूमीवर सावरकरांची 'काळेपाणी' नावाची तीनशे पानांची कदंबरी आहे. पण या काल्पनिक कादंबरीतील वास्तवाला स्पर्श करण्यासाठीही जन्मठेपेला स्पर्श करावा लागतो !

'माझी जन्मठेप' ही अंगावर शहारे आणणाऱ्या रोमांचकारी घटनां व अनुभवांना अत्यंत संवेदनशीलतेने टिपणारी एका क्रांतिकारकाची गाथा आहे. आणि ही गाथा हे व्यक्तिविशिष्ट नसून प्रातिनिधिक आहे. कारण मातृभूमीच्या स्वातंर्त्यासाठी सावरकरांसारखाय कितीतरी क्रांतिकारकांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला. अंदमानातच भाई परमानंद, आशुतोष लाहिरी यांच्या सारखे अनेकजण मरणतना भोगत होते.

डॉ. आनंद यादव म्हणतात, आत्मचरित्र म्हणजे वस्तुस्थितीतील घटनांची केवळ हकीकत नाही, घटनांच्या निश्चल ढिगाऱ्यातून घटना, पात्रे व प्रसंगे यांची निवड महत्त्वाची असते. काय लिहू नये आणि काय लिहावे याचे भान असण्यातूनच उत्कृष्ट आत्मचरित्राची निर्मिती होते. मराठीत बरीच आत्मचरित्रे आहेत. महान विभूतींच्या लेखनाने मराठीतील आत्मचरित्राचे दालन समृद्ध झाले आहे य वाङ्.मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे' हे पुस्तक कोणालाही पटकन आठवते. या ग्रंथाने मराठीत अव्वल दर्जाचे स्थान मिळवले आहे. कारण एका सामान्य जीवन जगणाऱ्या निरक्षर लेखिकेचे सुबोध शैलीत लिहिलेले ते एक असामान्य आत्मचरित्र आहे.

'माझी जन्मठेप' हे स्मृतिपेक्षाही श्रेष्ठ आत्मचरित्र आहे. खूद्द सावरकरांचे चरित्रलेखक धनंजय कीर म्हणतात, मराठी भाषा अस्तित्वात असेपर्यंतत टिकून राहतील असे पाचग्रंथ निवडायचे झाले तर ज्ञानेश्वरी , तुकाराम गाथा , गीतारहस्य , पण लक्षात कोण घेतो आणि माझी जन्मठेप !

मात्र वाङ्.मयीन इतिहासकार आणि अभासकांनी या ग्रंथाकडे फार दुर्लक्ष केले. सावरकरांच्या वाट्याला जसे उपेक्षितपण आले. असहायता आली. विफलता आली. तशीच खेदजनक उपेक्षा त्यांच्या या ग्रंथाच्या वाट्यालाही आली. स्थानबद्धतेत १९२७ च्या गांधीभेटीत सावरकर म्हणतात, स्वातंर्त्यलढ्यात लोकांमध्ये उत्साह जागृत करण्याचे महात्त्कार्य करायला तुम्ही मोकळे आहात हे तुमचे भाग्य ! या संवादातून त्यांच्या मनातली तगमग दिसून येते. एकतर हा ग्रंथ ज्या काळात प्रकाशित झाला, त्यापूर्वीच असहकारिता आंदोलनामुळे संपूर्ण देशाचे राजकारण बदलून गेले होते. महात्मा गांधीच्या नेतृत्वात भारतीय स्वातंर्त्याचा प्रवास एका व्यापक लोकलढ्याच्या दिशेने सुरू झाला होता. राष्ट्रहिताच्या दोघांच्या दृष्टीकोनात फरक होता. स्वातंर्त्यालढ्याविषयी दोघांच्या भूमिका आणि

आकलन भिन्न होते. १६२७ मध्ये या पुस्तकाची पहिली आवृत्ती निघाली. त्यानंतर एका वर्षानेच म्हणजे १६२८ मध्ये गांधीजींचे 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद झाला.

हे या ग्रंथाच्या उपेक्षेला आणखीही एक कारण असेल. पारतंर्त्याचा तो काळ होता. या ग्रंथाची वाङ्.मयीन प्रशंसा केली तर आपल्यावर काही बालंट येईल. ही भीती लोकांमध्ये असावी. पहिली आवृत्ती फार गाजावाजा न करताच ग्राहकांना देण्यात आली. गुजराती आवृत्तीवर बंदी आली य पण सुदैवाने ही परिस्थितील पुढे बदलत गेली. अजूनही या ग्रंथाच्या आवृत्त्या निघत आहेत.. २००० मध्ये परचुरें प्रकाशनाने १३ वी आवृती काढली.

प्रतिभा आणि अनुभूती यांचा अतिशय उत्कट आणि अजोड संगम म्हणून जन्मठेप या ग्रंथाकडे पाहिले पाहिजे. या ग्रंथाचे लेखन करताना सावरकर रत्नागिरीला स्थानबद्धतेत होते. कायदेशीर बंधनामुळे अनेक गोष्टी ते सांगू शकले नाहीत. सावरकर प्रास्ताविकात म्हणतात, ' जे सांगता येईल ते अगदी वरवरचे, उथळ व सापेक्षतः क्षुल्लकसे आहे, जे सांगण्यासारखे आहे ते परिस्थिती सांगू देत नाही. सांगितलेल्या गोष्टीच इतक्या थरारक आणि भेदक आहेत की , न सांगितलेल्या किती भेदक असतील याची कल्पना करावी लागते. जॉन कीट्स आपल्या एका कवितेत म्हणतो , ऐकलेले संगीत इतके सुंदर आहे तर न ऐकलेले कल्पनेतील संगीत किती सुंदर असेल ! जन्मठेप वाचताना सारखे वाटत राहते की निवेदन केलेले सत्य इतके दारुण आहे, तर निवेदन न केलेले सत्य किती दारूण असेल?

दोन जन्मठेपेची शिक्षा झाल्यावर त्या भयंकर आपत्तीतही आणि डो्क्यावर बिस्तरा आणिं हातात थाळी घेऊन हातापायात अवजड बेड्या वागवीत काळेपाण्यातल्या त्या भयभीषण परिस्थीतीत सावरकरांच्या मनात महाकाव्य लिहिण्याची प्रेरणा जागी होते. पन्नास वर्षे कशी काढायची ? या भीषण प्रश्नाला सामोरे जाताना ते ठरवतात महाकाव्य लिहायचे पंचेवीस वर्षात एक महाकाव्य हा हिशेब त्यांच्या मनात सुरू होतो. हे आहे प्रोॲ्नटीव्ह तत्त्व परवशतेत काव्य हा त्यांच्या स्वातंर्त्याचा उच्चार ठरतो. साखळदंडाच्या विरूद्ध केलेलं बंड आणि भयानक छळातही आत्मबलाचे तेजस्वी दर्शन म्हणजे त्यांचे काव्य लेखकाचे विचारस्वातंर्त्य आणि अभिव्यक्ती स्वातंर्त्य अबाधित राखण्यासाठी केलेला पराकोटीचा संघर्ष म्हणजे तुरूंगात महाकाव्य लिहिण्याची त्यांची प्रेरणा !

याचे रहस्य त्यांच्या लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वात आहे. अनेक मूलद्रव्याचे तीव्र मिश्रण होऊन सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे रसायन तयार झाले आहे. या व्यक्तिमतत्त्वात अनेक परस्पर विरोधीही गुण आहेत, पण त्यांचा पिंड मुख्यत्त्वे समाजक्रंतीचे स्वप्न पाहणाऱ्या सुधारकाचा होता. त्यांचे अंतरंग तर्कशुद्ध बुद्धिवाद्याचे होते. सर्व प्रकारच्या धार्मिक भाबडेपणातून आणि लुच्चेगिरीच्या कचाट्यातून मानवी बुद्धीला मुक्त करणे हे पवित्र धर्मकृत्य होय असा प्रखर विचार करणारे सावरकर फार विज्ञाननिष्ठ होते आणि स्पष्ट व टोकदार विचार करणारे होते. सर्व धर्म कालबाह्य झाले आहेत, त्यांचे ज्ञाचे गंगेत विसर्जन करा, गायी सारख्या पशूला देवता मानणे हा माणुसकीचा अपमान आहे , असे सांगणाऱ्या धाडसी सावरकरांचा पुरोगामी विचारही आपण समजून घेतले पाहिजेत. नुसते विचारच

 ISSN 2394-6903

नाहीतर कृतीही बघा. मुलाची मुंज त्यांनी केली नाही आणि प्रकृतीच्या कारणाङकुळे का असेना पण ते पत्नीच्या अंत्यसंस्काराला उपस्थित नव्हते , आणि तरीही हिंदुत्वनिष्ठा हा त्यांच्या राजकीय विचारांचा पाया होताय आणि त्यांची हिंदुत्त्वविषयक विचारप्रणाली अंदमानातच जन्माला आली. जहाल आणि चिंतनशील पण लढाऊ राजकारण हा त्यांच्या चरित्राचा गाभा आहे आणि या राजकारणाची मुळे त्यांच्या देशभक्तीतच आहेत.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात महाकवीला उपकारक ठरणाऱ्या सांस्कृतिक संचिताला उजाळा देण्याचे मानसिक सामर्थ्य , वस्तुनिष्ठता, कल्पकता, भावोत्कटता, भाषाप्रभुत्व, अभिजात वाड्.मयाचे संस्कार, तेजस्वी कृतीशील जीवन हे सर्वगुण एकवटले होते य आणि त्याचा प्रत्य 'माझी जन्मठेप' वाचताना पानोपानी येतो.

जन्मठेपेला अशा तेजस्वी काव्याचे बळ लाभले आहे. सेल्युलर जेलमधला तो रानटी क्रूर सर्व सत्ताधीश बारी. तेथील अंगावर शहारे आणणारे छळ. त्या दहशतीत जिथे बोटभर कागद आणि पेन्सिलीचा टिचभर तुकडा जवळ बाळगण्याची बंदी. दिवसभर कोलू ओढणाऱ्या व काथ्याकुटीच्या कठोर परिश्रमांनी अंग ठणकणे आणि अशा मानसिक यातनांमध्ये काव्य लिहिण्याची ऊर्मी हीच एक विलक्षण गोष्ट आहे !

आजपत भूर्जपत्रापासून संगणक आणि स्मार्टफोनपर्यंत साहित्य व काव्य लिहायला वापरले गेलेय पण सावरकरांनी वापरलेले साधन अद्भूत होते.ते साधन म्हणजे दगडी भिंत. ज्ञानेश्वरानंतर भिंत पुन्हा एकदा चालली या कवितेत लोककवी मनमोहन यांनी दगडालाही बोलायला लावणाऱ्या या जगावेगळ्या काव्यलेखनाचं वर्णन केले आहे.

आभाळ म्हणाले नाही, भूमीही म्हणाली नाही
मग विनायकाने त्यांची, आळवणी केली नाही
दगडाची पार्थिव भिंत, ती पुढे अकल्पित सरली
मी कागद झाले आहे , चल लिही असे ती वदली

कोठडीतली चुन्याने रंगविलेली लांब आणि उंच भिंत म्हणजे कागद आणि घायपाताचा काटा म्हणजे लेखणी ! पुन्हा या कागदाचे आयुष्य एक वर्षाचे. चुना लागण्यापूर्वीच ते संपूर्ण काव्य पाठ करायचे. कधी ते काव्य मिटवून दुसऱ्या दिवशीच नव्या ओळी लिहायच्या. केवळ स्मृतीवर अवलंबून रहायचे.संदर्भ नाही. एकाएका शब्दासाठी आठ आठ दिवस खोळंबून रहावे लागे. लेखनासाठी बहाणे करणाऱ्या सुखवस्तू लोकांनी ही काव्यकथा काळजावर कोरून ठेवावी.

खरे तर आत्मचरित्र हा अपावादात्मक वाड्.मय प्रकार आहे. आत्मचरित्र वाचताना वाचक एकाचवेळी दोन आत्मचरित्रे वाचत असतो. एक लेखकाचे आणि दुसरे स्वतःचे. अशा दुर्धर प्रसंगी , असे त्याचार आपल्यावर झाले असते तर , आपण कसे वागलो असतो? लेखक एव्हढ्या मोठ्या दुःखाचे अवंडबर माजवत नाही आणि आपण लहानसहान दुःखाने व्याकुळ होतो. माझी जन्मठेप वाचताना अशी

ISSN 2394-6903

वाचकाची आत्मजागृती सदैव होत असते. इतर साहित्यप्रकारात पात्राशी आपण समरस होतो. आपले आत्मविलोपन होते. दहशतीच्या भयंकर आपत्तीतही म्हणूनच झुंजत राहण्याची ही स्फूर्ती तीं आपल्या जगण्यालाही उपकारक ठरते!

वाचकांच्या दृष्टीने जशी ती द्विदल निर्मिती असते तशी लेखकाच्याही दृष्टीने असते. वर्णन करताना वर्तमान काळाचे संदर्भ तो विसरत नाही. आत्मचरित्रकार एकाचवेळी वर्तमानकाळाच्या व गतकाळाच्याही बिंदूतून स्वतःकडे पाहत असतो. त्याचा सातत्याने आत्मशोध सुरू असतोय कारण त्या घटनेकडे आज तो तटस्थपणे बघू शकतो ! गतकाळातील स्थितीचे वर्णन करताना वर्तमान काळाचे संदर्भ तो विसरत नाही .

त्या आत्माचारीत्राची प्रेरणा या दृष्टीने तपासून पाहण्यासारखी आहे. यातनांचा ताण सहन करून लेखकाचे मज्जातंतू क्षीण झाले आहेत. अघटित आणि दुःखाची संकटे बघून एक दिवस १९२० च्या दरम्यान सावरकर इतके उद्विग्न होतात की त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार येतात. त्यांचा विवेकही उदासीन होतो , पण लगेच त्यांच्या मनात विचार येतो की , सहन करणे म्हणजेच राष्ट्रकार्य आणि एकाग्रचित्त होऊन ते त्या यमपुरीतील एकेक घटना आठवतात. मनातल्या मनात एकेक पान उलटत जाते आणि तुरूंगात जन्मठेप आकारास येते. हे असे सातत्याने दोन तीन महिने सुरू असते. त्या मनाच्या शिलालेखावर केलेल्या टिपणाच्या स्मृतिलेखनाची कागदी आवृती म्हणजेच माझी जन्मठेप ! या अर्थाने हा तुरुंगात लिहिलेला ग्रंथ आहे.

हे रोमॅन्टिक वृत्तीने लिहिलेले नाही. याची शेकडो उदाहरणे देता येतील. इथे दुःखाचे भांडवल नाही तर दुःखाला लाथाडण्याचे सामर्थ्य यात आहे. बंदिवानाचे मनोधैर्य खचून जावे अशा परिस्थितीत कोणी व्यसनी होतात, कोणी विकृत होतात, कोणाला वेड लागते तर कोणी आत्महत्या करतात. अशी उदाहरणे या ग्रंथातच आहेत, पण सावरकरांची आत्मास्थिती या छळातही स्थिर आणि बळकट असते. कधी अभ्यासाने तर कधी तत्त्वचिंतनाने त्यांनी ती प्राप्त केली आहे. दुखःशी दोन हात करणारे हे पोलादी मानसदर्शन हे या आत्मकथनाचे वाङ्‌मयीन सामर्थ्य आहे !

या ग्रंथाचा मूल्यभाव आहे 'स्वातंत्र्य' ! या मूल्यभावाच्या आधारावरच त्याची महात्मता सिद्ध होते. विचारस्वातंत्र्य , अभिव्यक्ती स्वातंत्र्य अशा सर्वच प्रकारच्या स्वातंर्त्याची गळचेपी. कुणाची संगत नाही, सोबत नाही, वाचन वर्ज्य, विचार वर्ज्य, ध्यानन धारणा तर दूरच. खेळणे नाही की साधे फिरणे नाही. आंघोळीचे तर सोडाच साधे वायुसेवनाचेही स्वातंत्र्य नाही. हे आत्मचरितत्र यासाठीच वाचायचे की त्यामूळे स्वातंर्त्याचे विशेषतः अभिव्यक्ती स्वातंर्त्याचे महत्त्व कळते. कवीच्या मालकीच्या साध्या लख्ख चांदण्यात उभे राहण्याचे स्वातंत्र्य अनुभवायलाही या महाकवीला दहा वर्षे वाट पहावी लागली.

स्वातंर्त्यासाठी सावरकरांनी मोजलेली किंमत वाचताना आजही आपला जीव गलबलतो. कासाविस होतो. बैलही रड़कुंडीस यावे असे तेलाच्या घाणीचे कठोर परिश्रम. याच ग्रंथात सावरकरांच्या वडील बंधूची कथा आहे. ते अर्धशिशी आणि राजयक्ष्म्याने आजारी. कष्टाची पराकाष्टा. मारहाण.

कदान्नसेवन. जेव्हा या थोरल्या बंधूचे दर्शन होते. दृष्टादृष्ट होते. भावी लौकिक आशांची राख अंगाला फासलेल्या अत्यंत करूणास्पद स्थितीत पाहून ते काय उद्गारतात ? मूक दुःख, असह्य वेदनांचे तीक्ष्ण टोक घेऊन बाबाराव उद्गारतात. तात्या! तू येथे कसा आलास ? सावरकर लिहितात, सुख इतके दुःखद आयुष्यात क्वचितच भासते ! जन्मठेपेचे हे वाङ्.मयीन सौंदर्य आणि जीवनसौंदर्य अतुलनीय आहे.

वाङ्.मयीन सौंदर्याचे आणखी एक उदाहरण देता येईल : अंदमानात चिमुकले, रेखीव व चपळ बुलबुल व त्यांचे सुंदर स्वर पाहून सावरकर त्या बुलबुलांची व मैनांची भाषा शिकून घेतात. ते म्हणतात, मी ते माझ्या खोलीत सहज पाळले असते य पण तो कारागरीय अपराध आहे, नाहीतर माझ्या खोलीत सहज त्यांना मी राष्ट्रप्रीतीची गाणी शिकवली असती !

शंकराचार्य मंडणमिश्राचे घर कोणते आहे म्हणून विचारत गेले तेव्हा, लोकांनी अभिमानाने सांगितले की ज्याच्या दारापुढे पोपट आणि मैना वेदांताचा वाद करतात ते मंडणमिश्राचे घर ! सावरकर म्हणतात, एखादा नवा बुलबुल कोठडीविषयी चौकशी करीत आला असता तर त्या बुलबुलांनी सांगितले असते की , ज्याच्या गजाशी मैना आणि बुलबुल हिंदुस्थानची स्वातंर्त्यगीते गात असतात ती त्या बंडनणमिश्राची म्हणजे बंडखोरांची कोठडी होय.

इतका उदात्त आशय , राष्ट्रीय वृत्ती आणि सौंदर्यदृष्टी हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्ये आहे. अशी आत्मचरित्रे पुन्हा पुन्हा निर्माण होत नसातात. अत्याचाराला सामोरे जाताना आणि दुर्धर प्रसंगी झुंजत राहणाऱ्या स्फूर्तीसाठी प्रत्येकानेच हा ग्रंथ वाचला पाहिजे. छळातही त्यांना बळकट आत्मास्थिती लाभली. अभ्यासाने आणि तत्त्वचिंतनाने त्यांनी ती प्रप्त केली. दुखःशी दोन हात करणारे पोलादी मानसदर्शन हे या ग्रंथाचे वाङ्.मयीन सामर्थ्य आहे. कारागृहात स्वा. सावरकर असीङ्क निग्रहाने आणि असामान्य धैर्याने छळाला समोरे गेले. अशा अंगावर शहारे आणणाऱ्या अनुभवांना अतिशय संवेदनशीलतेने टिपलेली क्रांतिकारकांची गाथा म्हणजे माझी जन्मठेप. हे आत्मवृत्त व्याक्तिवशिष्ट नसून प्रातिनिधिक आहे. या आत्मचरित्रातून दिसणारे त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व पाहून सावरकर साहित्यिक म्हणून जसे जसे श्रेष्ठ होते तसेच ते व्यक्ती म्हणूनही किती श्रेष्ठ होते हे लक्षात येते.

संदर्भ


1) माझी जन्मठेप : वि. दा . सावरकर, परचुरे प्रकाशन

2) महाकाव्य : स्वरूप व समीक्षा : डॉ. द. भि. कुलकर्णी, पद्मगंधा प्रकाशन

3) आत्मचरित्र मीमांसा : डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस

4) स्वातंर्त्यवीर सावरकर : धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.

Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December 2020

Vol. 7 Issue 4



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Dictionary of Research Journal Indexing (DRJI)
- www.worldcat.org
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
October-November-December 2020
Vol. 7 Issue 4

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

Cover Photo : Hathras Rape Case (U.P. India) Source : Internet
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 1000/-

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | प्रेमचंदयुगीन हिन्दी कथा-साहित्य में ग्राम्यजीवन | डॉ. भिमराव मानकरे | 125 |
| 27 | प्रेमचंद की कहानियों में दलित चेतना | डॉ. परविंदरकौर महाजन | 129 |
| 28 | धनगर जनजातियों में सामाजिक एवं सांस्कृतिक स्थितियों में परिवर्तन के संकेत | डॉ.गणपत राठोड | 132 |
| 29 | दिनकर के काव्य में राष्ट्रीय चेतना | डॉ.महेंन्द्रसिंग पवार | 136 |
| 30 | बीसवी सदी के अंतिम दशक का साहित्य : भाषा व शिल्प | डॉ. संतोष पवार | 140 |
| 31 | हिंदी में अनुदित दलित मराठी आत्मकथाओं में चित्रित समस्याएँ | डॉ.भारत खिलारे | 144 |
| 32 | वेदना एकाकीपन की : कृष्णा सोबती की नज़र में | डॉ. संतोष पवार | 152 |
| 33 | नारी समस्या और कृष्णा सोबती के उपन्यास | अनिता देवी | 158 |
| 34 | ज्ञानप्रकाश विवेक की ग़ज़लों में व्यक्त जीवन-दर्शन | डॉ. जे.व्ही.पाटील, अनिल सूर्यवंशी | 163 |
| 35 | 'दरमियाना' में किन्नरों की राजनैतिक चेतना | डॉ. विलास कांबळे | 169 |
| 36 | 'मुन्नी मोबाईल' - कॉल सेंटरों में कार्यरत युवाओं के काले जीवन की कहानी | डॉ.सन्मुख मुच्छटे | 176 |
| | **मराठी विभाग** | | |
| 37 | लोकसाहित्य – अक्षर वाङ्मय | डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 180 |
| 38 | लोकतत्त्व व इहवादाचा अनुबंध | स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार | 186 |
| 39 | भिल्ल जमातीच्या संस्कृतीतील होळी : एक सण | डॉ. चांगदेव मुंढे | 193 |
| 40 | ओतारी समाजातील विवाहपद्धती | प्रा.विक्रम ओतारी | 198 |
| 41 | आदिवासी बोलीभाषा : वास्तव आणि आव्हाने | डॉ. सुलतान पवार | 202 |
| 42 | श्रीचक्रधरस्वामींचे व्यक्तिदर्शन | डॉ.अंजली पांडे | 208 |
| 43 | पसायदान : एक आकलन (२) | डॉ. पुरुषोत्तम जुन्रे | 212 |
| 44 | सामाजिक क्रांतीच्या युगस्त्री : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | डॉ.श्रीकांत गायकवाड | 218 |
| 45 | सोपान खुडे ह्यांचे नाटक 'सम्राट अशोक' | राहुल गायकवाड | 226 |
| 46 | भारत सासणे यांच्या कथेतील जीवनदर्शन | डॉ. बाबाराव ठावरी | 231 |
| 47 | मराठी कथेची उत्क्रांती | डॉ. तीर्थराज कापगते | 236 |
| 48 | 'रानसय' मधून व्यक्त होणारे ग्रामवास्तव | प्रा. ज्ञानेश्वर मुंढे | 244 |
| 49 | कामगार कवितेतील सामाजिक जाणिवा : एक दृष्टिक्षेप | डॉ. दिलीप पवार | 248 |
| 50 | ल. मी. जाधवांच्या कादंबऱ्यांचे आशयसूत्र व त्यांचे वेगळेपण | मिनाक्षी गोणारकर | 253 |
| 51 | तौलनिक साहित्य आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास | डॉ. प्रकाश जाधव | 258 |
| 52 | डॉ. दादा गोरे यांचे कथाविश्व | डॉ. पुरुषोत्तम जुन्रे | 261 |
| 53 | 'डाळ' : एक ग्रामीण कादंबरी | डॉ. रावसाहेब ननावरे | 268 |
| 54 | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र परस्पर संबंध | डॉ. भास्कर शेळके | 271 |
| 55 | भिल्ल संस्कृतीतील काही प्रतीके | डॉ. चांगदेव मुंढे | 280 |
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवकल्याणविषयक आर्थिक विचार | प्रा.विलास सोळुंके | 284 |
| 57 | 'स्वच्छ भारत मिशन' योजनेचे तात्त्विक अधिष्ठान | डॉ. पंडित लावंड | 290 |
| 58 | 'आत्मनिर्भर भारत अभियान' : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रामदास मुकटे | 296 |
| 59 | 'कोविड १९' चा भारताच्या वाहन उद्योग व जी.एस.टी.संकलनावरील परिणाम | डॉ. शामराव वायसे | 301 |
| 60 | जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यामधील ग्रामीण विकासात शेततळ्यांची भूमिका - एक भौगोलिक अभ्यास | डॉ. रंजीता जाधव | 306 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

# मराठी कथेची उत्क्रांती

**डॉ. तीर्थराज कापगते**
मराठी विभाग प्रमुख,
श्री. लेमादेव पाटील महाविद्यालय, मांढळ, नागपूर
८६५७०४९५०७, tirtharajkapgate@gmail.com

साहित्याचे कथात्म , नाट्यात्म आणि भावकाव्यात्म असे तीन प्रमुख वर्ग कल्पिले जातात ; त्यातील गद्य कथात्म साहित्याचा स्फुट प्रकार म्हणजे कथा. कथेत घाटनामालिकेचे कथन किंवा निवेदन केले जाते. कथा हा गद्य कथात्म साहित्याचा स्फुट प्रकार आहे. तो एक निखळ सर्जनशील साहित्यप्रकार आहे.

कथेचा अवकाश मर्यादित असतो ; पण त्या इवल्याशा अवकाशातही अनुभूतीचे अतिइवले केंद्र असते. ज्यात लेखकाचा जीवनानुभव साठवला जातो. अणुच्या केंद्रकातील सुप्त ऊर्जेप्रमाणे तो एकात्म व उत्कट असतो. त्या अनुभवाच्या स्पंदनातून उत्तम कथा आकारास येते. त्या स्पंदनात जीवनाच्या एखाद्या पैलूवर प्रकाश टाकून त्याचे दर्शन घडवले जाते ; पण त्यासोबतच सभोवतालचे राजकीय , सामाजिक पर्यावरणाचे संदर्भ टिपण्याचे व मानवी जीवनातील चिरंतनाचा शोध घेण्याचे अचाट सामर्थ्य असते. अशा उत्तमोत्तम कथांनी मराठी कथाविश्व समृद्ध झाले आहे.

## आधुनिक कथेचा उगम

आधुनिक कथा एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अस्तित्त्वात आली. अमेरिकेतील एडगर अॅलन पो या लेखकाने १८४२ मध्ये कथेच्या स्वरूपाची प्रथम चर्चा केली. त्याच्या विवेचनानुसार, कथा म्हणजे गद्य गोष्ट , ज्यात मोजकी पात्रे , प्रसंग , वातावरणादी घटक या सर्वांच्या चिरेबंद अशा जुळणीतून कथा आकाराला येते व वाचकाच्या मनावर एकच एक संस्कार ती घडवीत असते. पुढे ब्रेनदार मॅथ्यूज यांनी ' द फिलोसाओफी ऑफ दी शोर्ट स्टोरी ' या १९०१ साली लिहिलेल्या निबंधात पो च्या तत्त्वांचा पाठपुरावा केला. अशाप्रकारे आधुनिक कथा ' लघुकथा' या नावाने संबोधली गेली.

## मराठी कथा : अभिरुचीचा विकासक्रम

लोककथा ही मराठी कथेची गंगोत्री होय. आपल्या मौखिक परंपरेत ती प्राचीन काळापासून अस्तित्त्वात होती. भारतात कथाकथनाची दीर्घकालीन परंपरा आहे, पण तिचे सादरीकरण मुख्यत: गायनाच्या स्वरूपात होत असे. त्यातील पद्याचे रुपांतर हळूहळू गद्यात झाले ; मात्र गोष्ट सांगण्याची मूळ प्रवृत्ती या कायम राहिली. कहाणी, नीतिकथा इत्यादी प्रकार ही कथेची मैखिक परंपरेतील रूपे होत. या कथेचे प्रयोजन रंजनवादी होते.

पुढे कहाणीची गोष्ट , गोष्टीची लघुकथा, लाघुकाठेतून नवकथा अशा क्रमाने कथा हा साहित्यप्रकार विकसित होत गेला. काळानुरूप कोणत्याही साहित्यप्रकाराचे रूप बदलत जाते. ते कथेच्याही बाबतीत घडले. कथन आणि कथनरूप या दोन्ही अर्थांनी वापरलेल्या या कथावाङ्मयाने मराठीत निरनिराळी रूपे धारण केली ; तोच तिचा उत्क्रांतीप्रवास. एकेका कालखंडातील वाचकप्रिय नियतकालिकांच्या आश्रयाने मराठी कथा वाचकाच्या मनात रुजली आणि वाढली तोच तिचा विकासक्रम. तिच्या उत्क्रांतीतील या विकासक्रमानुसारच वाचकांची अभिरुचीही घडत गेली. कथेने धारण केलेल्या रूपांचा व विशेषांचा अभ्यास तिच्या उत्क्रांतीच्या या अभ्यासात अभिप्रेत आहे. कथेच्या विविध अवस्था म्हणजे मराठी वाचकांच्या सामूहिक अभिरुचीचाही विकासक्रम होय.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

**कथेचे घटक आणि प्रकार**

लघुकथेत एखाद्या व्यक्तीच्या, व्यक्तिसमूहाच्या मानवी स्वभावाच्या , जीवनातील एखाद्या प्रसंगाच्या किंवा अनुभवाच्या एखाद्याच पैलूवर नेमका प्रकाश टाकून त्याचे किंवा एकाच मनोवस्थेचे दर्शन घडवलेले असते. अनुभवार्थ , कथानक , पात्रे , वातावरण , निवेदनपद्धती व भाषा हे कथेचे घटक असतात.

भयकथा, रहस्यकथा , विज्ञानकथा , ग्रामीणकथा , दलितकथा असे कथेचे प्रकार आहेत . कथेला एक निवेदक असतो. कधी एखादे पात्र निवेदन करते. संवाद हाही एक निवेदनप्रकार आहे. या निवेदनात घटना , प्रसंग आणि पात्रांच्या कृती असे तपशील गुंतलेले असतात. या घटना कथेतील पात्रेच घडवून आणतात. पात्रांच्या आश्रयानेच कथेतील अनुभवार्थ मूर्त होत असतो. ही पात्रे सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक पर्यावरणात जगात असतात. हे वातावरण हाही कथेचा महत्त्वाचा घटक असतो.

कथेच्या उत्क्रांतीत पात्राभोवतीच्या पर्यावरणाचाही महत्त्वाचा वाटा आहे. हेन्री जेम्स म्हणतो, What is character but the determination of incident ? What is incident but the illustration of character ? It is character that 'determines' he authors choices of external events and it is character that is further 'illustrated' by his or her reactions to these events. [१] घटना व पात्रे अशाप्रकारे परस्परांना घडवीत कथानकाची उभारणी करीत असतात. कथेतून साकार होणारे विश्व वास्तावाधिष्ठीत परंतु कल्पित असल्याने कथेतील भाषा परिचित भाषेसारखी; परंतु शब्दांचा विशेष प्रायोजक वापर करणारी ; प्रतिमा , प्रतीके यांचा समर्पक उपयोग करणारी असते.

**कथेची वैशिष्टे :**

शब्दार्थाद्वारे कथेची कल्पित वास्तवाची निर्मिती होत असते. घटना, पात्रे आणि स्थलाकालबद्ध वातावरण हे या कल्पित विश्वाचे मूळ घटक असले तरी अनुभवाचे व रचनेचे एकेंद्रीयत्व हे कथेचे वैशिष्ट्य असते. मितव्यय, संवेदनशीलता , संपृक्तता, काटेकोरपणा, नेमकेपणा तसेच सूक्ष्मदर्शित्व ही कथेच्या कलातंत्राची खास वैशिष्ट्य म्हणता येतील.

मराठीत ना. सी. फडके यांनी पहिल्यांदा मराठी कथेची तात्त्विक चर्चा केली. त्यांनी केलेली कथेची व्याख्या एडगर ॲलन पो याने मांडलेल्या कथेविषयीच्या सूत्रांशी मिळती जुळती आहे: कमीतकमी पात्रे आणि कमीतकमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकिगत म्हणजे लघुकथा होय , अशी लघुकथेची व्याख्या फडके करतात[२]. लघुकथेचा उत्क्रांतीप्रवास समजून घेण्यापूर्वी कथा आणि कादंबरी यांच्या तुलनेवरून मराठीत झालेली चर्चा समजून घेणेही महत्त्वाचे आहे.

**कथा आणि कादंबरी :**

मराठीत कथा आणि कादंबरी यांची तुलना होऊन कथेला तिच्या मर्यादित अवकाशामुळे कादंबरीपेक्षा दुय्यम ठरविण्यात आले. अनेक वर्षांत साहित्य अकादमीचा पुरस्कार फक्त एकाच संग्रहाला मिळाला. (जी. ए. कुलकर्णी, काजळमाया, १९७३) आता अलीकडे मात्र जयंत पवार, २०१३ आणि आसाराम लोमटे, २०१६ यांच्या कथासंग्रहांना मिळाले. डॉ. भालचंद्र नेमाडेंसारखे कादंबरीकार कथेला फसलेली कादंबरी म्हणतात.मात्र दुसरीकडे जी. एं.सारख्या प्रतिभावंताने आपल्या अभिव्यक्तीसाठी कथेचीच निवड केली.

' कथा हे कादंबरीचे लघुरूप नव्हे. दोन्ही वाङ्मयप्रकारांचा बाज , पोत, तंत्र , मंत्र आणि कलातंत्र ही विभिन्न आहेत. कथासुद्धा कादंबरीसारखा अनुभव देऊ शकते , याची कितीतरी उदाहरणे आहेत ; पण तरीही जीवनाचा विशालपट कादंबरीच्या अंगाने मांडता येईल तितका तो कथेच्या अंगाने साधने सोपे नाही. समग्र

जीवनदर्शनाची क्षमता कादंबरीत अधिक. सामाजिक अवधानातून मोठमोठ्या कादंबऱ्यांचा जन्म झाला आहे. समकालीन जीवनाशी कादंबरीचे नाते अधिक दृढ असते. मराठी कथेला मिळालेले घवघवीत यश हा एका अर्थी कादंबरीच्या विकासाला एक अडथळा ठरला.' ३ असे मत कादंबरीकार विश्वास पाटील व्यक्त करतात.

अर्थातच नेमाडे किंवा विश्वास पाटील यांची ही मते पटण्यासाराखी नाहीत. ती आकाराने स्फुट असल्याने तिला मर्यादित क्षमतेचा व गौण साहित्यप्रकार ठरवून एकूणच मराठी कथेच्या गुणवत्तेविषयी शाशंकता व्यक्त करणारी ही भूमिका आहे. खरे तर प्रत्याकच साहित्यप्रकाराचे कलात्म निर्मितीचे व जीवनदर्शनाचे खास असे सामर्थ्य असते. ते ओळखणे महत्त्वाचे असते. कोणत्याही साहित्यप्रकाराला कलात्मक उंची आणि मान्यता निर्मिती करणारे लेखकच मिळवून देतात. जी.ए.कुलकर्णींसारख्या लेखकाने आयुष्यभर कथा आणि कथाच लिहिली ; आणि जीवनाचे तार्किक आणि अतार्किक स्वरूपाचे कलात्मक, प्रत्ययकारी व अंतर्मुख करणारे दर्शन आपल्या कथांमधून घडविले.

कथेत अनुभवाचे स्पंदन असते. तर कादंबरीत अनुभवाचा विस्तार ; म्हणूनच भावकाव्य आणि ललितगद्य यासारखीच कथाही स्फुट आणि आटोपशीर असते. कथेला Lonely Voice असे म्हणतात. ज्या समाजाचे सांस्कृतिक संचित खूप असते त्या समाजात अशा अनुभवाच्या विस्ताराला जागा असते; आणि अशा समाजात मग कथावाङ्मय फार फोफावतही नाही, याउलट ज्या समाजाचे सांस्कृतिक संचित क्षीण असते तिथे अनुभवाचा विस्तार फार होत नाही. याचे कारण कादंबरीत जशी जीवनाची जीवनधारणा व्यक्त होते. तशी कथेतून फक्त एकाच व्यक्तीची जीवनधारणा व्यक्त केली जाते.

### मराठी कथेची उत्क्रांती आणि अभीरुचीची उत्क्रांती

कोणत्याही समाजाची अभिरुची जसजशी उत्क्रांत होते ; तसतसा वाङ्मयाचा विकासही होतो. या विकासक्रमासोबतच काळानुरूप त्या त्या वाङ्मयप्रकाराचे रूपही बदलत जाते. कथेच्या बाबतीतही तेच झाले. साहित्यकृतीचा प्रत्यय घेण्याची वाचकाची क्षमता अभिरुची या संज्ञेत अभिप्रेत आहे. त्यासाठी त्याच्याजवळ विशेष सौंदर्यदृष्टी जशी हवी ; तशीच काळाच्या कसोटीवर तपासून घेणारी सामाजिक आकलनाची क्षमताही हवी. साहित्याचे मर्म समजून घेण्यासाठी व सौंदर्याचा वेध घेण्यासाठी सौंदर्यदृष्टी आवश्यक असते. मानवी स्वभाव आणि मानवी जीवन यांच्या संदर्भातील खोली, उत्कटता , व्यापकता व व्यामिश्रता यात आशयाचे सौंदर्य वास करीत असते. साहित्यिक हे सौंदर्य हेरतो नि त्या अनुभवाचा कलात्मक आविष्कारातून अभिव्यक्त होण्यासाठी वेगवेगळी माध्यमे स्वीकारतो.

अशी नवनिर्मिती करतानाच आपल्या माध्यमामध्ये नवनवे प्रयोगही करत असतो. अभिरुचीत या माध्यमाची जाणकारी अपेक्षित आहे. कोणत्याही समाजात ही अभीरुची उत्क्रांत होत असते. काळावरोबर त्या त्या वाङ्मयप्रकाराचे रूप म्हणूनच बदलत जाते. कथेच्या बाबतीतही तेच झाले.

### नियतकालिकांच्या आश्रयाने उत्क्रांती

मराठी नियतकालिकांनी मराठी कथा घडविली आहे. तिचे संगोपन, अभिवृद्धी प्रक्रियेत नियतकालिकांची कामगिरी इतिहासप्रसिद्ध आहे. त्यामुळेच कथेच्या संदर्भात कालखंडाचा निर्देश नियतकालिकांच्या नावाने केला जातो. प्रत्येक कालखंडातील नव्या वाङ्मयीन चळवळींची अभिव्यक्ती करण्यासाठी प्रत्येकवेळी नवनवी नियतकालिके पुढे आली.

मराठी कथेच्या जन्मानंतर गेल्या दिडशे वर्षात दिडशेच्यावर नियतकालिके आणि आणि अनियतकालिके जन्माला आली . या नियतकालिकांच्या आश्रयाने मराठी कथा आपल्या समाजात रुजली आणि वाढलीही. कथेच्या स्थित्यंतरांच्या कालखंडांना आपण नियतकालिकांच्याच नावाने ओळखतो . एकोणिसाव्या

शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात निबंधाची जागा हळूहळू कथांनी घेतली आणि कथेने तिचे प्रबोधन हे उद्दिष्ट बदलून मनोरंजन कसे केले हे पाहण्यासारखे आहे.

१८८०नंतर हरीभाऊंच्या स्फुट गोष्टी करमणूक मासिकातून येऊ लागल्या. कथेच्या हा टप्पा म्हणजे करमणूक कालखंड. या कालखंडातील कथांमध्ये मराठी कथेच्या प्रारंभीच्या पाऊलखुणा दिसतात. या स्फुटकथांच्या कालखंडालाच करमणूक- मनोरंजन कालखंड म्हणून ओळखले जाते. मनोरंजन कालखंड हा खरे तर १८९५ ते १९२५ पर्यंतचा कालखंड. या कालखंडात मराठी कथेची भरभराट झाली. तिच्या अस्ताव्यस्त व विस्कळीत रूपाबंधाचा लोप होऊन ती आटोपशीर झाली. याच काळात भाषांतराद्वारे इंग्रजी व बंगाली कथांचा परिचय मराठी वाचकांना होत होता. कथेची लोकप्रियता एव्हढी होती की लोक केवळ कथेसाठी मनोरंजनची वाट पाहत असत.

मनोरंजनने मराठीला व्ही.सी. गुर्जर आणि दिवाकर कृष्ण केळकर हे दोन महत्त्वाचे कथाकार दिले. गुर्जरांनी स्फुट गोष्टीला चटकदार करत तिची संपूर्ण गोष्ट केली; परंतु या संपूर्ण गोष्टीला कथा बनवण्याचे श्रेय दिवाकर कृष्णाचे. त्यांनी कथेला काव्यात्म उंची दिली . त्यांची 'अंगणातला पोपट' ही अतिशय भावपूर्ण कथा मनोरंजनमध्ये प्रकाशित झाली. दिवाकर कृष्ण यांनी फक्त एकवीस कथा लिहून मराठीतल्या आधुनिक कथापर्वाचा आरंभ केला. अंगणातला पोपट या त्यांच्या कथेला मन्वंतर करणारी कथा मानली जाते.

त्यानंतरचे दोन कथाकार म्हणजे ना.सी. फडके आणि वि.स. खांडेकर. ना.सी. सुखवादी तर वि.स.हे आदर्शवादी. दोन भिन्न प्रवृत्तीच्या या कथाकारांनी १९४५ पर्यंत मराठी मनावर अधिराज्य गाजवले. रत्नाकर, यशवंत व किर्लोस्कर तसेच ज्योत्स्ना या मासिकांमधून त्यांच्या कथा प्रसिद्ध व्हायच्या. या नियात्कालीकांचीही लोक वाट पहायचे ते कथांसाठीच. या काळातील कथा स्वप्नरंजनवादी आहे ; कारण ती कथा वाचणारा वाचक आत्मरत व सुखवादी होता. प्रखर वास्तवाचा स्वीकार करण्याची त्याची प्रवृत्ती नसल्याने या कथांमधील प्रतीकात्म वास्तव त्याला आकर्षून घ्यायचे. ही स्वप्नरंजनवादी कथा त्या काळातील वाचकांच्या अभिरुचीचे प्रतिनिधित्व करते.

या स्वप्नरंजनापेक्षा वेगळ्या वस्तुनिष्ठ आणि कलात्मक कथा त्या काळात विभावरी शिरुरकर, कुसुमावाती देशपांडे या स्त्रीलेखिकांनी तसेच सरदेसाई , ग.ल.ठोकळ ,रं.वा. दिघे, या,गो.जोशी, महादेवशास्त्री जोशी , मराठवाड्यातील बी. रघुनाथ, मराठी कथेची व्याप्ती उपेक्षितांचे अंतरंग लिहून वाढवणारे श्री.म. माटे यापैकी कोणालाही वैयाक्तिकरीत्या फडके खांडेकरांच्या प्रभावातून मराठी अभिरुचीला बाहेर काढता आले नाही.

**सत्यकथा- अभिरुची कालखंड**

पुन्हा एकदा नियतकालिकांनी या काळातील आवर्ततेची कोंडी फोडली . कथेला साचलेपानातून बाहेर काढले. १९४० नंतरचा हा कालखंड नवकथेचा कालखंड होय. त्याला सत्यकथा- अभिरुची कालखंड म्हणून ओळखले जाते. कथाक्षेत्रात या नियतकालिकांनी कथाक्षेत्रात मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणले. वाचकांच्या अभिरुचीतही संक्रमण घडले. त्यासाठी कथेचे संगोपन व अभिवृद्धी या नियतकालिकांनी सक्रिय होऊन केलेली कामगिरी इतिहासप्रसिद्ध आहे. अभिरुचीच्या पहिल्याच अंकात उत्कृष्ट लघुकथा दुर्मिळ वस्तू झाल्याचा उल्लेख आहे. त्या काळातील नियतकालिकांमधून जसे मराठी कथेचे नवे उन्मेष प्रकाशित होऊ लागले. त्या जोडीनेच नवसाहित्यातील समीक्षा आणि वाद-चर्चा यांनाही प्रसिद्धी मिळाली. त्यातूनच नवे कलासंकेत निर्माण झाले. प्रस्तापित कलाभिरुची आणि नवसाहित्य यामध्ये जोरदार संघर्षही झाला. असा संघर्ष होणे हे साहित्याच्या निरोगीपणाचे द्योतक आहे.

समकालीन साहित्यसंकल्पनांना नवसाहित्याप्रमानेच नवकथेनेही आव्हान दिले . अश्लिलता , वैफल्य-ग्रस्तता, दुर्बोधता , जंतुवाद , कुरूपता , बिभत्सता , परपुष्टता , तंत्रशुद्धता या आरोपांचे हल्लेही नवकथेवर झाले. जुन्या नव्या कथाकारांमध्ये झालेली वाग्युद्धे म्हणजे अभिरुची संघर्षाचा जोरदार नमुना होता. त्यातून कथेच्या उत्क्रांतीला बळ मिळाले . ना.सी . फडके , पु. भा.भावे, व गंगाधर यांची अशी वाग्युद्धे झडली.

१९४४- ४५ या कालखंडाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे दुसऱ्या महायुद्धामुळे जगाच्या व देशाच्या जीवनातही प्रचंड उलथापालथ झाली व नवविचारांचे वारे वाहू लागले. याघटनेचा वाङ्मयावर परिणाम झाल्यानेही कथेच्या आशय-अभिव्यक्तीत आमूलाग्र बदल झाला. जीवनाचे अधिक सूक्ष्म , वास्तव व विविध पातळ्यांवर दर्शन नवकथेत दिसू लागले. १९४५-१९६० हा या नवकथेच्या उदय-विकासाचा कालखंड. गंगाधर गाडगीळ , पु. भा. भावे, अरविंद गोखले आणि व्यंकटेश माडगूळकर या कथाकारांनी नवकथेची निरनिराळी परिमाणे साकार केली. एकीकडे व्यंकटेश माडगूळकरांसारखे कथाकार ग्रामीण जीवनसंस्कृतीचे मर्म उलगडून दाखवत होते. ते ग्रामीण कथेचे अग्रदूत मानले जातात. दुसरीकडे मुंबईसारख्या शहरात सुरु झालेल्या महानगरीकारानाचे पडसाद गाडगीळांसारख्याच्या कथेत उमटले.

शांताराम, दि.बा. मोकाशी, सदानंद रेगे, असे अनेक कथाकार नवकथेला साकार करू लागली. १९६० च्या टप्प्यावर ही नवी कथासृष्टी स्थिरावलेली दिसते. नवकथाही पुन्हा एकदा नव्या संकेतात अडकली की काय अशी भीती या काळात प्रसिद्ध समीक्षक वा. ल. कुलकर्णी व्यक्त करतात. मराठी कथासाहित्यातले मानदंड यानंतरच्या काळात ठरले ते जी. ए. कुलकर्णी. मराठी कथापरंपरेचे सर्व संकेत सांभाळूनही त्यांची कथा स्वतंत्र आहे. या साहित्यप्रकारातील कलात्मक शक्यतांची संपन्नता त्यांनी अनुभवली असे म्हटले जाते. विद्याधर पुंडलिक , शरच्चंद्र चिरमुले , श्री.दा. पानवलकर, शंकर पाटील , ए. वि. जोशी , ज्ञानेश्वर नाडकर्णी , वि. शं .पारगावकर , आनंद जातेगावकर , ह. मो. मराठे अशी पुढची नावे आहेत.

१९४६ मध्ये सांप्रदायिक दंगलींना ऊत आला. फाळणीच्या पृष्ठभूमीवर हत्याकांडाचे सत्र सुरू झाले. या यादवीत युद्ध , कत्तली आणि रक्तपातात कोट्यवधींच्या आयुष्याची राखरांगोळी झाली.या घटनांचा परिणाम भावे, सदानंद रेगे, अरविंद गोखले वगळता इतर कथाकारांवर दिसत नाही. कथा वाङ्मयाला या काळात प्रमुख साहित्य-व्यवहारात महत्त्व असूनही फाळणीचे परिणाम इतके अत्यल्प का झाले याचे आश्चर्य वाटते.

१९६० नंतर साहित्यात अवतरलेले अद्‌भूत अनुभवांचे लक्षवेधी प्रवाह म्हणजे दलित कथा व ग्रामीण कथा. बाबुराव बागूल यांची ' मरण स्वस्त होत आहे.' सारखी कथा दलित जाणिवेसोबतच मुंबई महानगरीचे वकालपणही चित्रित करते. दुःख हे शोषणातून निर्माण होते या त्यांच्या भूमिकेतून वर्गसत्तेचेच नाही तर पुरुषसत्तेचे बळीही चित्रित केले जातात.

ग्रामीण साहित्य आणि संस्कृती या ग्रंथात मोहन पाटील म्हणतात, 'गाव हीच ग्रामीण साहित्यामागची खरी प्रेरणा आहे. गावाच्या मातीचे संस्कार, तिथले प्रामाणिक अनुभव आणि पिंडधर्माने माती आणि माणसं याविषयी वाटणारा जिव्हाळा , गावाची रहाटी, तिथले समूहजीवन आणि त्या समूहजीवनातून वाहणारा अंतर्नाद ग्रामीण साहित्यातून उमटलेला असतो. ग्रामजीवन हा एक भारतीय जीवनाचा समांतर प्रवाह आहे. या प्रवाहातील अनमोल जीवित स्वानुभवातून सढळपणे आविष्कृत करता आले तर ते शब्दातून सांगण्याची उबळ आली तर तीच ग्रामीण साहित्याची प्रेरणा ठरेल' ६ हे नवे प्रवाह हाही कथेच्या उत्क्रांतीचा टप्पाच होता. पुढे बदललेल्या ग्रामीण समाजाचे चित्रणही कथांमधून उमटू लागले. नवे औद्योगिक धोरण व गावातून दिसणारे नवनवे व्यवसाय आणि त्यामुळे विस्कटलेली परंपरागत जीवनाची घडी या संदर्भातील प्रश्न या नव्याबदलात समाविष्ट होते.

**नव्वदोत्तरी कालखंड**

नव्वदोत्तरी कालखंडावर दृष्टीक्षेप टाकण्यापूर्वी १९८० ते १९९० या कालखंडाकडे पहावे लागते. लघुकथेला जिवंत ठेवणारी विविध नियतकालिके बंद पडू लागली. १९८० नंतर कथेतील नव्या उन्मेषांना वाव देऊन तिच्या प्रयोगशीलातेला वाव देणारी नियातकालिके अस्तंगत झाली एव्हढाच भाग महत्त्वाचा नाही, तर ज्या मोजक्या नियातकालिकांतून अशा कथा प्रकाशित होतात त्या नियातकालिकांना चालविण्याच्या अभिरुचीचाही परिणाम तसेच लेखक वाचकांना संस्कारीत करणारा मर्यादित अवकाश या अशा अनेक कारणांमुळे या काळातील कथेची घुसमट झालेली दिसते. १९८२ ला सत्यकथा बंद पडले. त्यानंतर वृत्तपत्रांच्या रविवार पुरवण्यांची वाढ , इतर प्रसारमाध्यमांची वाढ, इतर प्रसारमाध्यमांची व्याप्ती व शक्ती यांची आकर्षणे अशा अनेक कारणांनी वाचक वर्गाताही विभागाला गेला. आजही नवी नियतकालिके आर्थिक ताणाला तोंड देऊ शकत नाहीत, असेच चित्र आहे. बदलत्या सांस्कृतिक पर्यावरणाला तोंड देणे हे वाचक अभिरुचीसाठी अवघड झाले आहे.

सकस ग्रंथव्यवहार, वाङ्मयीन नियतकालिके व वाचन संस्कृतीवराच प्रतिकूल परिणाम, असे एक चित्र तर दुसरीकडे ग्रंथप्रकाशनांची विपुलता तसेच बहुसंख्य वाचकांना डोळ्यांपुढे ठेऊन लोकप्रिय ढंगाच्या नियतकालिकांचे पेवही फुटले आहे. वाचानाखेरीज अन्य मार्गांनी व माध्यमातून कथा सादर होत आहे. दूरदर्शनवर मालिकांचा सुळसुळाट झाला. तिथे बाजारमूल्य प्रधान आहे. कथेचा वाचक हा दर्शक झाला तर कथासंस्कृती जिवंत कशी राहील ?

नव्वदोत्तर मराठी कथेच्या संदर्भात भारत सासणे यांनी काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदविली आहेत. ती संक्षेपाने अशी : १९८० ते १९९० या अतिशय संवेदनशीलआणि महत्त्वाच्या व उलथापालथ करणाऱ्या काळात कथेतील मरगळ कथाकारांना जाणवत होती. कथा स्तब्ध आणि ग्लानिबद्ध झाल्याने जुना आकृतिबंध मोडून काढण्याची गरज भासू लागली. जागातिकीकरणाबाबत चर्चा सुरू झाली. नव्वदनंतरची कथा याच दशकातून पुढे आली'5

विजया राजाध्यक्ष, रंगनाथ पाठारे, विलास सारंग, श्याम मनोहर, ह.मो. मराठे ,एस. डी. इनामदार , आशा बगे, सानिया, ज्योत्स्ना देवधर , वसुधा पाटील, भारत सासणे , रवींद्र शोभणे , राजेंद्र बनहट्टी , मनोहर शहाणे <वसंत नरहर फेणे, रत्नाकर मतकरी, भास्कर चंदनशिव, अनिल रघुनाथ कुलकर्णी, अनुराधा वैद्य , मेघना पेठे, नागनाथ कोतापल्ले अशी यादी लेखकांची दिली जाते ज्यांनी या कालखंडात व पुढे नंतरही करीत राहिले.

भरत सासणे म्हणतात, '१९९० पूर्वीच्या आधुनिक १९९० कालखंडातली कथा ही समूह जीवनाच्या स्वारस्यातूनप्रवाहित होऊन नंतर अपरिहार्यपणे व्यक्तिकेंद्रित होत गेली.गर्दीत हरवलेल्या माणसाचा शोध घेण्याचे मोठेच कुतूहल १९९० पूर्वीच्या कथांमध्ये दिसते. हा महानगरीय माणसाचा चेहरा होता.कथासाहित्याची एकूणच शक्ती वाढीस लागून व्यक्त होण्याच्या विविध शक्यता निर्माण झाल्या. शैलीचे प्रयोग व विषयाचे वैविध्य असले तरी , आधुनिक युगाच्या वास्तवाचे पुरेसे भान लेखकांना नसल्यामुळे या अपुऱ्या आकालानाचा प्रभाव कथेला ग्लानी आणण्यास कारणीभूत ठरला.'६

१९९० नंतरची कथा उत्तरआधुनिक कालखंडातली कथा आहे ; पण जागतिकीकरणामुळे उत्तरआधुनिक कथेचा हा चेहरा व स्वभावही बदलू लागला आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा स्फोट हे या काळाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य. मानवी मनाचा शोध अधिक जोरकसपणे घेता येऊ शकतो हे माहीत झाल्याने पूर्वीची मनोविश्लेषणात्मक कथा आता अधिक गडद झाली. उत्तरआधुनिक काळातील कथा विश्वमनाचा शोध घेऊ लागल्याने पुन्हा एकदा व्यक्तिजीवनाकडून समूहजीवनाकडे तिचा प्रवास करू लागली आहे.

[illegible]

[illegible]

## निष्कर्ष व समारोप

1. कथेचा आशयाला मर्यादित असल्या तरी जीवनानुभव प्रकट करण्याची तिची क्षमता मर्यादित नाही हे मराठीतील समृद्ध कथासाहित्याने सिद्ध केले.
2. लोककथा ही मराठी कथेची सुरुवात होय. प्राचीन काळापासून ते आपल्या मौखिक परंपरेतूनही आधुनिक कथा एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अस्तित्वात आली. ती लघुकथा नावाने [illegible] शैली, कहाणी, गोष्ट, स्फुट गोष्ट, लघुकथा, नवकथा असा प्रवास हा साहित्यप्रकार उत्क्रांत होत गेला.
3. मानवाच्या बदलत्या अभिरुचीच्या विकासक्रमातून मराठी कथा उत्क्रांत झाली. आधुनिक अभिरुचीचा हा विकासक्रम लक्षवेधक आहे. कथेच्या या उत्क्रांतीत विचार केंद्रीभूत [illegible] बदलत्या पर्यावरणाचाही महत्त्वाचा वाटा आहे.
4. ना. सी. फडके यांनी मराठी कथेची [illegible] चर्चा केली. विश्राम पाटील आणि [illegible] यांनी कथेला [illegible] [illegible] नाही हे [illegible] [illegible] सिद्ध केले.
5. मराठी कथेची उत्क्रांती [illegible] झाली. [illegible] आणि [illegible] [illegible] कालखंडात कथेने [illegible], [illegible] होत गेली. ती १९६० नंतर स्थिर झाली.
6. १९४५ च्या [illegible] कालखंडाची [illegible] मराठी कथेने [illegible] घेतली नाही.
7. [illegible] कालखंडातली कथा [illegible] आधुनिक [illegible] आहे ; परंतु जागतिकीकरणानंतर निर्माण झालेल्या नव्या प्रश्नांचे आव्हान आज [illegible] उभे आहे . [illegible] कालखंडात तिच्या उत्क्रांतीचा पुढचा टप्पाही स्पष्टपणे [illegible].

## संदर्भ


1. [illegible] (१९८४) प्रकाशित लेखांतून
2. लघुकथा लेखन : तंत्र व मंत्र , [illegible] प्रकाशन, पुणे १९५२ , पृ. ३७
3. [illegible] , [illegible] [illegible] प्रकाशन , १९९३ , पृ. १३ ते ६३
4. ग्रामीण साहित्य व संस्कृती , पाटील [illegible] , [illegible] प्रकाशन , औरंगाबाद , २००३

E-ISSN :
2348-7143
Oct.-Nov.-Dec.
2020

५. नव्वदोत्तर मराठी कथा , सासणे भारत,( लेख / खेळ ) जा. फे .मा .२०१२ ,पृ.१३ ते २६

६. तत्रैव , पृ.८

इतर संदर्भ

१. संज्ञा-संकल्पना कोश, संपादक :गणोरकर प्रभा, डहाके वसंत आबाजी , जी. आर. भटकळ फाउंडेशन मुंबई, २००१

२. संक्षिप्त वाङ्मयकोश, संपादक : गणोरकर प्रभा , डहाके वसंत आबाजी , जी. आर.भटकळ फाउंडेशन, मुंबई , २००४

३. कथा : संकल्पना आणि समीक्षा, जोशी सुधा , मुंबई विभाग मुंबई विद्यापीठ आणि मौज प्रकाशन गृह , मुंबई, २०००.

४. साठोत्तरी ग्रामीण कथेतील वास्तव , ( लेख / मुक्तशब्द ) यशवंत चव्हाण, जून २०१० ,

५. प्रदक्षिणा, खंड १ ला , खंड २ रा , कॉन्टीनेन्टल प्रकाशन

६. मराठी कथा : उगम आणि विकास , शेवडे इंदुमती , सोमय्या मुंबई, १९७३

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

December-2020






Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor :
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

## December - 2020

ISSUE No – 267 (CCLXVII)

**Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law**

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.Dinesh W.Nichit**
**Editor :**
**Principal**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

Aadhar INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 19 | नागपूर जिल्ह्यातील जमिनीचा सामान्य उपयोग— भौगोलीक अध्ययन<br>डॉ. सुषमा ल. दामोदरे | 70 |
| 20 | राष्ट्रनिर्माते, ज्ञानोपासक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>कु. सरिता वि. स्थुल / डॉ. प्रतिभा गौतम ताकसांडे | 75 |
| 21 | संगीत शिक्षा पध्दतीची बदलती स्थिती प्रा.वंदना मारोतराव इंगोले | 81 |
| 22 | आधुनिक वैश्वीकरण एवं उपभोक्तावादी युग में वृद्धों की समस्याए : एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>डॉ. वर्षा भुजबळ | 83 |
| 23 | भारताच्या फाळणी दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका<br>डॉ.वासुदेव वा. भगत | 88 |
| 24 | केशव मेश्राम यांच्या कथांचे अंतरंग : एक आकलन<br>प्रा.डॉ. अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ | 92 |
| 25 | लोकतंत्र में मीडिया की भूमिका डॉ.नरेंद्र केशव पाटील | 98 |
| 26 | पुढां स्नेह पाझरें \| मागा चालती अक्षरें \| प्रा. डॉ. गणेश भि. मोहोड | 104 |
| 27 | लिंगभाव विरहित अर्थसंकल्प—वास्तविकता<br>प्रा.सतिश आर.जाधव | 108 |
| 28 | कोरोना (कोविड — १९) सामाजिक समस्या— एक अध्ययन<br>प्रा. डॉ. जयमाला लाडे | 113 |
| 29 | सुरेश भटांच्या नंतरची मराठी गझल डॉ. तीर्थराज कापगते | 118 |
| 30 | ऋग्वेद में'रात्रि' का उदात्तीकरण डॉ. ओमकुमार टेम्पे | 126 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 267 (CCLXVII)
ISSN : 2278-9308
December, 2020

# सुरेश भटांच्या नंतरची मराठी गझल

डॉ. तीर्थराज कापगते
श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ

१९६० नंतरच्या कालखंडातील मराठी कवितेत आपला वेगळा रंग जपणाऱ्या कविवर्य सुरेश भटांनी गझल या काव्यप्रकाराचा निष्ठापूर्वक स्वीकार केला. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर -

तशी माया तिजोऱ्याला कुठे माझ्या घरी होती ?
पहारी राखण्यासाठी जगाची ओसरी होती
अरे, ह्या जिंदगानीची कधी मी काळजी केली
मला सांभाळण्यासाठी मराठी वैखरी होती

त्यांच्या प्रत्यक्ष जगण्यातून आणि कलंदर व बंधमुक्त जीवनशैलीतून अतिशय प्रभावी शब्दसामर्थ्याने मराठी गझल निर्माण. गझलेची फारसी व उर्दू वैशिष्ट्ये त्यांनी आत्मसात करून मराठीत सर्वोत्कृष्ट गझला लिहिल्या. खूप आतला सूर लावून ह्या गझला अंतःस्फूर्तीने आळवल्या. केवळ त्यांच्यामुळेच त्या रचनाबंधाला मराठीत अत्यंत प्रतिष्ठा मिळून तो प्रकार लोकप्रिय झाला. संपूर्ण महाराष्ट्र पालथा घालत त्यांनी तिचा दृढतेने प्रचार केला. भटांच्या प्रभावाने बघता बघता अनेक कवी त्यांच्याकडून गजलशास्त्राचे धडे घेऊन उत्तम गजला रचू लागले. महाराष्ट्रात गझल लिहिणाऱ्यांची संख्या तीनशेच्या वर असावी. आज तो मराठीतील एक महत्त्वाचा व लोकप्रिय काव्यप्रकार मानला जातो. भट यांच्या काळात आणि त्यानंतरही लिहीत राहिलेल्या महत्त्वाच्या गझलकारांच्या गझलांची तपासणी करून तिच्या वाटचालीचा व गुणवत्तेचा शोध घेत काही निरीक्षणे प्रस्तुत शोधनिबंधात नोंदविली आहेत.

गझलेचा फारसी ते मराठी प्रवास

इराणमध्ये दहाव्या शतकात पर्शियन भाषेत गझलेचा जन्म झाला. मुळात गझल हे नाव गझील् या अरबी धातूपासून तयार झाले आहे ;आणि ते स्त्रीलिंगी असून त्याचा अर्थ प्रेमालाप करणे असा आहे. पुढे त्यात राजकारण, समाजकारण, समाजस्थिती, देशस्थिती, देवधर्म, तत्त्वज्ञान,

असे विषयवैचित्र्य आले. अरबी भाषेत गझल हा काव्यप्रकार आढळत नाही, असे उर्दूचे अभ्यासक डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी म्हणतात. गझील् , गझल, गज़ल, गज्जल असा शब्दप्रवास करत फारसीतून उर्दूत, उर्दूतून हिंदीत आणि इतर भारतीय भाषांमध्ये व पुढे मराठीत हा काव्यप्रकार आला व रूजला.

मुस्लीम शासकांच्या आगमनामुळे आलेल्या सूफी संतांसोबत प्रार्थनेच्या स्वरूपात गझल प्रथम भारतात आली. भारतात 'मोईनुद्दीन चिश्ती' या सूफी संताने फारसी भाषेत बाराव्या शतकात पहिल्यांदा गझल लिहिली. नंतर तुघलक साम्राज्याचा राजकवी आणि अल्लाउद्दीन खिलजीच्या दरबारातील अधिकारी अमीर खुसरोमुळे तिला चालना मिळाली. मोगल बादशहांच्या राजाश्रयाने ती वाढली. पुढे मुस्लीम पातशाह्यांमध्ये सतराव्या शतकापर्यंत 'उर्दू' ही बोलीभाषेच्या स्वरूपात पुढे आली. अशा पातशाह्यांपैकी निजामशहाच्या दरबारातील 'वली दकनी' हा उर्दूचा पहिला कवी मानला जातो. अठराव्या व एकोणीसाव्या शतकात मीर, जफर, जौक, गालिब (मिर्जा

असदुल्ला खाँ) मोमीन या कवींनी उर्दू भाषेत श्रेष्ठ दर्जाची गजल लिहिली. अठराव्या शतकापर्यंत उर्दू गझल भारतभर लोकप्रिय ठरली. उर्दूतून तिचा प्रवास भारतीय भाषांमध्ये झाला.

मराठीत ही गझल उत्तर पेशवाईत अमृतराय यांच्याद्वारे आली. १९२०- ३० च्या दरम्यान माधवराव पटवर्धन यांनी फारशी वृत्ते वापरून गझलनिर्मिती केली.गझलेसाठी त्यांनी गज्जल असा शब्द वापरून तिला पुल्लिंगी रूप दिले. त्यांनी स्वत:च्या अशा रचनांना ग़ज़ल शैलीतील भावगीते म्हटले आहे. अरबी- फार्सीमधील ६७ वृत्तांचा परिचय करून देत उर्दू गझलचे छंदशास्त्र त्यांनी मराठीत आणून त्यांनी मराठी भाषेला महत्त्वाचे योगदान दिले. डॉ. अविनाश कांबळे म्हणतात ,' तंत्रशुद्ध, खऱ्याखुऱ्या गझलेच्या प्रवासाला निघालेल्या मराठी कवितेला माधव जूलियनांचा एक मोठा व महत्त्वाचा टप्पा पार करावा लागला ' १

सुरेश भटांची गझल

कशास पाहिजे परंपरा तुला तुझीच तू परंपरा बनून जा
लकाकशील तू उद्या विजेपरी, अताच शब्द शब्द मंतरून जा...

अशा अदम्य आत्मविश्वासाने मराठीत गजल घेऊन अवतरलेल्या फकिरी वृत्तीच्या बेदरकार माणसाचे नाव सुरेश भट ! सुमारे १९५० पासून भटांनी काव्यलेखनाला सुरुवात केली. १९५५-५६ पासून त्यांनी गझल फॉर्ममध्ये लेखन सुरू केले. पण ती जाणीवपूर्वक न लहिता कळतनकळत लिहिली गेली अशी कबुली त्यांनीच दिली आहे.२ १९६१ मध्ये प्रकाशित झालेल्या 'रूपगंधा' मध्ये बहात्तर कवितांपैकी फक्त सातच गझला आहेत. १९६३-६४ पासून मात्र त्यांनी ठरवून गझललेखन केले. त्यांचा 'रंग माझा वेगळा' हा संग्रह १९७४ चा त्यात गजलांची संख्या बत्तीस आहे. पुढच्या १९८३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'एल्गार' या संग्रहात पाच कविता सोडल्या तर सर्व म्हणजे एक्याण्णव गझला आहेत. 'झंझावात' मधील एक्क्याण्णव पैकी पंचाहत्तर गझला आहेत. म्हणजे त्यांनी सुमारे दोनशेच्या वर त्यांनी गझला लहिल्या.

भटांच्या नंतरची गझल

सुरेश भटांच्यानंतर तीन प्रकारे गझल लिहिलेली दिसते. सुरेश भटांच्या गझलांना प्रमाणभूत मानून लहिलेली, गझलविचारांचा स्वीकार करून आणि गझलेच्या वातावरणाचा परिणाम म्हणून लिहिलेली गजल. १९७० ते १९७५ या दरम्यान भटांच्या प्रभावातून अनेक जुने नवे कवी गझल लेखनाकडे वळले. सुरेश भट यांच्या समकाळात आणि त्यानंतरही लिहित्या राहिलेल्या गझलकारांनी समर्थपणे गझल हाताळली. त्यात भटांचे समवयस्क आहेत. त्यांनी भटांचा स्वत:वरील प्रभाव मान्य करून गझल लहिली. त्यापैकी दत्ता हसलगीकर हे महत्त्वाचे कवी.

तुझ्यापाशी मला काही जरा सांगायचे होते
तुलाही द्यायचे होते मलाही द्यायचे होते
तुला घेवून एकांती नभाच्या मांडवाखाली
कळीशी बोलतो वारा तसे बोलायचे होते

'उन्हातल्या चांदण्या' या त्यांच्या कवितासंग्रहाच्या मलपृष्ठावर सुरेश भटांचे काव्यविचार छापले असून त्या संग्रहात आठ गझला आहेत.

दुसरे रत्नागिरी जिल्ह्यातले कवी 'खावर' हे खरे तर उर्दू गझलकार; पण हेही भटांच्या प्रभावामुळे मराठी गझलेकडे वळले. 'गझलात रंग माझा' हा १९८५ मध्ये त्यांचा अतिशय छोटेखानी संग्रह आहे. त्यांच्या या संग्रहातील गझला साध्यासोप्या, काहिशी बाळबोध वाटते. हिमांशू कुलकर्णी हे भटांपेक्षा दहा वर्षांनी लहान आहेत. यांनी सुरेश भटांच्या वळणाची तंत्रशुद्ध गझल लिहिली

थोडा उजेड ठेवा अंधार फार झाला

पणती जपून ठेवा अंधार फार झाला

सतीश इनामदार व अनिल कांबळे हे दोघेही कुळकर्णींच्याच तयाचे, ते दोघेही यशस्वी गझलकार आहेत. त्यांच्यावर भटांच्या आशय व अभिव्यक्तीचा परिणाम आहे.

गझलेची चळवळ व गझल संप्रदाय

त्यानंतरचे १९८० ते १९९० हे दशक गझलेच्या दृष्टीने गाजले. या दशकात मराठीत तंत्रशुद्ध गझल रुजली. फारशी-उर्दू गझलेचे फक्त तंत्र तिने काटेकोरपणे स्वीकारले आणि उर्दू गझलेच्या तोडीची गझल रचूनही आपले मराठीपण कायम ठेवले. नंतरच्या पिढीसाठी सुरेश भटांनी प्रचंड परिश्रम घेतले. एखादा काव्यप्रकार अभिवृद्ध करण्याचा हा अनन्य प्रयत्न अपवादभूत आहे. आणि ऐतिहासिकही आहे. मराठी गझल महाराष्ट्रात रुजावी आणि वाढावी म्हणून त्यांनी जीवाचे रान केले. गझल निर्मितीचे स्तोम वाढले आहे अशा चिंतेतून सुरवातीला उलटसुलट चर्चा व गदारोळ झाला. १९८८ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात गझलेचे 'मराठी कवितेवर आक्रमण' असा एक परिसंवादच आयोजित करण्यात आला. पण या काव्यप्रकारात एक अंगभूत शक्ती आहे असा भटांना ठाम विश्वास होता. त्यांनी महाराष्ट्रात निष्ठेने गझल जगवली, रुजवली, सजवली आणि फुलवली सुद्धा. गझल ही चळवळ व्हावी, आंदोलन व्हावे हा त्यांचा ध्यास होता. या त्यांच्या ध्यासाला फळे आली ; आणि पाहता पाहता त्यांचा गझल संप्रदाय संपूर्ण महाराष्ट्रभर पसरला व बहरला. नांदेड, सोलापूर, धुळे, वर्धा, नाशिक, अमरावती, सिंधुदुर्ग, भंडारा, नंदूरबार, पुणे, ठाणे, नवी मुंबई एव्हढेच नव्हे तर इंदूर, ग्वाल्हेर, बडोदा, बेळगाव, केरळ अशा विविध भागांतून गझल लिहिली गेली.

हे त्यांचे कार्य अनेक अंगांनी चालले. नियतकालिकांमधून नव्या कवींच्या गझला प्रकाशित होऊ लागल्या. शरद करमरकरांचं 'शरदाचं चांदणं' आणि सुधाकर कदमांचं 'अशी गावी मराठी गझल' यासारखे गझलगायनाचे कार्यक्रम होऊ लागले. भट या सर्व बाबींकडे जातीने लक्ष द्यायचे. त्यामुळे उर्दूमधील गुरूशिष्य परंपरा मराठीतही सुरू झाली. अनेकांच्या कवितांवर भट स्वत; परिष्करण करायचे. अशा परिष्करणाला उर्दूत इसलाह म्हणतात. इसलाह म्हणजे संस्कार. उर्दूत अली सरदार जाफरीपासून ही परंपरा आहे. उदा. अरूण सांगोळे यांची एक रंगपंचमी नावाची सुंदर गझल आहे. तिचा मूळ मतला होता-

जीवनाची कुठे हमी आहे

श्वास प्रत्येक मोसमी आहे !

भट साहेबांनी इथे मतल्यामधील दुसऱ्या ओळीती 'प्रत्येक' शब्दाऐवजी 'एकेक' असा शब्द सूचवला आणि या एकाच शब्दाने मतलाच नव्हे तर संपूर्ण गझलच प्रभावी झाली.

जीवनाची कुठे हमी आहे

श्वास एकेक मोसमी आहे !

असे कितीतरी किस्से त्यांचे जीवलग शिष्य आणि गझलकार सांगतात. यावरून त्यांची शिष्यांविषयीची आत्मीयता आणि गझलेवर संस्कार करण्याच्या सूक्ष्म जाणिवेची कल्पना येते. असे त्यांचे मार्गदर्शन लाभलेली पिढी अद्यापही सशक्त गझललेखन करीत आहे.

मात्र भटांचा प्रभाव इतका असतो की एखादी रचना खूप सुंदर असूनही त्या रचना वाचताना आपण भटांना विसरायला तयार नसतो. त्यामुळेही अप्रत्यक्षपणे भटानंतरच्या अनेक चांगल्या गझलकारांवर अन्याय झाला. अशा कितीतरी सुंदर गझला आहेत.

प्रल्हाद सोनेवाने यांची बातमी नावाची एक गझल आहे :

तुलाच भेटते कशी तुकून बातमी
कुठून आणतोस तू खुडून बातमी

शिरेल पोचली जरी विराट श्रृहला
कुणी न वाचती चिडून बातमी

लोकराम शेंडे नावाच्या एका कवीने रदीफ म्हणून किती सुंदर प्रतिमा वापरली ते पहाण्यासारखे आहे.

फाटलेली नाव आणि ठीगळाचा काप माझा.
फेकती काढून कोणी जोडलेल्या अस्तराला ?

येथे अस्तर ही प्रतिमा या कवितेत किती बेमालूम सुचली आहे. भटोत्तरच्या गझलेकडे आपण अशा तारतम्य आणि संयमाने पाहिले पाहिजे.

गझलकारांची समर्थ फळी

१९८०-९० च्या दरम्यान नव्या दमाच्या गझलकारांची एक समर्थ पिढीच पुढे आली. त्यात प्रदीप निफाडकर, ल.स. रोकडे, राजू जाधव, श्रीकांत कोराम्रे, चंद्रशेखर सानेकर, म.भा. चव्हाण, इलाही जमादार, अरुण सांगोळे, दीपक करंदीकर, सर्वोत्तम केतकर, हृदय चक्रधर, ए. के. शेख, गंगाधर पुसदकर, बबन सराडकर , ही यादी मोठी आहे.

विशेष म्हणजे संगीता जोशी, ज्योती बालिगा, शोभा तेलंग,कविता डवरे, नीता भिसे, भारती पोतदार, नंदिनी पाटील, आशा पांडे , सुलभा कामत, दीपमाला कुबडे, ललिता कोठीया, फातिमा मुजावर आश्लेषा महाजन अशा स्त्री गझलकारही त्याच कालखंडात निर्माण झाल्या. ही यादीही मोठी आहे. आणि ही फार वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे. विंदा करंदीकरांच्या 'तेच ते' ची आठवण यावी अशी जगण्यातील निरर्थकता दाखवणारी संगीता जोशी यांच्या या ओळी :

आयुष्य तेच आहे !
अन् हाच पेच आहे
हे दुःख नेहमीचे
होते तसेच आहे

उर्दू मध्ये कविता लिहिणाऱ्या कवयित्री भरपूर पण स्त्री गझलकार मात्र फार कमी. या गझलांमध्ये केवळ प्रेमाच्या छटा आणि स्त्रीवाद नाही तर चिंतनाच्या इतर पातळ्यांवरही या गझला कशा जातात हे तपासल्या पाहिजेत. कविता डवरेंची ही गझल पहा;

गीत गाते तरी सूर नाही खरा
आसवांचा असा पूर नाही खरा

गझलेला प्रतिष्ठी त करण्यात या सर्व गझलकारांनी आपापल्या परीने हातभार लावला. अशा संख्या आणि गुणात्मकता कायम राखणाऱ्या महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरच्या महत्त्वाच्या ७३ मानून 'काफिला' नावाचा पहिला प्रातिनिधिक गझल संग्रह १९९० मध्ये सुरेश भट आणि प्रा. अविनाश सांगोलेकर यांनी सम्पादित केला. त्याच्या प्रस्तावनेत संपादकांनी आश्वासन दिलेय की या संग्रहात रसिकांना चांगली गझलच नव्हे तर चांगली कविताही वाचल्याचा आनंद मिळेल.

विशेष म्हणजे त्यानंतर सुरेश भटांचा १९९४ ला संग्रहात प्रकाशित झाला. त्यात 'मराठी गझल म्हणजे मराठी काव्यातील एक शक्तिशाली वस्तुस्थिती झाली आहे.'३ असे अभिमानाने ते सांगतात. गझलेच्या वाट्याला उपेक्षा आली, त्याची खिल्ली उडवली गेली ही गोष्ट ते विसरत नाहीत. गझलेला हिणवणाऱ्यांचा, गझलेला भटारखाना म्हणणाऱ्यांचा सुरेश भट समाचार घेतात. पुढे रंग माझा वेगळा हा त्यांचा कार्यक्रम गाजू लागला. तीन वर्षात ८५ कार्यक्रम झाले, जाहिराती वर्तमानपत्रात झळकू लागल्या. लोक तिकिटे काढून गझला ऐकू लागले. भटांसोबतच गझलेला लोकमान्यता मिळाली. महाराष्ट्रात गझलेचा मोठा रसिकवर्ग निर्माण करण्याचे श्रेय निश्चितच भटांकडे जाते. गझल ऐकायला येणारा सामान्य माणूस विविध व्यवसायातला असायचा . कष्टकरी माणसांचा एल्गार येत आहे हे त्यांच्या गझलेने सिद्ध केले. काव्याची आणि सामान्य जनतेची कधीही फारकत नसावी. जे काव्य सर्वसामान्य जनतेला धरून नसते ते काव्य निरर्थक होय , गझल म्हणजे सामान्य माणसाच्या सुखदुःखाची कविता, असा आपला गझलेचा काव्यविचार ते मांडायचे. तो विचार त्यांच्या या गझल चळवळीने सिद्ध केला. रमण रणदिवे, भाऊ पंचभाई, इलाही जमादार , राजेंद्र शहा, म. भा. चव्हाण, सतीश दुसरे यांची उदाहरणे देत सशक्त गझल लिहिणाऱ्यांमध्ये विविध जाती धर्मातील आणि सामान्य वर्ग आहे भट मुलाखतीतून सांगायचे.

बहुतेक मंडळींनी भटांच्या प्रभावात गझल लिहिली पण आधीपासूनच वेगळ्या वाटा चोखाळणारेही होते. इलाही जमादार हे त्यापैकी एक.

तोल किरणांचा ढळाया लागला
सूर्य आता मावळाया लागला
भेट शेवटची इलाही आपुली
भैरवीचा स्वर ढळाया लागला

त्यांच्यासोबत राहूनही वेगळी गझल लिहिणारे दुसरे आहेत चंद्रशेखर सानेकर आणि कवितेच्या अंगाने ज्यांची गझल जाते ते सदानंद डबीर

भटांच्या प्रभावाखाली सतत राहूनही स्वतःची समर्थ गझल लिहिणारीही बरीच मंडळी आहेत. संगीता जोशींपासून शोभा तेलंगांपर्यंत आणि प्रदीप निफाडकरांपासून तर अरुण सांगोळेंपर्यंत अनेक गझलकार आजही व्रतस्थपणे गझललेखन करीत आहेत. तरलता हा गझलेचा मूळ आत्मा त्यांच्या इश्कीया गझलेत आहे.

भटांची गझलपरंपरा अधिक समृद्ध करणाऱ्या गझलकारांपैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे प्रदीप निफाडकर. वाचकांशी थेट संवाद साधण्याची त्यांची शैली आणि हृदयस्पर्शी विषय या तिच्या वैशिष्ट्यांचा गझलेचे अभ्यासक राम पंडित यांनी गौरव केला आहे. भटांचा वेगळा रंग आपल्यालाही कसा लागला याची ते कबुली देतात.

कीर्र अंधारातही घेतला सोबती
अन् मशालीपरी मी मला जाळले

सूर्य नाही, एक छोटासा दिवा मी
जन्म माझा रोज अंधारात होतो

विदर्भातील अनेक महत्त्वाची नावे सांगता येतील. सामाजिक जाणिवेची चांगली गझल लिहिणारे बदन मराडकर आहेत. भट जशी स्वतःची गझल आतला सूर लावून गायचे, तसेच ते गातात.

मी तुला तारका देत गेलो
अन् तुझी आसवे घेत गेलो

पंख माझे कुणी कापताना
मी दिलासा तुला देत गेलो

हृदय चक्रधर हे महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा सुरेश भटांच्या गझलधारेत एकजीव करत चमकदार गझल लिहित आहेत.

अज्ञानाच्या काळोखावर सूर्य शोधण्या
वीजेसारखी चमकत असते माझी मुलगी

पण गझल प्रचारकी होऊ नये. तिला विद्रोहाकडे घेऊन जाताना , तिच्यातील कलात्मकता आणि लालित्य हरवणार याची काळजी घ्यायला पाहिजे. तो शेर तुम्हाला भावला पाह{जे.

आजची मराठी गझल

'काफिला' नंतर 'कारवा' आणि त्यानंतर 'विदर्भाची मराठी गझल' अशा प्रातिनिधिक गझल सागर प्रतिष्ठानने दोन वर्षापूर्वी आणखी एक प्रातिनिधिक संग्रह काढला. त्यात २३४ जुन्या नव्या गझलकारांच्या गझल आहेत. तर राम पंडितांच्या प्रातिनिधिक संग्रहातील संख्या ११४ आहे इतक्या विपुल प्रमाणात गझल लिहिली गेली. दरवर्षी नेमाने गझल संमेलने होत आहेत. गझल नवाज भीमराव पांचाळेंनी हिंदी गझलेप्रमाणे मराठी गझल लोकप्रिय केली. अनेक नवनव्या कवींच्या त्यांनी सादर केलेल्या गझला रसिकांची दाद घेतात. विशेष म्हणजे त्यांनी बोली भाषेतही गझल सादर करण्याचे प्रयोग केले. दरम्यान आनंदकुमार आडे यांचे गझलेचे छंदशास्त्र वा. न सरदेसाई , राजेंद्र जोशी, सुरेशचंद्र नाणकर्णी, अविनाश सांगोलेकर, राम पंडितांचा अभ्यासकांनी गझलेला संशोधन व समीक्षेचे खांब द{ले. यावरून मराठी गझलेच्या भविष्याची कल्पना येनू शकते.

मराठीतील महत्त्वाच्या साहत्यिक, समीक्षकांनीही मराठी गझलेचे महत्त्व मान्य केले. २००४ च्या एका गझलेवरील परिसंवादात ∴..एकाच वेळी विविध विषय समर्थपणे पोहोचवणाऱ्या व वृत्तसौंदर्याने नटलेल्या गझलप्रकाराचा स्वीकार व अंगीकार मराठी भाषेला आवश्यकच ठरणार आहे. अशी स्पष्टोक्ती डॉ. भालचंद्र नेमाडे देतात. तर डॉ. द. भ{. कुलकर्णी यांना भट गेल्यानंतर सुरेश भटांचे नवे आकलन झाले. भटांचे आकलन मांडणारा त्यांचा समीक्षाग्रंथ २००५ मध्ये प्रकाशीत झाला.

मात्र या वीस वर्षातली गझल लिहिणारी जी नवी पिढी आहे. ज्यांच्यावर भटांचा प्रभाव यत्किंचीतही नाही अशीही अनेक नावे सांगता येतील. कौस्तुभ आठले, क्रांती साडेकर, सतीश दराडे आबेद शेख अशी अनेक नावे आहेत. गेल्या दहाबारा वर्षात दहा- पंधरा चांगली नावे पुढे आली आहेत. पण हे कवी सामाजिक आशयाकडे जास्त प्रमाणात जातात. गझने चा सामाजिक , राजकीय असा कोणताही पैलू असो. पण तिचा पाया आहे प्रेम, आत्मीयता, जिव्हाळा. क्रांती साडेकरचे हे शेर पहा :

सागराची जरी मालकी घेतली
वादळाची कुणी हमी घेतली?

आश्रीतासारखे दु:ख आले तरी
लेकरासारखी काळजी घेतली

पण आजच्या गझलेमधील गझलीयत संपत चालली आहे, असा आरोपही केला जातो. दुसरा आक्षेप म्हणजे सुरेश भटांच्या तोडीची गझल आज दिसते काय ? मोठा गझलकार म्हटले की सुरेश भटांची उंची गाठू शकेल असा कोणीही झाला नाही. जीवनभर जिवंत शब्दांचे व्रत अंगिकारणारे सुरेश भट पुन्हा होणार नाहीत हे जसे खरे आहे मग हा नियम कवितेतील दिग्गजांनाही लागू होतो. दुसरा तुकाराम तरी कुठे निर्माण झाला ? पण मराठी कवितेच्या उर्दूत सतराव्या शतकापासून हाताळला जाणारा हा काव्यप्रकार मराठीत खया अर्थाने सुरेश भटांपासून म्हणजे गेल्या पन्नास वर्षापासून सुरू आहे. इतक्या कमी कालावधीत तो लोकांच्या व्यवहारात कसा येईल ? मराठी गझलेचे एक अभ्यासक डॉ. राम पंडित म्हणतात, उर्दूतील पासष्ट टक्के गझल अतिसामान्य दर्जाची आहे.

अतिप्रमाणात गझला लिहिल्यामुळेही त्यांचा कस असा टिकून राहात नासावा. निर्मितीप्रक्रियेतील असह्य ताणामुळे निर्मितीसाठी पुरेसा अवकाश अशा कवींना मिळणे कसे शक्य आहे. डॉ. अक्षयकुमार काळे यांनी त्यांच्या 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' या ग्रंथात १९९९ मध्ये भटांच्या गझलपठडीत दाखल होणाऱ्यांविषयी जे निरीक्षण नोंदवले. भटांचा चेहरा दर्शविणारी एक भोंगळ गझलनिर्मितीची लाट येते आणि मराठी रसिकतेच्या खडकावर तूटून विरून जाते. त्यांच्या या विधानाचे भान आजही ठेवण्याची आजही गरज आहे.

खरे तर बहिर्मुखता आणि केवळ कल्पनाचमत्कृती अशा दुर्गुणांची लागण होऊ नये याची काळजी गझलकारांनी सातत्याने घेतली पाहिजे. गझल लिहिणारा आधी उत्तम कवी असला पाहिजे ही गझलेची पूर्वअट आहे, असे भट म्हणायचे हेही नव्या गझलकारांनी लक्षात घ्यायला हवे. भटांच्या गझलेचे सर्वात महत्त्वाचे आणि अंगभूत वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची प्रासादिकता. पण प्रासादिकता नुसत्या सोपेपणामुळे येत नाही. कवीच्या ओघवत्या भाषाशैलीमुळे रसिकांशी थेट आणि नकळत संवाद साधला जाणे. अर्थात ही एक अव्याख्येय संकल्पना आहे. भटांच्या शेकडो ओळींची उदाहरणे त्यासाठी देता येतील. मन आणि बुद्धीचा ठाव रसिक वाचकाला ती भावली पाहिजे. भिडली पाहिजे. उर्दूप्रमाणे सहज मराठीचे शेर लोकांच्या ओठांवर येतील हे भान भटांप्रमाणे इतर कविंनीहे ठेवायला हवे.

एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे
हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे

गझलकारांमध्ये आपण गझल लिहितो म्हणजे कवितेपेक्षा काहीतरी अधिक करतो असा अहंकार असणेही चूक आहे. यादृष्टीने अरूण म्हात्रे यांनी आजच्या मराठी गझलेच्या स्वरूपाविषयी बोलताना एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. ते म्हणतात, खरं तर ग़ज़ल हा कवितेचा एक रचनाप्रकार, कवितेच्या विस्तृत पटावरचं स्वतंत्र दालन. ती ही कविताच. पण आज मराठी गझल नावाची गोष्ट मराठी कवितेच्या बरोबरीने पण समांतरपणे स्वतंत्र प्रवास करते आहे. कवितेतले लोक गझलेत नाहीत. गझलेतले लोक कवितेत नाहीत. मुख्य कविधारेतले लोक गझलला आपले म्हणत नाहीत. गझलवाले कवितेला परके मानतात.४

प्रत्येक वेळेला काव्याभिव्यक्ती गझलेमध्येच का व्हावी? खरे तर कवितेचा कॅनव्हास हा गझलेपेक्षा केव्हाही मोठा असतो. कधी कविता तर कधी गीतात का होत नाही ? प्रत्येक अनुभवाची अभिव्यक्ती गझलेतच होत असेल तर कवी केवळ तडजोड करत लिहितो, असे अनेक प्रश्न यासंदर्भात निर्माण केले गेले. कोणीही फक्त एकाच फॉर्ममध्ये कसा व्यक्त होईल ? गालिबने आपली अनेक मते पत्रांमधून मांडली. गझल म्हणजे सर्व प्रकारचा तोल

ISSN : 2278-9308
December-2020

सांभाळत , सावरत, काव्यनिर्मितीच्या दोरीवरून चालणे, असे म्हटले जाते. कवितेत [illegible] आणि सौंदर्याची विशिष्ट दृष्टी असलेल्या व्यक्तित्वाचा अनुभव असतो. मानसिक तोल सांभाळताना मूळ अनुभवाला खंडित होवू न देणे, स्वानुभवाला विश्वात्मक करणे, त्या अनुभवाची पुनर्निर्मिती करताना आलेले म्हणणे म्हणून मांडणे, ते म्हणणे कवीने स्वीकारलेली मूल्यसंकल्पना असते. त्याची जीवनविषयक मानसिक असते. [illegible] प्रतिक्रिया असते. भटांच्या कवितेतील रचनेचे असे कौशल्य त्यांच्या अनुयायांनी अंगिकारले आहे का ? या प्रश्नाचा शोध घेत मराठी गझलवैभव पुढे जाणार आहे. एक गझलकार म्हणतो :

गझले तुझ्याचसाठी बांधीन राजवाडा
मजला दिली भटांनी ती ही जमीन आहे.

निष्कर्ष

(१) १९७० ते १९७५ या दरम्यान भटांच्या प्रभावातून अनेक जुने नवे कवी गझल लेखनाकडे वळले. १९८०-९० च्या दशकात भटांच्या नेतृत्वात गझलेची चळवळ व गझल संप्रदाय निर्माण झाला. ही घटना मराठी काव्यक्षेत्रात ऐतिहासिक आहे. त्यामुळे नव्या दमाच्या गझलकारांची एक समर्थ पिढीच पुढे आली. महाराष्ट्रात गझल लिहिणाऱ्यांची संख्या आज तीनशेच्या वर असावी. आज तो मराठीतील एक महत्त्वाचा व लोकप्रियकाव्यप्रकार मानला जातो.

(२) सशक्त गझल लिहिणाऱ्यांमध्ये विविध जाती धर्मातील आणि सामान्य वर्गही आहे. महाराष्ट्रात गझलेचा मोठा रसिकवर्ग निर्माण करण्याचे श्रेयही निश्चितच भटांकडे जाते.

(३) भटांच्या नंतर स्त्री गझलकार मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. या गझलांमध्ये केवळ प्रेमाच्या छटा आणि स्त्रीवाद नाही तर चिंतनाच्या इतर पातळ्यांवरही या गझला जातात. ही फार वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे.

(४) अलीकडे गझल लिहिणारी जी नवी पिढी आहे. त्यांच्यावर भटांचा प्रभाव यत्किंचितही नाही असेही लक्षात येते.

(५) भटांचे मार्गदर्शन ज्यांना लाभले ते अजूनही सशक्त गझल लिहिताहेत. गेल्या वीस वर्षात साठ पेक्षा अधिक गझलसंग्रह निघाले. लिहिणाऱ्या बहुतांश गझलकारांची सुरेश भटांच्या गझलांवर निष्ठा आहे. सुरेश भटांची नाममुद्रा मराठी गझलेला लागून तिचा रूपबंध निश्चित झाला आहे. तिचे भवितव्यही आशादायी आहे.

(६) एखादी रचना खूप सुंदर असते पण भटांचा प्रभाव इतका असतो की त्या रचना किंवा तो कवी किंवा एखाद्याचा सुंदर शेर वाचताना आपण भटांना विसरायला तयार नसतो. त्यामुळेही अजाणतेपणे भटानंतरच्या अनेक गझलकारांवर अन्याय होतो.

(७) भटांच्या प्रभावाखाली सतत राहूनही स्वतःची समर्थ गझल लिहिणारेही बरेच [illegible] आहेत. अनेक गझलकार आजही व्रतस्थपणे गझललेखन करीत आहेत.


संदर्भ

१ मराठी गझल-प्रवाह आणि प्रवृत्ती : डॉ.अविनाश सांगोलेकर, (शब्दालय प्रकाशन)
२ गजल : सुरेश भटानंतर- राम पंडित ( अभिव्यक्ती प्रकाशन )
३ सुरेश भटांची गझल : एक संवाद , डॉ.अक्षयकुमार काळे , सुरेश भट गौरव ग्रंथ
४ झंझावात, सुरेश भट, प्रस्तावना ( साहित्य प्रसार केंद्र)
५ कविश्रेष्ठ सुरेश भट, मराठी गझल लेख , अरुणा म्हात्रे,
६ अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, डॉ.अक्षयकुमार काळे ( विजय प्रकाशन)
७ सुरेश भट : नवे आकलन (आकांक्षा प्रकाशन )

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१



महामानव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
अभिवादन विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

(भाग—०१)

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०
मो. ९४०४०००३९८.

| | | |
|---|---|---|
| | कु. लीना निलकंठराव उराडे. | |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाहीसंबंधी विचार– प्रा. विठ्ठल चौधरी | 138 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नवयान – येवला ते नागपूर– डॉ. श्रीनिवास सातभाई | 145 |
| 26 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य – प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | 150 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फाळणीविषयक विचार – डॉ. तीर्थराज कापगते | 156 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव प्रा.व्ही.पी. काटकर डॉ. आर.ए. फुलकर. | 163 |
| 29 | डॉबाबासाहेबआंबेडकरांचेशेती व शेतकरी धोरण - प्रा.बालाजी रावसाहेब बोडके | 170 |
| 30 | आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य - डॉ. मथुरा मेवाड | 174 |
| 31 | आंबेडकरी विचारांचा दलित साहित्यावरील प्रभाव - प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | 179 |
| 32 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक चिंतन .– डॉ.अनमोल शेंडे | 185 |
| 33 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रांची प्रासंगिकता एक चिकित्सक अध्ययन विकास गवई | 191 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय प्रपंच – डॉ. युवराज घबडगे | 198 |
| 35 | पत्रकारिता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ. मोहन राजाराम कापगते | 206 |



# डॉ– बाबासाहेब आंबेडकर यांचे फाळणीविषयक विचार

डॉ. तीर्थराज कापगते.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातील नरसंहाराइतकीच प्रक्षोभक आणि वेदनादायक घटना म्हणजे १९४७ मध्ये झालेली भारताची फाळणी. भारत–पाकिस्तान फाळणीतील धार्मिक दंगलीमध्ये लाखो लोकांचे बळी जात होते, सहस्त्रावधी स्त्रियांची अब्रू जात होती आणि कोट्यवधी लोक बेघर झाले होते. महिलांवरील लैंगिक अत्याचारांनी तर क्रौर्याची परिसीमा गाठली होती. दुसऱ्या महायुद्धापाठोपाठ घडलेली फाळणीची ही घटना इतकी दूरगामी ठरली की, आजही स्वतंत्र भारत त्या घटनेचे दाहक चटके अनुभवत आहे.

[illegible] समकालीन आणि उत्तरकालीन विचारवंतांनी [illegible] फाळणीचा कसा विचार केला [illegible] अभ्यास [illegible] महाराष्ट्र [illegible] बुद्धिवंतांचा [illegible] समजला [illegible] कालखंडात महाराष्ट्रात राष्ट्रवादी, [illegible] विचारधारांचा प्रभाव होता. [illegible] संबंध नसणारे अपक्ष आणि त्रयस्थ विचारवंतही होते. या विचारवंतांचे फाळणीविषयक दृष्टिकोन या कालखंडात लिहिलेल्या विविध ग्रंथांमधून प्रकट झाले आहेत. या विचारवंतांमध्ये एक अग्रणी नाव आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये त्यांच्या फाळणीविषयक विचारांचा मागोवा घेतला आहे.

## फाळणी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ संदर्भसाधनांच्याद्वारे अभ्यासं करणारे अभ्यासक नव्हते. साधनसामग्रीचा नव्याने अन्वयार्थ लावणारे केवळ संशोधिकच नव्हते, तर सत्याचा शोध घेणारे ते एक श्रेष्ठ दर्जाचे विचारवंत होतेय म्हणूनच त्यांच्या फाळणीविषयक विचारांमध्ये स्वतःची एक स्पष्ट भूमिका आहे. म्हणूनच अभ्यासकांना त्यांच्या मताची आजही दाखल घ्यावी लागते. फाळणीचे परिणाम 1947, 48 व 49 या तीन वर्षांत विशेष झाले य पण फाळणीच्या तीव्र आंदोलनाला 1945 मध्येच सुरवात झाली. डॉ. आंबेडकरांचा इंग्रजीतील ' थॉट्स आन पाकिस्तान '

हा इंग्रजीतील ग्रंथ 1940 मध्ये आणि ' पाकिस्तान ऑर द पार्टीशन ऑफ इंडिया ' हा ग्रंथ 1945 ' पाकिस्तानसंबंधी विचार ' या ग्रंथाचीच दुसरी आवृत्ती म्हणजे ' पाकिस्तान अथवा भारताची फाळणी ' हा ग्रंथ. या ग्रंथात आधी चार विभाग होते दुसऱ्या आवृत्तीत त्यांनी पाचव्या विभागाची भर घातली. फाळणी अटळ आहे अशी परिस्थिती 1946 पर्यंत निर्माण झाली तेव्हा लोकसंख्येचे स्थलांतर , स्थलांतर करणाऱ्यांना त्यांच्या मालमत्तेचा मोबदला , सीमारेषांची आखणी, शासकीय मालमत्तेची विभागणी या सर्व मुद्यांचे विवेचन त्यांना या आवृत्तीत करावे लागले. सोबतच पाकिस्तान निर्मितीच्या मर्यादांचाही विचार करावा लागला. दुसऱ्या आवृत्तीत त्यांनी भारत भौगोलिकदृष्ट्या कसा एक आहे हे समजावून सांगितले.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

सख्या कमी झाल्याने जातीय प्रश्नाची तीव्रता कमी होऊन भारताला वसाहतीचे स्वराज्य मिळण्याचा मार्ग सुकर होईल या गृहीतकावर आधारत आहे. पाकिस्तान मागणीचे समर्थन डॉ. आंबेडकरानी फार प्रभावीपणे केले पुढे अनिच्छेने का होईना राजकीय नेत्यांनी फाळणीला संमती दिली. आंबेडकरांचे भाकीत शेवटी खरे ठरले सुमारे 335 पृष्ठांच्या या ग्रंथात (मराठी अनुवाद) एकूण 15 प्रकरणे आहेत. पाच भागांच्या शीर्षकांवरूनही या ग्रंथाची व्याप्ती कळते

१ पाकिस्तानातील मुस्लिमांची स्थिती

२ पाकिस्तान विरुद्ध हिंदूंची विचारधारा

३ पाकिस्तानचा निर्णय

४ पाकिस्तानची संवेदना

५ पाकिस्तानच्या समस्या

## पाकिस्तानची मागणी

या पाचही भागांमधून अतिशय सुबोध व सर्वांगीण मांडणी करत, त्यांनी पाकिस्तानची मागणी मान्य करण्यात शहाणपण आहे हे आपले आणि म्हणणे विविध उदाहरणांच्या आधारे स्पष्ट करत पाकिस्तान समस्येच्या सर्वच पैलूंचा तटस्थपणे व साधकबाधकपणे विचार मांडला. हे निवेदन वाचकांना अंतर्मुख करणारे आहे.

पहिल्या विभागात पाकिस्तानबाबत मुस्लिम अन्तर्गत मागणीचे विवेचन आहे. ज्या क्षेत्रात मुस्लिम लोकसंख्या जास्त आहे त्यांना मुस्लिम राज्यात समाविष्ट करावे. प्रत्यक्षात पंजाब, पश्चिम सरहद्द प्रांत, बलुचीस्तान व सिंध तसेच पूर्व भागा यांना स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र म्हणून घोषित करावे. हा मुस्लिम लीगच्या ठरावाचा गाभा आहे असे सांगत सदर ठराव संदिग्ध व विरोधाभासी असून या ठरावात मुस्लिम प्रांत, संघीय सरकारचा एक भाग राहील की स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रात त्याचे परिवर्तन होईल हे स्पष्ट नाही, हे त्यांनी दाखवून दिले. यानंतरच्या विवेचनात 1849 मध्ये ब्रिटीशांनी पंजाब जिंकल्यावर सीमाप्रांत आणि पंजाब एकत्र होता. कर्झनने विविध प्रांतात विभागणी केली नसती, तर पंजाब व सिंध प्रांत आणि बलुचिस्तान मिळून पश्चिम पाकिस्तानची निर्मिती केव्हाच झाली असतीय 1905 मध्ये कर्झनने बंगाल आणि आसामचेही विभाजन केले. त्यांतील ब्रीटिशांनी हिंदूंच्या प्रखर विरोधामुळे वंगभंग नीती रद्द केली अन्यथा तेथही 'पूर्वपाकिस्तान' कधीच तयार झाला असता याची आठवण ते देतात.

## मागणीचा आधार संस्कृती

पाकिस्तान मागणीचा आधार भाषा नसून संस्कृती आहेय कारण गांधीजींच्या आग्रहाने प्रांतांची भाषावार विभागणी झाली. या विभागणीचा आधार सांस्कृतिक नव्हता. पाकिस्तानची मागणी म्हणजे तुकडे करणे असेल, तर मग हे प्रांतांचे विभाजन काय आहे ? असा प्रश्न उपस्थित करून पाकिस्तानच्या मागणीत केवळ सांस्कृतिक ऐक्य–प्रकटीकरण असून आपल्या विशेष संस्कृतीच्या उत्तरोत्तर उन्नतीसाठी हेतुपुरस्सर स्वातंत्र्याची मागणी केली आहे. हिंदूंनी मात्र या मागणीचा करून विरोध केला. भारत एक राष्ट्र नव्हे हे ऐकून हिंदू लज्जित होतात कारण राष्ट्रीयता हा सद्गुण मानला जातो, असे ते म्हणतात.

## मुसलमान : एक राष्ट्र

या मुद्याचे डॉ. आंबेडकरांनी अतिशय विस्तृत व सूक्ष्म विश्लेषण केले आहे. [illegible] विचारवंतांच्या मतांचा आधार घेत राष्ट्र म्हणजे काय याची ते व्याख्या करतात. राष्ट्रीयत्व म्हणजे सामाजिक चैतन्यरूपी एकत्वाच्या सचेटत भावनेचा आभास होय व त्यामुळे काही परस्परांचे आप्तेष्ट [illegible] लागतात. राष्ट्रीय चेतना ही दुधारी भावनेसारखी आहे. त्यात स्वतःच्या परिवाराच्या लोकांबद्दल बंधुत्वाची भावना असते आणि जे परिवारात नाहीत त्यांच्याबद्दल शत्रुत्वाची भावना असते. ज्यांच्यात ही भावना जागृत होते त्यांना ही इतकी समर्थपणे बांधून ठेवते की त्यांच्यावर आर्थिक व सामाजिक असमानतेचा [illegible] प्रभाव पडत नाही.3 ही व्याख्या मुस्लिमांच्या मागणीला अनुकूल आहे. त्यामुळे तक्रार न करता हिंदूंनी स्वीकारावी, असे ते म्हणतात. पण भारतातील हिंदू व मुसलमान हे वेगळ्या वंशाचे नाहीत त्यामुळे या म्हणण्याला आधार नाही असे हिंदूचे म्हणणे आहे. डॉ.आंबेडकर हिंदूंच्या सर्व तर्कातील दोष दाखवतात. त्यांच्या मते इस्लाम धर्म स्वीकारलेले लोक अनेक खेड्यापाड्यात विखुरले आहेत. धर्मांतराची [illegible] अपुरी प्रक्रिया, अपुरे धर्मशिक्षण आणि भोवतालच्या वातावरणाचाही त्यांच्यावर परिणाम झाला. [illegible] हिंदूंपासून [illegible] हे मुसलमान अजून विसरला नाही. म्हणूनच त्याने सामाजिक [illegible] स्वीकार मनःपूर्वक केला नाही. एक देश, एक भाषा किंवा एक प्रदेश हे एक राष्ट्र घडवण्यास पुरेसे नाहीत हे इतिहासाच्या साक्षीने डॉ.आंबेडकर सांगतात. डॉ.आंबेडकर आत्मसन्मानाचा मुद्दाही उपस्थित करतात. त्या संदर्भात डॉ. आनंद हार्डीकर म्हणतात, "कदाचित ते पददलित हिंदू असल्यामुळेच सवर्ण हिंदूच्या वर्चस्वाबद्दल मुसलमानांना वाटणारी भीती त्यांना समजून घेणे सोपे गेले असेल.

## पाकिस्तान योजनेविरुद्ध हिंदूंची भूमिका

[illegible] त्यावेळी लक्षात आले नाहीत. पुढे घडणाऱ्या [illegible] कारण "प्रत्यक्ष कृती दिन" जो 16 ऑगस्ट 1946 मध्ये कलकत्त्यात पाळला गेला त्यापूर्वीचे हे पुस्तक आहे. तरीही येणाऱ्या संकटाची चाहुल त्यांना लागली असेलच हे त्यांच्या विवेचनावरून लक्षात येते.

ग्रंथाच्या दुसऱ्या भागात पाकिस्तान योजनेला हिंदूंचा विरोध का, याचे विश्लेषण आंबेडकरांनी केले आहे. पाकिस्तानमुळे देशाची सुरक्षा दुर्बल होईल हे जे हिंदूंना वाटते हे अर्थातच ऐतिहासिक तथ्य आहे. ते इ. स. 711 पासून 1738 पर्यंतच्या मुस्लीम आक्रमणांचा इतिहास कथन करतात. हिंदू देवतांच्या मूर्तीचे भंजन करून व त्यांच्या श्रद्धांवर आक्रमण करून भारतात मुस्लीम धर्म प्रस्थापित करणे हा या आक्रमणांचा हेतू होता असे ते सांगतात. त्यामुळेच मुसलमानांच्या मनात अभिमानाची व हिंदूंच्या मनात भीतीची भावना वर्षानुवर्षे घर करून राहिली असे ते म्हणतात. पाकिस्तान निर्माण झाल्यावर भारताच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण होईल किंवा

तो तात्काळ युद्धालाच तयार होईल, या विचारात काहीही तथ्य नाही, असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

## पाकिस्तान आणि जातीय शांतता

पाकिस्तान निर्मितीनंतर भारतातील जातीय प्रश्न जरी सुटला नाही, तरी त्याचे स्वरूप बदलू शकते, असे डॉ. आंबेडकरांचे मत आहे. मत आहे. 1932 साली हिंदू व मुस्लिम प्रश्नावरचा उपाय म्हणून इंग्रजांनी जाहीर केलेला जातीय निवाडा त्यांना मान्य नव्हता. दुसऱ्या जमातीच्या लोकांना ओलिस ठेवून न्याय मिळवण्याची कल्पना ते निषेधार्ह मानतात आणि शेवटी पाकिस्तानला मान्यता देणे हाच जातीय प्रश्नावर एकमेव तोडगा आहे असे सांगतात.

## हिंदू हा धर्मप्रचारक धर्म नाही

हिंदू संघटन, हिंदू राज्य, मुस्लिमम शुद्धीकरण आणि अफगाणिस्तान व सीमा प्रांताचे शुद्धीकरण करून विजय, अशा चार स्तंभावर हिंदू जातीचे भविष्य विसंबून आहे, असे हरदयाळ यांनी म्हटले होते त्यांच्या या भूमिकेचाही त्यांनी परामर्श घेतला आहे. हिंदू हा धर्मप्रवर्तक धर्म नाही, कारण धर्म परिवर्तनासाठी धर्मग्रहण करणाऱ्या व्यक्तीच्या सामाजिक जीवनात परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य हिंदू समाजात नाही असे ते सांगतात. याच भागात त्यांनी सावरकरांच्या भूमिकेची विस्तृत चिकित्सा केली आहे. एकतर हिंदू महासभेचा जन्म मुस्लीम लीगचा प्रतिरोध म्हणून झाला आणि ती पाकिस्तानविरोध सामान्यांशी करणार तेव्हा ते केवळ निषेधात्मक विकल्प होत. आणि या साधनांनी किजयत यश मिळेल असा प्रश्न ते उपस्थित करतात. सावरकरांच्या हिंदू राष्ट्र व्याख्येचाही ते विस्ताराने परामर्श घेतात. हिंदू महासभेच्या विचारांचा परामर्श घेतल्यानंतर आंबेडकरांनी काँग्रेसच्या हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या धोरणाचाही परामर्श घेतला कारण त्यावेळी बहुसंख्य हिंदू हे काँग्रेसच्या मागे होते. 1920 ते 1940 पर्यंत हिंदु-मुस्लिम ऐक्याचे अथक प्रयत्न केले पण त्याचा काहीही परिणाम झाला नाही या सर्व गोष्टींची ते मीमांसा करतात. या वीस वर्षात देशात विविध भागात उसळलेल्या ऐक्याच्या कल्पनेचा अपनिरास करणाऱ्या दंगलीचा त्यांनी सादर केलेला तपशील म्हणजे एक दस्तावेज आहे. पुढे ते म्हणतात की हिंदूंशी संघर्ष करण्याचीच मुसलमानांची वृत्ती असल्यामुळे हिंदु–मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न निष्फळ ठरत आहेत. त्यानंतर अधि विस्ताराने पाकिस्तानची मागणी हा एक राजकीय प्रवास कसा आहे हे ते स्पष्ट करतात. बंधुभाव ही संकल्पना फक्त मुस्लीमांपुरती मर्यादित असल्याचे ते सांगतात. इतरांविषयी त्यांच्या मनात विद्वेष आहे असे मत ते नोंदवतात.

## पाकिस्तानची पर्यायी मागणी

[illegible] मागणी मान्य करून हिंदु-मुसलमानांना जबरदस्तीने एकत्र राखण्याचा प्रयत्न केल्यास, भारत हा आशिया खंडातील एक आजारी देश बनून राहील, असे ते सांगतात. हिंदू आणि मुसलमान एकत्र राहिल्यास केंद्र शासन कधीच प्रबळ होऊ शकणार नाही. कारण, मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतांना जास्तीतजास्त स्वायत्तता देण्यात यावी, अशी मुसलमानांची मागणी आहे.

## लोकसंख्येची अदलाबदल

डॉ. आंबेडकरांचा हा ग्रंथ काँग्रेसी नेत्यांनी स्वच्छपणे वाचला असता तरी, फाळणीचे हत्याकांड काही प्रमाणात टाळले असते. त्यासंदर्भात लोकसंख्येची अदलाबदल या महत्त्वाच्या पैलूवर आंबेडकरांनी प्रकाश झोत टाकला आहे. वायव्य व ईशान्य भारतातील मुस्लिम बहुल प्रांतांमध्ये स्वतंत्र राष्ट्र –राज्य स्थापण करण्याची मुसलमानांची मागणी मान्य करण्यातच हित आहे, हे सांगताना त्यांनी, दोन्हीही कडच्या अल्पसंख्य ठरणाऱ्या समुदायांतील लोकांची योजनापूर्वक अदलाबदल करणे कसे आवश्यक आहे हे स्पष्ट करतात. कारण दोन समाजाची दोन राष्ट्रे स्वतंत्र करण्याचे निश्चित झाल्यावर सीमा ठरवल्या जाव्यात. अदलाबादालीने संभाव्य वैमनस्य टाळावे. दोन्ही राष्ट्रे जास्तीतजास्त एकजिनसी व्हावीत, ज्यामुळे पुढेही अल्पसंख्य समाजाच्या अवास्तव मागण्या मान्य करण्याची गरज भासू नये. तुर्कस्तान, ग्रीस,बल्गेरिया या तीन देशांनी दोन कोटी कोटी लोकांची अदलाबदल घडवून आणली आणि धार्मिक तिढा टाळले, असे ते म्हणतात. त्याचे अनुसरण प्रयत्नपूर्वक व अभ्यास करून हिंदू- मुस्लिमांनी करावे असे आवाहन ते करतात. स्थलांतराचा वेळ तव्या

1) लोकसंख्येची अदलाबदल करण्यास लागणारी प्रभावी व कार्यक्षम यंत्रणा.

२) स्थलांतर करणाऱ्या कुटुंबाच्या सामानवर लादला जाणारा जाचक कर

३) स्थलांतर करणारे कुटुंब स्वतःबरोबर घरासारखे स्थिर संपत्ती घेऊन जाणे अशक्य आहे

४) आल्या संपत्ती सध्याच्या बाजा जारभावाने किंमत मिळणार नसल्याने वाटणारी साधार भीती. अशा विविध समस्यांवरही त्यांनी बारकाईने विचार केला आहे

पाकिस्तान देऊन टाकल्याने हिंदु–मुसलमानांमधील जातीय समस्या कायमची सुटेल, अशा भ्रमात कुणीही राहू नये. उर्वरित भारतात जे मुसलमान राहतील त्याची डोकेदुखी गृहीत धरावी लागेल तेव्हा जास्त नुकसान करून घेण्यापेक्षा काहीतरी लाभ पदरात पाडून घेणे जास्त श्रेयस्कर ठरते असा व्यावहारिक सल्ला देऊन या दोन्ही प्रांतामधील हिंदुबहुल जिल्हे पाकिस्तानमध्ये समाविष्ट केले जाऊ नयेत असे ते सूचित करतात.

परामर्श.

व्याख्यानमालेत या ग्रंथावरील चर्चेला उत्तर देताना ते म्हणाले की जे इतिहास विसरतात, ते इतिहास घडवू शकणार नाहीत. भारतीय सैन्यातील मुसलमानांचे वर्चस्व कमी करून सैन्य एकजीव व निष्ठावंत करणे ही गोष्ट शहाणपणाची आहे . पाकिस्तान मिळाले तर मुसलमान सर्व हिंदुस्थानवर आपले साम्राज्य पसरवतील असा खोटा समज करून घेऊ नका. स्पृश्य हिंदूशी काही मुद्यांवर माझे भांडण आहे .हे मी मान्य करतो यपरंतु. तुमच्यासमोरि मी अशी प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाचे स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी मी प्राण अर्पण करीन.

या ग्रंथाचे लेखन करताना [illegible] हिंदू [illegible] मुस्लिम [illegible] भूमिका त्यांनी [illegible] आणि हिंदू यातली सीमारेषा [illegible] अस्पृश्य समाजाच्या [illegible] पाठपुरावा केला असला तरी थॉट्स ऑन पाकिस्तान लिहिताना स्पृश्य – अस्पृश्यांचा भारत आणि मुसलमानांचा पाकिस्तान अशीच त्यांची भूमिका होती.परंतु त्यांच्या ग्रंथानंतर म्हणजे 1940 नंतर लीगची ताकद वाढतच राहिली व प्रतिक्रिया म्हणून हिंदुत्ववादी राजकारणाचा प्रभावही वाढू लागला तेव्हा मात्र मुसलमान राज्य वेगळे झाल्यास उर्वरीत भारतात हिंदू राज्य स्थापण होईल की काय, या भीतीनेहि त्यांनी पाकिस्तान प्रश्नांचा फेरविचार केलेला दिसतो. दुसऱ्या आवृत्तीत ते लिहितात . 'हिंदू राज्य झाले तर निश्चितच या देशासाठी महान धोका होईल. हिंदू राज्य प्रत्येक मूल्यावर थांबविले पाहिजे. हिंदू धर्म हा स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्याविरोधी आहे .

डॉ. आंबेडकरांनी या ग्रंथात मध्ययुगीन भारतीय इतिहास हा हिंदु–मुसलमान संघर्षाचा इतिहास आहे असा निष्कर्ष काढला. मुसलमान या देशात आक्रमक म्हणून आले आणि त्यांनी अनान्वित अत्याचार केले असे प्रतिपादन ते करतात. त्यांच्या या विवेचनावर जातीयवादी व परम्परानिष्ठ इतिहास लेखनाचा प्रभाव दिसतो. इतिहासाची दुसरी बाजू त्यांनी विचारात घेतली नाही असे म्हटले आहे. डॉ. नलिनी पंडितम्हणतात, 'आंबेडकरानी स्वीकारलेला दृष्टिकोण सामाजिक क्षेत्रात ज्या उदारमतवादी मूल्यांचा त्यांनी जन्मभर हिरीरीने पाठपुरावा केला त्या भूमिकेशी पूर्ण विसंगत आहे '

डॉ. आंबेडकरांप्रमाणेच स्वा. सावरकर, हमीद दलवाई व नरहर कुरुंदकर यांच्यासारख्या विचारवंतांनीही इस्लाम व मुस्लिम वर्तन यांचा संबंध जोडला. डॉ. आंबेडकरांनी जातीयवादाच्या आर्थिक बाजूचाही विचार केला नाही, असे म्हटले जाते. राज्यकारभारासाठी नोकरवर्ग तयार करताना इंग्रजांना उच्चवर्णियांना प्रथम संधी दिली. पुढे मध्यम व कनिष्ठ वर्गात शिक्षणाचा प्रसार झाल्यावर त्यांचा नव्या गटांशी नवा परिचय झाला. व ब्राह्मणेतर चळवळी जन्माला आल्या. इंग्रजांनी उत्तरकडे

हिंदु–मुसलमानातील उच्चवर्गीयांसाठी जमीनदारी पद्धत सुरू केली. या जमीनदारांविरुद्ध शेतकऱ्यांच्या झगडा सुरू झाला. हिंदु–मुस्लिम संघर्ष या पृष्ठभूमीवरही निर्माण झाला. [illegible] वरिष्ठ वर्गातील हिंदु–मुसलमानांच्या आर्थिक व राजकीय सत्तास्पर्धेतून ताणाव निर्माण झाले. [illegible] हा जमीनदार वर्गही सामील होता. शिवाय डॉ. आंबेडकर सिंध, बलुचिस्थान व पंजाब या तीन प्रांतातील मुसलमानांचा विचार करतात. खरं तर, इतर प्रांतात वरिष्ठ वर्ग सोडता उर्वरित मुसलमान प्रांतिक संस्कृतीत मिसळून गेले आहेत.

डॉ. आंबेडकरांच्या पाकिस्तानविषयक विचारांच्या संदर्भात निर्माण झालेल्या समज–गैरसमजाचा परामर्श डॉ. आनंद तेलतुंबडे यांच्या 'डॉ. आंबेडकरांचे पाकिस्तानविषयक विचार ' या पुस्तकात घेतला आहे.

त्यांचे पाकिस्तानविषयक विचार पुरेसे शास्त्रीय आहेत. सर्वसाधारणपणे त्यांनी भारताच्या फाळणीला मान्यता दिली असताना, आचार्य अत्र्यांसारखे त्यांचे भाष्यकार बाबासाहेबांना अखंड भारताचे पुरस्कर्ते का मानतात ? आंबेडकरांच्या विचारात 1940 ते 1946 –47 या कालःआत परिवर्तन होत गेले म्हणून त्यांचे फाळणीबाबत विचारही बदलत गेले पण लोकसंख्येची अदलाबदल हा त्यांचा सल्ला ऐकला असता तर हा प्रचंड नरसंहार झाला नसता.

निष्कर्ष :–

१) फाळणीवरील वैचारिक साहित्यात आंबेडकरांच्या 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या ग्रंथाने मोलाची भर घातली आहे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रथम श्रेणीचे व अव्वल दर्जाचे विचारवंत होते. या ग्रंथाचा मराठी अनुवाद उपलब्ध असल्याने फाळणीवरील मराठी वैचारिक साहित्याचे दालनही समृद्ध झाले आहे.

३) डॉ. आंबेडकर यांचे [illegible] विश्लेषण हे अत्यंत मूलगामी स्वरूपाचे आहे. त्यांच्या [illegible] ग्रंथाप्रमाणेच या लेखनालाही कालातीतता आणि संदर्भमूल्य लाभले आहे.

४) डॉ. आंबेडकर हे संदर्भसाधनांच्याद्वारे अभ्यास करून त्या साधनसामग्रीचा नव्याने अन्वयार्थ लावणारे केवळ संशोधिकच नव्हते, तर सत्याचा शोध घेणारे ते एक श्रेष्ठ दर्जाचे अभ्यासक होतेय म्हणूनच त्यांच्या फाळणीविषयक विचारांमध्ये स्वतःची एक स्पष्ट भूमिका आहे.

५) अभ्यासकांना आजही त्यांच्या मताची दाखल घ्यावी लागते.

संदर्भ

1 गोखले द. न. , डॉ. आंबेडकरांचे अंतरंग , मौज प्रकाशन गृह, मुंबई ,२००३, पृ. क्र. २२५

2 स्टॅन्ले वोलपार्ट, जिना ऑफ पाकिस्तान , पृ. क्र. २३३ दृ आनंद हर्डीकर, कायदेआझम,राजहंस प्रकाशन पुणे, दु. आ. २००६ ,पृ. क्र. ३०८ वरून उधृत

3 आंबेडकर बी. आर., पाकिस्तान अथवा भारताची फाळणी , नागपूर अनु. तुलसी पगारे, सुगत प्रकाशन नागपूर द्वि.आ. २००४ ,पृ. क्र. ३०

4 हर्डीकर आनंद, कायदेआझम,राजहंस प्रकाशन पुणे, दु. आ. २००६ ,पृ. क्र. २७७

5 गोखले, उ.नि, २३०

6 आंबेडकर, उ.नि. २९०

7 पंडित नलिनी,आंबेडकर , ग्रंथाली प्रकाशन मुंबई , दु. आ. पृ. क्र.९३

मराठी विभाग प्रमुख
श्री लेमदेव पाटील महाविद्यालय, कुही मांढळ,
जि– नागपूर

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

May-2022 E-ISSN - 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue 295

## Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. [illegible],
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

"RESEARCH JOURNEY" International E- Research Journal E-ISSN : 2348-7143
Peer Reviewed Journal

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 01 | Reading Values and Desires in Awadhesh Sinha's *Yayati In A New Glow* | Dr Ravindra Singh | 05 |
| 02 | Impact of Western Imperialism in Post-Colonial India: Replica in Ruth Prawer Jhabvala's Novels | Dr. Lakhan R. Gaidhane | 09 |
| 03 | Imagery and Symbolism in Nissim Ezekiel's Poetry | Dr. Sandeep Wagh | 13 |
| 04 | A Chronological Study of Digitization in Media and Evolution of Social Media | Dr. Santosh Tripathi | 16 |
| 05 | Social Media and Human Intelligence for Better National Security | Dr. Vinod Gajghate | 25 |
| 06 | A Study of Locus of Control Among Male & Female College Students." | Dr. Kalpana Vitore | 30 |
| 07 | Effects of Oxidant/Monomer Ratio on the Structural and Optical Properties of Polypyrrole Prepared Via Chemical Oxidative Polymerization | C. T. Birajdar | 33 |
| 08 | Online Marketing- Its Benefits and Channels | Dr. Minakshi Soni | 38 |
| 09 | Land Use and Land Cover Change in the Chandwad Tahsil of Nashik District | S. R. Nikam | 41 |
| 10 | Role of Self-Help Group in Rural Women Empowerment in India: A Study of North Maharashtra Region | Dr. Rajkumar Kankariya, Dr. Anil Dongre | 49 |
| 11 | A Study of the Interpersonal Behaviour Style Among N.C.C. And Non-N.C.C. College Students | Dr. Ananta Kotkar | 54 |
| 12 | Major Challenges of Indian Economy | Prof. Yuvraj Jadhav | 59 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 13 | राष्ट्रभाषा हिंदी का संदर्भ | प्रो. मोहन | 63 |
| 14 | 'दुखमोचन' उपन्यास में सामाजिक विमर्श | डॉ. सरोज सोलंकी | 68 |
| 15 | वैचारिक मंथन और आत्म चिंतन का आत्म साक्षात्कार: कालजयी | डॉ. रुपाली चौधरी | 71 |
| 16 | आक्रामक विदेशी प्रजातियाँ : उनके पारिस्थितिक एवं सामाजिक-आर्थिक प्रभावों के परिप्रेक्ष्य में | डॉ. सुभाष दोंदे | 78 |
| 17 | अल्मा कबूतरी : कबूतरा जाति का दर्दनाक आख्यान | डॉ. संगीता चित्रकोटी | 86 |
| 18 | अमृता प्रीतम के अनुदित उपन्यासों में प्रेम का स्वरूप | डॉ. शोभा रावत | 90 |
| 19 | इक्कीसवीं सदी के हिंदी साहित्य में महिला लेखन की भूमिका | डॉ. माधुरी जोशी | 99 |
| 20 | प्रेम का समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. डी. एम. मुल्ला | 102 |
| 21 | तुलनात्मक अनुसंधान : स्वरूप और महत्त्व | डॉ. माधुरी जोशी | 106 |
| 22 | वन्य जीव (संरक्षण) संशोधन विधेयक -२०२१: एक समीक्षात्मक अध्ययन | डॉ. सुभाष दोंदे | 109 |
| | **मराठी विभाग** | | |
| 23 | आदिवासींची अंगाईगीते | डॉ. अंजली मस्करेन्हस | 115 |
| 24 | सभासद बखरीत शिवरायांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे वर्णन | डॉ. किशोर पाठक | 121 |
| 25 | लोकनाथ यशवंत यांच्या कवितेचे वेगळेपण | डॉ. तीर्थराज कापगते | 124 |

# लोकनाथ यशवंत यांच्या कवितेचे वेगळेपण

डॉ. तीर्थराज कापगते
श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढल
८६५७०४९५०७
tirtharajkapgate@gmail.com

लोकनाथ यशवंत हे मराठी दलित कवितेतील एक महत्त्वाचे आणि सर्वपरिचित असे नाव आहे. आजपर्यंत त्यांचे आता होऊन जाऊ द्या ! ( १९८९ ) ..आणि शेवटी काय झाले ? ( १९९५ ) पुन्हा चाल करू या ..! (२००९ ) बाकी सर्व ठीक आहे... ( २०१४) हे चार संग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या संग्रहांना अनेक पुरस्कार लाभले आहेत. त्या कवितेचा अभ्यास विविध विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून होतो आहे. दलित कवितेत लोकनाथ यांच्या कवितेचे वेगळेपण अनेक अंगांनी तपासून पाहण्यासारखे आहे. या कवितेची वाङ्मयीन गुणवत्ता व मौलिकता कळण्यासाठी तिच्या काही वेगळ्या वैशिष्ट्यांची चर्चा करायला पाहिजे. त्यांच्या कवितेने कवितेच्या रचनातंत्राला वेगळी शैली प्रदान केली व तिचे बाह्य स्वरूप बदलवून तिच्या आविष्कारासोबतच अंतरंगातही विलक्षण सामर्थ्य पेरले.

केवळ दलित कवितेतच नाही तर एकूणच मराठी कवितेच्या परंपरेत तिचे वेगळेपण समजून घेणे आणि या कवितेने दलित कवितेला नवा चेहरा का व कसा दिला आहे हे तपासणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे आजच्या आव्हानांशी आणि काळाशी तिचे काय नाते आहे  हे समजून घेणेही  आवश्यक आहे. त्यासाठी ती प्रकाशित झाली त्या काळाचा आपण अगदी संक्षिप्त आढावा घेतला पाहिजे.

### मराठी दलित कविता :

मराठीमध्ये दलित कविता ही पोस्टर पोएट्रीसारखी सुरू झाली. रस्त्यावर बाहेर आपापसात बोलणाऱ्या लोकांसोबत ती सुरू झाली. दलित कवितेचा जन्म चळवळीतून झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानातून १९६० नंतरच्या काळात दलित साहित्य चळवळ उदयाला आली. आणि त्यातून या कवितेची निर्मिती झाली. हे दलित कवितेचे माध्यम दलित कवींनी एखाद्या धारदार शस्त्रासारखे वापरले. ती एकाच वेळी अत्यंत प्रभावीपणे व्यक्ती आणि समूह यांचा आक्रोश व्यक्त करू लागली. तिच्यात हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या समाजाची वेदना होती. तिच्यातील नकाराची भाषा येथील परंपरेला नकार देते ; कारण ती हे जग आणि जीवन नव्याने मांडू पाहण्याचे स्वप्न घेऊन मराठी साहित्यात अवतरली होती ; आणि त्यासाठी  तिने येथील माणसांशी  नाते जोडले.

ही दलित कविता <u>बासष्ट- पासष्ट</u> पर्यंत ती जोरदार कृतीवादी होती. पुढे १९७२ मध्ये दलित पॅंथर मुव्हमेंट सुरु झाली. दलित पॅंथर चळवळीला सुरुवात झाल्यानंतर एकूणच दलित साहित्य चळवळीच्या अविष्काराला फार बहर आला होता. मात्र पुढे ती चळवळ <u>थंडा</u>वली. लोकनाथच्या यांच्या भाषेत सांगायचे तर,

'त्या विराट मोर्च्यांचे रूपांतर शेवटी आमसभेत होते
यापेक्षा आपली शोकांतिका कुठली होऊ शकते ?'[1]

नव्वदच्या दशकात ही दलित सांस्कृतिक चळवळ मंदावली, त्या मंदगतीचे नाते दलित राजकीय चळवळीशी असल्याचे निरीक्षण अभ्यासक नोंदवतात. त्याकाळात स्वतः ढसाळ लिहिणे बंद करतात. एकून दलित कविता थांबली होती .

दलित कवितेचे दोन टप्पे :

पुढे नव्वदनंतर राजकारण आणि कविता वेगवेगळी झाली. नव्वदपूर्वीची दलित कविता आणि नव्वद नंतरची दलित कविता असे दलित कवितेचे दोन टप्पे आहेत. खरंतर नव्वद नंतरची दलित कविता बदललेली दिसते. ढसाळांची कविता बदलली. केशव मेश्राम यांची कविता बदलली. आधी ती प्रचंड आक्रमक होती, विद्रोही मोर्चा घेऊन जाणारी होती. ती आता मान्य करणारी (कबुल करणारी ) होऊ लागली. नव्वद पूर्वीची आणि नव्वद नंतरची दलित कविता यात हा मूळ फरक आहे.

**दुसऱ्या पिढीची कविता :**

दलित कवितेच्या या दुसऱ्या टप्प्यावर दुसऱ्या पिढीची कविता म्हणून जाने १९८९ मध्ये म्हणजे लोकनाथच्या वयाच्या ३३ व्या वर्षी त्यांची कविता बाहेर आली. आता होऊन जाऊ द्या ! म्हणजे नव्वदपूर्वी लिहिलेल्या या कविता आहेत. तिला समूहाचा सूर आहे. मुखपृष्ठावर समूहाचे चित्र आहे. हा समूह मोर्चात सहभागी होण्यासाठी आला आहेत. लोकनाथ यांच्या संग्रहावाराची मुखपृष्ठे फार बोलकी असतात. भ. मा. परसावळे आणि श्रीधर अंभोरे यांनी ती केली आहेत. पण मुळात मुखपृष्ठे तयार करणाऱ्याला जे इनपुट लागते ते कवीच देत असतो .

त्या संग्रहाच्या क्रेडिट पेजवरही पहिला समूह अशी नोंद आहे. अटीतटीची वेळ आहे. संघर्षाची भाषा आहे. म्हणूनच समूहसुरातून आवेषाचा उद्घोष आहे. : आता होऊन जाऊ द्या ! दालित मुक्तिलढा निर्णायक टप्प्यावर आणण्याची घोषणा त्या संग्रहात आहे. खरे तर लोकनाथ यांच्या संग्रहाची शीर्षके आणि त्यातील कधी उद्गार, कधी प्रश्न तर कधी नुसते विधान हे म्हणजे कवितेचीच रूपे आहेत. काळाचा आरसा दाखवण्याचे व वाचकाशी संवाद साधण्याचे प्रचंड सामर्थ्य त्या एका वाक्यातच आहे.

या दुसऱ्या पिढीतील दलित कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे आत्मपरीक्षण या आत्मपरीक्षणात दलित चळवळीची चिकित्साही आहे चळवळीचा वैयक्तिक फायद्यासाठी उपयोग करून घेणाऱ्या नेत्यांच्या वर्तनातील अंतर्विरोधाची छाननी आहे.

त्यानंतर सहाच वर्षांनी १९९५ मध्ये त्यांचा दुसरा संग्रह आला. आणि शेवटी काय झाले ? आणि शेवटी काय झाले हा एक प्रश्न आहे. जो कवितेचे रूप घेऊन उगवला. पण तो सूचक आहे. जी दलित चळवळ थंडावली त्या दलित चळवळीची चढती कमान आणि त्यानंतरची दुर्दैवी वस्तुस्थिती याचा आलेख या कवितेत आहे. तो बघण्यासाठी या दोन संग्रहांमधला अन्योन्य संबंध तपासणे गरजेचे आहे.

या दोन संग्रहाच्या शीर्षकामधला विरोधाभासातूनच लोकनाथ यांनी तो लेखाजोखा वाचकापुढे मांडला . पहिल्याच्या मुखपृष्ठावर पेटलेली माणसे आणि दुसऱ्या संग्रहाच्या मुखपृष्ठावरील भकास चेहरे . तो समूह सामाजिक उत्थानासाठी हत्यार तपासतच होता. युद्धाला सुरुवात झाल्याचे सांगतच होता ; तर अवसानघात झाला. म्हणून तर आपल्या पुढाऱ्यांना ते उद्वेगाने विचारताहेत : आणि शेवटी काय झाले ? खरे तर धर्मांतर नावाच्या कवितेतील या ओळी; पण या संग्रहाच्या शीर्षकामुळे त्या दलित चळवळीचा लेखाजोखा मांडणाऱ्या प्रातिनिधिक ओळी ठरतात :

आणि शेवटी काय झाले ?
सारे आतल्या तुरुंगातून
बाहेरच्या तुरुंगात आले ! 2

**जागतिकीकरणाच्या प्रभावाची कविता :**

या नंतर काळाचा चेहरा दाखवणयाचे लोकनाथ यांच्या कवितेचे सामर्थ्य वाढतच गेलेले आहे. नव्वदच्या कालखंडात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. ही नवी बाजार व्यवस्था आहे. जागतिकीकरण ही भ्रष्टाचार निर्माण करणारी आहे. या भ्रष्टतेतूनच सर्वत्र मॅनिप्युलेशन आले. राजकारणात मतांचे मॅनिप्युलेशन आले. नव्वदनंतरचे राजकारण अधिकाधिक मॅनिप्युलेटिव्ह होताना दिसते. साहजिकच दलित राजकारणातही या प्रवृत्तीचा शिरकाव झाला. मतांचे मॅनिप्युलेशन आणि पक्षबदल. इथे दलित कविता मवाळ झाली. या ठिकाणी मवाळ शब्द जहाल-मवाळ या अर्थाने नाही. मवाळ म्हणजे ती आता मोर्चा नेणारी आक्रमक राहिली नाही. ती रिफ्लेक्टिव्ह झाली. लोकनाथ यांच्या कवितेत हे रिफ्लेक्शन प्रकर्षाने दिसते आहे. या काळाचे नेमके प्रतिबिंब या कवितेत दिसते. ती वेगळी आहे ती या अर्थाने. ती गोष्ट सांगत नाही. तर ती फक्त कमेंट करते. भाष्य करते. म्हणून पुढे पुढे ही कविता संपूर्णपणे जागतिकीकरणाच्या प्रभावाची कविता होत जाते.

'शेवटी हावरट महासत्तेनं
गिळूनच टाकलं जोड्या-मोज्यासहित देशाला
स्मशानवत पोटात
संपन्नतेची इस्टमनकलर स्वप्नं दाखवून [3]

ती ज्या घटनेला रिस्पॉन्ड करते. प्रतिसाद देते ती एकूणच जागतिकीकरणाची घटना आहे. त्यानंतर बरोबर चौदा वर्षांनी आलेला पुन्हा चाल करूया...! हा २००९ ला प्रकाशित झालेला संग्रह. पुन्हा नव्याने उभे राहून मानवमुक्तीचे युद्ध जिंकण्याचा एक आत्मविश्वासी काव्योद्गार या शीर्षकात आहे.

या संग्रहात असहाय झालेल्या बापाची अत्यंत व्याकुळ अनुभव देणारी एक कविता आहे. लोकनाथ यांच्या खास उपरोधशैलीत ती लिहिली आहे. 'वडिलाने मुलाला पोस्ट न केलेले पत्र'. हे त्या कवितेचे नाव. या भ्रष्ट व्यवस्थेला बघून हतबल बाप मुलाला मुखवटा लावण्याचा आग्रह करतो आहे :

बालपणापासून शिकवलेले मानवी आदर्श
चूक की बरोबर
हा निर्णय मी राखून ठेवतो
ती माझी मर्यादा आहे
पण तू एखादा मुखवटा निवडला पाहिजेस
अशी माझी इच्छा आहे [4]

भ्रष्टतेची मुळे किती खोलपर्यंत शिरलेली आहेत अन् जीवन अधिकाधिक किती अर्थहीन होत चाललेले आहे. याचे दर्शन ही कविता घडवते. दांभिक झालेली, मुखवटे लावून खरा चेहरा लपवणारी माणसे सगळीकडे दिसत आहेत. लोकनाथ यांच्या शैलीचे सामर्थ्य ओळखायला ही एकच कविता पुरेशी आहे. जागतिकीकरणात माणसाचे झालेले अवमूल्यन. बाजारपेठी व्यवस्थेत माणसाचे वस्तू होणे. अशा सर्वच गोष्टी ही कविता प्रतिबिंबित करते.

**दलित कवितेतला रिफ्लेक्टीव्ह मोड :**

दलित कवितेतला हा रिफ्लेक्टीव्ह मोड सर्वात यथार्थ पद्धतीने आविष्कृत होतो तो लोकनाथ यशवंत यांच्या कवितेत. कमीत कमी शब्दात ती प्रतिबिंबित होणे. हे तिचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये आहे. ज्या शब्दांना गंगाधर पानतावणे यांनी आता होऊन जाऊ द्या या त्यांच्या पहिल्याच संग्रहाच्या प्रस्तावनेत "सारशब्द ' म्हटले आहे. ते म्हणतात : 'सपन्न आशय आणि सशक्त अर्थबीज ही दलित कवितेची धारणा आहे .कवी लोकनाथ यशवंत ह्यांची कविता ह्याच पाऊलखुणा शोधात निघालेली आहे'[5]

अशा कमी शब्दांत ती कितीतरी मोठी imaginary कल्पनासृष्टी ती निर्माण करते. ती तिची फार मोठी ताकद आहे. या तीन चार ओळीत तुमच्या विचारात फार मोठा प्रस्फोट घडवून आणण्याची ताकद आहे. त्यांच्या 'पुन्हा चालू करुया या संग्रहात 'बैल' नावाची एक कविता आहे. हा बैल आपल्या मालकाला सांगतो की तुमच्यापेक्षा कितीतरी पतीने वाईट आयुष्य माझ्या वाट्याला आले. पण मी खचलो नाही,

आणि मालक ,

तरीही तुम्ही आत्महत्या करता ? 6

या अगदी छोट्याशा कवितेने दिग्दर्शकाच्या मनात कल्पनेचे भव्य आकाश विस्तारीत केले. त्यातून 'बाईस्कोप' नावाचा एक चित्रपट तयार झाला .

लोकनाथची कविता यासाठी महत्त्वाची आहे की ती आधीची परंपरा मोडते. ती दलित कवितेचीच नाही तर मराठी कवितेचीही पंरपराही मोडते. ती आधुनिकतावादी आहे. या अर्थाने कीं , ती कविता लिहिण्याचा पूर्णपणे नवीन प्रघात निर्माण करते. त्यांच्या चारही पुस्तकांचे आकार सुद्धा वेगवेगळे आहेत. ही कविता स्वत:चे बाह्यरूप नव्याने निर्माण करते. कविता कागदावर कशी अभिव्यक्त करावी याचा प्रयोगही कवी नव्याने करतो आहे हे दिसून येते .

ही कविता एकाखाली एक लिहिली जात नाही. तर ती पृष्ठाच्या खालच्या भागात लिहिली जाते. वरची मोकळी जागा का आहे ? पानभरांत तर दोन तीन कविता सामावू शकल्या असत्या. इथे तर पानभरांत फक्त तीन- चार ओळी आहेत. त्याही कुठेतरी मध्येच. याचा अर्थ ती स्वतःसाठी एक स्पेस निर्माण करीत आहे. मराठी दलित कवितेत. मराठी कवितेत. तिला तिथे उभे राहून कॉमेन्ट करायचे आहेत. भाष्य करायचे आहे. त्या मोकळ्या जागेला खूप अर्थ आहे. ती स्पेस काहीतरी सूचित करते. ती म्हणते की आम्ही खूप काही सांगू शकतो ; पण सांगायची गरजच नाही. तीन चार ओळीतच जे काही ते ती सांगू शकते. त्यामुळे सर्व स्पष्टीकरणे बाद झाली आहेतत आणि फक्त कॉमेंट शिल्लक आहेत.

ती कविता तिथे उभी आहे ; कारण तिला तिथे उभे राहून तटस्थपणे कॉमेंट करायचे आहेत. पण त्याचवेळी ती संपूर्णपणे दलित कवितेचा आणि चळवळीचाच एक भाग आहे हे ती विसरत नाही. ती तिथे उभी आहे कारण तिला आत्मपरीक्षण करायचे आहे. लोकनाथच्या कवितेचे हे प्रतिबिंबित्व फार लक्षवेधक आहे. तिच्या रचनेत एक वैशिष्ट्य आहे. काही ओळी लिहिल्यावर ती थांबून जाते. म्हणून त्या कवितेतली ती दोन किंवा तीन टिंबे महत्त्वाची आहेत. तो त्याने घेतलेला एक पॉझ आहे. ज्याला काही सांगायचे आहे असा त्याच्या अगदी जवळचा माणूस आहे. त्याच्याशी तो बोलतो आहे. ती साद नाही. ती हाक नाही. त्याच्यासोबत तो आपली संवेदना आणि विचारधारा शेअर करू इच्छितो. अशा पद्धतीने ती लिहिली आहे. म्हणूनच ती वेळोवेळी आत्मपरीक्षणाला सिद्ध होते.

अशा प्रकारे लोकनाथची कविता ही प्रतिबिंबात्मक ( Reflective ) आहे. अर्थपूर्ण कमेंट करणारी आहे.. भाष्य करणारी आहे. उपरोध आणि उपहास हा त्या भाष्याचा गाभा आहे. स्वतःच्या परिक्षणापासून ती सुरू होते. पुढे तिच्या निरीक्षणातून आणि परीक्षणातून सहसा कोणीच सुटत नाही.

या कवितेत शहरातले संदर्भ फारसे न येताही ती शहरी संवेदना मांडणारी आहे. तिच्यातील गती आहे ही शहरातील आहे. या कवितेत या काळाचे खूप प्रस्ट्रेशन आहे. ते फ्रस्टेशन दलित युवकाचं आहे. ते या काळातल्या समग्र माणसांचं आहे.

दलित साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले जात असले तरी त्यात आता साचलेपणा निर्माण झाला का ? जागतिकीकरणाच्या या बदलत्या व आव्हानाच्या काळात दलित साहित्य समकालाचे आकलन कसे करेल ? लोक म्हणतात की, दलित साहित्याच्या उत्कर्षाचा काळ आता संपलेला आहे. पण डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांच्या मते तर जो जो वंचित आहे तो दलित. औपचारिकरित्या जो कोणी पिचला जातो तो दलित. दलित ही सर्वसमावेशक संकल्पना आहे. म्हणजे त्या अर्थाने स्त्री सुद्धा दलित आहे. दलित हा शब्द संविधानात नाही आहे. हा शब्द तर आंबेडकर मृत्यूनंतरच्या वेळचा ; आणि त्यांचा तो स्वर कधीच संपू शकत नाही.

फ्रेंच तत्त्वज्ञ आणि विचारवंत मिशेल फुकोच्या म्हणण्यानुसार , तुम्ही समाजातून सत्ता हटवू शकत नाही. तिचे केंद्र नेहमी बदलत असते. ते केंद्र समजून घेणे महत्त्वाचे आहे. आतापर्यंत सत्तेला विरोध करणारी जी तत्त्वज्ञानं आहेत, त्यांचं म्हणणं आहे की, आपण सत्ता नष्ट करू, पण फुकोच्या म्हणण्यानुसार, सत्तेशी लढण्याचे दोनच मार्ग आहेत : एक म्हणजे तिला ओळखता येणे, तिची ताकद घेणे. सत्ता असतेच. फक्त ती सतत एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे जात असते ; आणि तिचा एका बाजूशी दुसऱ्या बाजूशी बॅलन्स, समतोल राखणे हाच तिच्या प्रतिकाराचा उपाय आहे.

पॉवर कायम असेलच, पण Position is the power, not the person. म्हणून सत्ता असेल तोपर्यंत दलितत्व असेल. म्हणून दलित कविताही कायम असेल. म्हणूनच यानंतरची दलित कविता कशी असेल ? दलित चळवळीचे स्वरूप काय असेल ? तिची दिशा कशी असेल ? याचं उत्तर लोकनाथ यांच्या कवितेत आहे, असे मला वाटते.

**सूत्रबद्ध आणि सैद्धांतिक भाष्य :**

लोकनाथची कविता अनेक पदरी आहे. अनेकस्तरीय अर्थाची वलये तिथे आहेत. सूत्रबद्ध आणि सैद्धांतिक भाष्य मांडण्याची क्षमता या कवितेत आहे. ज्या गोष्टी रोजच्या जगण्यात आहेत, त्यांनाच प्रतिमा बनवले जाते. त्यांच्या कवितेत रोजच्या वापरातील शब्दांचे अर्थ बदलून ते अनेकार्थी होता जातात. आणि तरीही ते अर्थ एकमेकांशी जोडलेले असतात. ही कविता स्वत: अर्थ सांगण्याचा प्रयत्न करीत नाही. वाचकांना ती अर्थ शोधायला आमंत्रित करते.

नव्वदोत्तर काळातील ग्लोबलायझेशनला ती प्रतिसाद देते. आम्ही ठीक आहोत. आम्ही सुरक्षित आहोत. आम्ही ओके आहोत. वी आर फाईन. कोणी दिली ही भाषा जागतिकीकरणाने. जागतिकीकरण इंस्टुमेंटल रॅशनालिटी निर्माण करते. लेट कॅपिटॅलिझम, ज्यात तुम्ही इतके इनडीव्हीज्युअल होऊ शकता. म्हणजे तुम्ही सांगता आहात : बाहेर दुसरी लाट सुरु आहे. लोक मरताहेत ! पण बाकी सर्व ठीक आहे. लेट कॅपिटॅलिजमने दिलेली ही भाषा आहे. तिने आमच्या हातात संगणक दिला. दुसऱ्या लाटेत लोकांकडे नेटफ्लिक्स होते. यु ट्युब होते. तेव्हा तुमच्याकडे डिलिव्हरी बॉय यायचा. त्याला कधीही कोविड होऊ शकत होता ; पण तुम्हाला तो होत नाही. अशा सगळ्यां गोष्टींना ही कविता रिस्पॉन्स देते.. बाकी सर्व ठीक आहे ही अतिशय सौंदर्यपूर्ण ओळ आहे. खरे तर ही ओळ म्हणजेच संपूर्ण कविता आहे. शिवाय या संग्रहातली भाषा, विशेष म्हणजे इतक्या वर्षात कवीने सातत्यपूर्ण आणि अतिशय निष्ठेने कवितालेखन केल्याने त्याच्या कवितेत झालेला वाढविकास ती दर्शवते. तिच्या अनुभवविश्वाच्या कक्षा आता विस्तारल्या आहेत.

पिण्याचे पाणी नाही
नि हँडपंपला दांडेच नाहीत
जीवाच्या आकांताने बोलत होतो
तो बॅलेन्सशीटच्या विपश्यनेत मुश्किल होता ?

अशी तीन संग्रहानंतर या चौथ्या संग्रहातील भाषानिर्मितीवर त्याची स्वतंत्र मुद्रा आहे उमटली आहे.यावेळी तर तो आणखी साधे शब्द वापरतो. बाकी सर्व ठीक आहे... हे अगदी साधे विधान आहे . दररोजच्या वापरातील हे विधान आहे. अजून काय म्हणतोस ? बाकी सर्व ठीक आहे. म्हणजे दररोज आपण जे बोलतो त्या भाषेतच

वर्तमान जगाचा अर्थ आहे. माणसाची भावनिक किंवा मानसिक अवस्था त्यातून सूचित होते. मानवाची बौद्धिक अवस्थाही त्यातून सूचित होते. ही भाषा नेट कॅपिटलायझेशन निर्माण करते. यात माणसाचे संपूर्ण तुटलेपण सूचित झाले आहे. या काळाने माणसाला एक सुन्नपणा दिला आहे. बधिरता दिली. numbedness. आज आपण माहिती तंत्रज्ञानाच्या अशा अत्युच्च पॉईंटवर आलो आहोत. जशी संपूर्ण जगाची संस्कृती बांधून घेतली आहे. जागतिकीकरणाने एकसांस्कृतिकता निर्माण केली. मोनोकल्चर निर्माण केले आहे. जग जास्तीत जास्त होमोजिनिअस बनत जात आहे. एकसंध झाले आहे. याचा रिस्पॉन्स आहे म्हणजे ... बाकी सर्व ठीक आहे. लोकनाथ यांच्या कवितेत हे सगळे आहे , म्हणून ती फार महत्त्वाची कविता आहे.

**निष्कर्ष :**

१. नव्वद पूर्वीची आणि नव्वद नंतरची दलित कविता हे दलित कवितेचे दोन प्रमुख टप्पे आहेत. नव्वदोत्तर काळाच्या दुसऱ्या टप्प्यावर दुसऱ्या पिढीची कविता म्हणून लोकनाथ यशवंत यांची कविता वाचकांपुढे येते.

२. लोकनाथ यशवंत यांच्या कवितेने कवितेच्या रचनातंत्राला वेगळी शैली प्रदान केली व तिचे बाह्य स्वरूप बदलवून तिच्या आविष्कारासोबतच अंतरंगातही विलक्षण सामर्थ्य पेरले. कमीत कमी शब्दात प्रतिबिंबित होणे हे तिचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये आहे. कमी शब्दांत ती कितीतरी मोठी कल्पनासृष्टी ( imaginary ) ती निर्माण करते. तीच तिची फार मोठी ताकद आहे.

३. दलित चळवळ,संघटनेची त्या दलित चळवळीची चढती कमान आणि त्यानंतरची दुर्दैवी वस्तुस्थिती याचा आलेख लोकनाथ यांच्या कवितेत फार प्रभावीपणे  मांडला आहे. तो लेखाजोखा म्हणजे दलित कवितेतला प्रतिबिंबात्मक ( Reflective ) मोड आहे. तो लोकनाथ यशवंत यांच्या कवितेत सर्वात यथार्थ पद्धतीने आविष्कृत होतो.

४. जागतिकीकरणाच्या घटनेला ती प्रतिसाद देते. लोकनाथची कविता ही अर्थपूर्ण भाष्य (कमेंट ) करणारी आहे. उपरोध आणि उपहास हा त्या भाष्याचा गाभा आहे. या भाष्य शैलीचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

५. दलित कवितेचीच नाही तर मराठी कवितेचीही परंपराही ही कविता मोडते.या अर्थाने ही आधुनिक कविता आहे. या कवितेत या काळाचे खूप फ्रस्ट्रेशन व्यक्त झाले आहे. ते फ्रस्टेशन दलित युवकाचं आणि या काळातल्या समग्र माणसांचे आहे. ते फ्रस्टेशन समजून घ्यायला ...बाकी सर्व ठीक आहे ! हा संग्रह अभ्यासाने गरजेचे आहे. बाकी सर्व ठीक आहे ! या संग्रहातील भाषानिर्मितीवर लोकनाथ यांची स्वतंत्र मुद्रा आहे उमटली आहे.


**संदर्भ :**

१. लोकनाथ यशवंत,  आता होऊन जाऊ द्या ! (मुक्तछंद प्रकाशन, दुसरी आवृत्ती २००३ )  पृ.३४
२. लोकनाथ यशवंत, आणि शेवटी काय झाले? (प्रकाशक : सुषमा रायपुरे, नागपूर, दु. आ.२००६) पृ. ४१
३. लोकनाथ यशवंत पुन्हा चाल करू या... !  (समुद्र पब्लिकेशन, नागपूर ,चौथी आवृत्ती २०१६) पृ. ९८
४. लोकनाथ यशवंत  पुन्हा चाल करू या... !  (समुद्र पब्लिकेशन, नागपूर,चौथी आवृत्ती २०१६) पृ. १०६
५. लोकनाथ यशवंत,  आता होऊन जाऊ द्या ! (मुक्तछंद प्रकाशन, दुसरी आवृत्ती २००३ )  पृ.६
६. लोकनाथ यशवंत, पुन्हा चाल करू या... !  (समुद्र पब्लिकेशन, नागपूर ,चौथी आवृत्ती २०१६  ) पृ.९०
७. लोकनाथ यशवंत, बाकी सर्व ठीक आहे.. (समुद्र पब्लिकेशन, नागपूर , पहिली आवृत्ती २०१४ ) पृ.२२

ISSN 2278-9243

# कविता-रती

जानेवारी–फेब्रुवारी व मार्च–एप्रिल २०२२
वर्ष ३७ वे : अंक २ व ३



# 'गणपत वाणी' (बा. सी. मर्ढेकर) : गणपत वाण्याचे किरकोळ कवितांचे दुकान !

तीर्थराज कापगते

'मर्ढेकरांची कविता' या संग्रहातील 'गणपती वाणी ...' ही प्रसिध्द कविता आहे. मर्ढेकरांच्या कविता दुर्बोध म्हणून सर्वसामान्य रसिकांपासून दूर असल्या; तरी त्यांचा 'गणपती वाणी' अनेकांना शालेय पुस्तकातून कधीतरी भेटत असतो. एक वेधक आणि विशिष्ट शब्दचित्र म्हणून या कवितेकडे पाहिले जाते. सामान्य माणसांची अपुरी राहणारी छोटी छोटी स्वप्ने आणि स्वप्नपूर्तीपूर्वीच त्याला मिळणारी जीवनमुक्ती याचे एक करुण चित्र ही कविता रेखाटते. एका एकाकी, उपेक्षित माणसाविषयी इतका सूक्ष्म विचार करणाऱ्या मर्ढेकरांच्या कल्पनाशक्तीविषयी आदर वाटतो. त्यांच्या निरीक्षण व कल्पनाशक्तीचे जसे कौतुक वाटते तसे ही कविता त्यांच्या इतर कवितांपेक्षा वेगळी असल्याने थोडे आश्चर्यही वाटते.

एखाद्या गणपत वाण्याचे एवढे प्रभावी चित्रदर्शी काव्य रेखाटण्यात मर्ढेकर आपली उत्तुंग काव्यप्रतिभा इतक्या आत्मनिष्ठेने कशी काय खर्ची घालतील ? या रूपकातून त्यांना वेगळा अर्थ तर आविष्कृत करायचा नसेल ना? असे प्रश्न पडल्याने या कवितेकडे जरा वेगळ्या दृष्टीने पाहण्याचा हा एक प्रयत्न आहे.

'गणपत वाणी बीडी पितांना
चावायाचा नुसतिच काडी ;
म्हणायचा अन् मनाशींच की
ह्या जागेवर बांधिन माडी ;'

किरकोळ शब्दविक्या कवी, गणपत वाणी विडी पितो म्हणजे कवी असण्याच्या, खोट्या, कल्पनेच्या राज्यात वावरतो ! नुसतेच चावून चोथा झालेले काडीसारखे रुक्ष, नीरस शब्द पुन्हा पुन्हा प्रसवतो, चावतो व फेकतो ; आणि तरीही त्याला वाटते, म्हणजे स्वतःशीच तो बोलत राहतो की, आपण या बळावर एक दिवस मोठे कवी होऊन या शब्दांच्या वीटांनीच मोठी इमारत बांधू. आता इमारत नुसत्या वीटांनी थोडीच बांधली जाते ? शिवाय कवितेतले शब्दही मजबूत, प्रसारणशील असावेत.

ज्या भाषेचे शरीर शब्दांचे बनले आहे ते शब्द विशुद्ध अशा पंचसंवेदनांना चिमटीत पकडणारे सत्त्वशील असू दे - 'द्रौपदीचे सत्त्व माझ्या लाभु दे भाषा- शरीरा...' अशी मागणीच ते 'भंगू दे काठिण्य माझे...' या त्यांच्या एका कवितेत करतात. याच कवितेत कवी म्हणून माझ्याजवळ केवळ उत्कट संवेदना असणेच आवश्यक नाही, तर मला

धैर्यशांती, क्षमा आणि अतुल उंचीचे व्यक्तित्वही लाभू दे, अशी प्रार्थना ते ईश्वराजवळ करतात, आणि अहंकाररहित, निःस्वार्थी, मत्सरांचे, मालिन्याचे आम्ल मनात अन् वाणीत नसलेला कलंकरहित माणूस होण्यासाठी ते पसायदान मागतात. 'गणपत वाणी' वाचताना मर्ढेकरांचे 'भंगू दे काठिन्य माझे...' कवितेतील कवीचे वरील मागणे हमखास आठवते.

आता 'गणपत वाणी ...' कवितेतील हे दुसरे कडवे:

'मिचकावुनि मग उजवा डोळा
आणि उडवुनी डावी भिवयी
भिरकावुनि ती तशीच द्यायचा
लकेर बेचव जैशी गवई.'

मंचावर मोठमोठ्याने स्वतःची कविता सादर करण्याचे, काव्यगायन करण्याचे त्याचे हावभाव बघा, ते त्याचे डोळे मिचकावणे, डावी भिवयी उडवणे ! ही लकब बघा. कविता रसिकांकडे नुसती भिरकावतो ! एखाद्या गवयाने बेचव लेकर फेकावी तशी !

'गिऱ्हाइकाची कदर राखणे
जिरें, धणे, अन् धान्ये गळित,
खोबरेल अन् तेल तिळीचें
विकून बसणे हिशेब कोळित ;'

हा भाबडा, शब्दविक्रया कवी पुढच्या रसिक गिऱ्हाईकांना जिरे, धने, अन् गळित धान्ये, खोबरेल, अन् तीळीच्या तेलाप्रमाणे आपले चिल्लर व रटाळ शब्दगद्य विकतो व त्यांच्या प्रतिसादाचा हिशेब मांडत बसतो !

'स्वप्नांवरती धूर सांडणें / क्वचित बिडीचा वा पणतीचा/ मिण् मिण् जळत्या; आणि लेटणें/ वाचित गाथा श्रीतुकयाचा'

क्वचित त्याच्या कवी होण्याच्या स्वप्नांवर एखाददुसऱ्या बऱ्या किंवा मिणमिण जळत्या पणतीसारखा थोड्याशा उजळ कवितेचाही धूर सांडतो ! मात्र हा गरीब वाणी आणि त्या खणखणीत शब्दरत्नांचा धनवान कवी तुकाराम वाण्याचा 'अभंगगाथा' मात्र वाचतो. इथे मर्ढेकर गणपत वाणी आणि 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी । धरिता ही परी आवरे ना ।।' म्हणणारे तुकाराम या दोन वाण्यांची तुलना फार बेमालूमपणे करतात. 'संत शब्दांचे नायक । संत अर्थाचे धुरंधर ;/ एक शब्दांचा किंकर । डफ्फर मी ।।'

खरे तर चांगला कवी होण्यासाठी नुसत्या शब्दांची गरज नाही. सखोल अशा जीवनानुभवाची गरज असते, याशिवाय त्यांच्या जीवनानुभवात त्याचा भवतालही प्रतिबिंबीत होत असतो. तुकाराम वाणी त्यासाठी आपल्या दुकानाबाहेर पडला. कधी भंडाऱ्याच्या डोंगरावर वृक्षवल्लींच्या सान्निध्यात आतमशोध घेताना, 'येणे सुखे रूचे एकांताचा वास, नाही गुणदोष अंगी येत' म्हणत राहिला; तर कधी जनलोकांत मिसळून, 'बुडती हे जन देखवे ना डोळां, म्हणुनी कळवळा येत असे' असे जनकळवळ्याने सांगत

राहिला.

'गोणपटावर विटकररंगी / सतरंजी अन् उशास पोतें ;/ आडोशाला वास तुपाचा/ असें झोपणें माहित होते.'

त्याची स्वतःची कविता म्हणजे नुसती विटकरी रंगाचा गोणपाट, सतरंजी आणि पोते. आडोशाला थोड्या चांगल्या कवितांचा सहवास ; आणि त्या कवितांचे वाचन करत निजणे. आयुष्यभर कवी होण्यासाठी हा हाडांची काडे करत राहिला.

'काडें गणपत वाण्याने ज्या
हाडांची हीं ऐशीं केलीं
दुकानातल्या जमीनीस तीं
सदैव रुतली आणिक रुतली

काड्या गणपत वाण्याने ज्या
चावुनि चावुनि फेकुनि दिधल्या
दुकानातल्या जमीनीस त्या
सदैव रुतल्या आणिक रुतल्या'

कवितेच्या दुकानात आणि त्या दुकानातल्या जमिनीत ती हाडे रूतून बसली आहेत ; आणि ते शब्दही जे आधीच चावून चावून चोथा झाले आहेत ते शब्दही त्या दुकानात रुतून बसलेले आहेत. या कवितेतील शेवटचे कडवे -

'गणपत वाणी बिडी बापडा
पितांपितांना मरून गेला ;
एक मागता डोळे दोन
देव देतसे जन्मांधाला !'

'गणपत वाणी' म्हणजे शब्दबापुडा कवी असाच शब्दांच्या खोट्या विडया ओढत ओढत मरून गेला. उपरोध या मर्ढेकरी शैलीचे इथे दर्शन होते. तरी एक नाही तर असे दोन दोन डोळे या जन्मांधांना मिळतात ; पण खरा प्रतिभासंपन्न कवी हा असा सर्वसामान्य डोळ्यांचा नसतो. तो दृष्टिसंपन्न असतो. त्याच्या जवळ स्वतंत्र अशी काव्यदृष्टी असते. त्याच्या निर्मितीत संवाद-विरोध -समतोलात्मक लयाने निर्माण होणारी जन्मजात सौंदर्यभावना असते, असे मर्ढेकरांचे मत होते. नुसती सौंदर्यभावनाच नाही तर सर्वांना आपले म्हणणारी कारूणायन भावनाही शास्त्र काट्याच्या कसोटीवर उतरलेली काटेतोल असावी. असे ते म्हणतात.

जन्मजात प्रतिभावंत कवी, खरा कवी आणि जन्मभर काव्यकला व क्राफ्टमनशिप शिकत कवितेच्या नादात वेचणारा कवी, असे भेद मर्ढेकर करतात. पल्लेदार आणि काक् छत्रिसम अशी खऱ्या प्रतिभेची आणि खोट्या प्रतिभेची तुलना ते करतात. आपला काव्यविचार केवळ कलाकृतीच्या सुसंघटनेवर व घाटावर अवलंबून असणारा रूपवादी

नसून तो आशयवादीही आहे. असे सुचविण्यासाठीच मर्ढेकर 'गणपत वाणी' ही कविता लिहितात. कवितेत आशयाला, अर्थाला, शब्दातून प्रतीत होणाऱ्या अनुभूतीला असलेले महत्त्व मर्ढेकर वारंवार अधोरेखित करतात.

'शब्द: टराटर फाडुनि टाकी/ सांगायचे म्हणजे ओठी/ तसेच राहिल माझ्या आगदी- / पूर्ण नागडे, पूर्ण नागडे !' किंवा 'भरून येईल हृदय जेधवा/ शरीर पिळुनी निघेल घाम/ अन् शब्दांच्या तोंडामध्ये/ बसेल तुझा गच्च लगाम ;'

म्हणूनच गणपत वाण्याचे शब्दचित्र रेखाटण्यात इतक्या तादात्म्याने आपली प्रतिभा कशी काय ते पणाला लावतील ? असा प्रश्न तर पडतोच ; पण प्रत्यक्ष किराण्याचे छोटेखानी दुकान चालविणाऱ्या गणपत वाण्याला साधी विडीही मिळू नये, ही दारिद्र्य वर्णनातील अतिशयोक्तीही खटकते. शिवाय विडीच्या ठिकाणी नुसतीच काडी ओठांत ठेवणे, हे वर्णनही काहीसे कृत्रिम वाटते. कदाचित मर्ढेकरांनी अशा एका वाण्याचा व्यक्तिगत अनुभव घेतलाही असेल पण त्या अनुभवाचे प्रतिकात्मक अनुभवात त्यांच्या प्रतिभेने रूपांतर केले.

'गणपत वाणी' या कवितेत अशा सामान्य कवीला प्रतिकात्मकरीत्या साकार करताना त्यांचा सामान्य कवीविषयीचा तुच्छतावादी दृष्टिकोन मात्र अधिक प्रखरपणे प्रकट होतो. माधव जूलियन यांच्यासारख्या समकालीन महत्त्वाच्या कवीच्या रचनेतील विसंगती ते दाखवतात ; तेव्हा कवी आणि कवितेकडून त्यांच्या अपेक्षा किती उत्तुंग होत्या याची कल्पना येते ; आणि गणपत वाण्याच्या माडीचे स्वप्न अधिकच करुण वाटते.

एकीकडे 'कविता म्हणजे आकाशातील वीज आहे, ती धरू पाहणारे शेकडा ९९ लोक आपणांस होरपळून मात्र घेत असतात, मी अशा ९९ पैकी आहे', असा काव्यविचार केशवसुत मांडतात. आधुनिक कवितेच्या जनकाचे हे कवितेवरचे भाष्य वीजेइतकेच प्रखर आहे. दुसरीकडे कवितेच्या आशय आणि अभिव्यक्तीत क्रांतीकारी परिवर्तन घडवून आणणारे नवकवितेचे जनक मर्ढेकर आपल्या 'सौंदर्य आणि साहित्य' या ग्रंथांत म्हणतात, 'प्रतिभाधर्मानि खरा कवी एकच ; पहिला आणि शेवटचा, तो म्हणजे बालकवी' त्यांचे हे विधानही समस्त कवी मंडळींनी बालकवींना आदराने कुर्निसात करून स्वतःच्या स्फूर्तीला गोठवून जागीच थबकून जावे असे आहे !

जागतिक संस्कृतिक्षेत्रात मराठी वाङ्मयाला मानाचे जाऊ द्या, पण नामाचेही स्थान नाही किंवा आमच्या लेखकांजवळ जीवनानुभवांची विस्तृतता नाही. विचारांची व भावनांची सखोलता नाही, असे निरीक्षण नोंदविणाऱ्या मर्ढेकरांनी सामान्य कवींची खिल्ली उडविण्यासाठी तर 'गणपत वाणी' कविता लिहिली नसेल ना ? असे वाटून गेल्यानेच हा लेखनप्रपंच.

(डॉ. तीर्थराज कापगते, ३३/बी-३, पत्रकार सहनिवास, सिव्हील लाईन्स, अमरावती मार्ग, नागपूर-४४०००१. भ्रमणध्वनी : ८६५७०४९५०७)

Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## December-2022

**ISSUE No - (CCCLXXXI) 381-A**

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE STATUS & GOALS

75 भारत अमृत महोत्सव

हर राह पर बढ़ते कदम

**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Archana S. Dahane
Principal
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

**Editor**
Dr. Sandip B. Kale
Assistant Professor & Head
Department of Political Sci.
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

All rights reserved with the authors & publisher

Impact Factor – (SJIF) –8.575
ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## December- 2022

ISSUE No- (CCCLXXXI) 381-A

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE STATUS & GOALS

Chief Editor
**Prof. Virag.S.Gawande**
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Executive-Editor
**Dr. Archana S. Dahane**
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

Editor
**Dr. Sandip B. Kale**
Assistant Professor & Head
Department of Political Sci. Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

**OUR INSPIRATOR**

Hon'ble Prof. Sureshbhau B. Deshmukh

Ex-MLA

**CHIEF PATRON**

Hon'ble Shri. Sameerbhau S. Deshmukh

President, Yeshwant Rural Education Society, Wardha

**PATRON**

Hon'ble Shri. Satishrao K. Raut

Vice- President, Yeshwant Rural Education Society, Wardha

**Special Issue : Editorial Board**

Dr. Archana Dahane

Dr. Anant Rindhe
Prof. Vasant Rathod
Dr. Rajendra Mundhe
Dr. Suvarna Daigvhane
Dr. Sandip kale
Prof. Arjun Khobragade
Prof. Vijay Khorgade
Dr. Rashmi Bakane

**Special Issue : National Advisory Board**

Dr. Shyam Koreti (Nagpur)
Dr. Suhasini Bajpai (Wardha)
Dr. Sanjay Choudhari (Nagpur)
Dr. Shyam Khandare (Gadchiroli)
Dr. Arjit Chakraborty (Tripura)
Dr. Bharati Sevtia (Khandwa M.P.)
Dr. Pramod Pawar (Jalgaon)
Dr. Sharyu Taywade (Nagpur)
Dr. Anju Fulzele (Yawatmal)
Prof. Simanta Borah (Asam)
Dr. Neeta Boche (Khamgaon)
Dr. Ashok Sonone (Akola)

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXI.) 381 - A
ISSN : 2278-9308
December 2022

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. [M.S.] INDIA

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responicible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication** ,Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278 /

| | | |
|---|---|---|
| 44 | भारतीय राजकारणातील प्रमुख आव्हाने : जात, भाषा, प्रांतवाद प्रा. सचिन वानखेडे | 155 |
| 45 | जलवायु परिवर्तन परिचय वैश्विक स्तर एवं भारत द्वारा जलवायु परिवर्तन से निपटने हेतु किये गए प्रयास एवं चुनौतियों शैलेन्द्र कुमार शुक्ला | 159 |
| 46 | **The Study Of The Changing Nature Of Career Opportunities In Sports** **DR. Avinash Titarmare** | **177** |
| 47 | भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार सौ. प्रतिभा विश्वनाथ पांचाळ , डॉ. ए. एच. कदम | **180** |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXX.) 380 - A
ISSN : 2278-9308
December 2022

# The Study Of The Changing Nature Of Career Opportunities In Sports

DR. Avinash Titarmare
Shri Lemdeo Patil Mahavidyala, Mandhal, Dist. Nagpur
Mail.id. avinashltitarmare@gmail.com

**Abstract:**

Today, the popularity of sports has increased due to the increasing competition and brilliant careers in sports. Today many career options are open in it. Sports do not mean only cricket but also football, hockey, and tennis. and increasing health services towards sports. In which trainers, coaches, etc. come. Pursuing a career in sports not only gives freedom from a desk job but also a chance to skyrocket at will. Not only can you make a career in sports as a player, but you can also find career options by joining other activities. If you have a passion for whatever sport you play, you can carve a niche for yourself in this profession. One can work in fields such as sports medicine, marketing, administration, management, and journalism. Today, many important players have also contributed to popularizing sports. The doors are open in this field for both men and women. Many great players like Virat Kohli, Mahendra Singh Dhoni, Sachin Tendulkar, Sania Mirza, Saina Nehwal, and Abhinav Bindra have attracted youth towards sports. In this research paper, the changing nature of career opportunities in sports has been studied.

**Keywords:**Career Opportunities, Sports, Medical, Trainer, Coach, Journalism

**Introduction:**

The scope of sports-related careers is increasing in India. Everything is changing with time and so is the mindset of parents. There has been significant growth in sports-related careers in India in the last decade. With interest in sports other than cricket in India and the success of tournaments like the Indian Super League and Pro Kabaddi League, things are looking bright. The success of sportspeople at a recent international sporting event has focused attention on sports careers. Sports help you to make your body physically fit and keep your mind good. If you choose sports as a career, it gives you a lot of fame and money too. These sports career options include sports journalist, sports manager, sports marketing, sports coach, sports dietician, etc.

Till now there used to be only relation between sports and jobs that states and centers do some recruitment in jobs from sports quota, but now there is much more ahead of it. The benefits of the recently organized 'Khelo India Scheme' by the Central Government's Youth Affairs and Sports have further increased the attraction of people towards sports. The reason for this is also to bring laurels to the country for the good performance of the players for the last few years. Due to this investment in this sector has also increased. According to a report by Group M's ESP Property and Sports Power, there has been a 14.1 percent increase in sports sponsorship in the country in the last year. In the year 2017, Rs 7,300 crore was spent on advertising in sports. Whereas in 2016, 6400 crores were spent on this. For this reason, various career options are open in sports and through this one can also get a government job. That's why it is necessary to research what changes have happened in career opportunities in sports.

**Data Collection Method Used for Research:**

The research paper has depended on secondary data.

**Objective of Research:**

1) To study the changing nature of career opportunities in sports.
2) To study the skills required for various career opportunities in sports.

**The Changing Nature of Career Opportunities in Sports:**

In today's time, sports clubs are developing rapidly. People's interest is increasing in this. That's why big companies are also turning towards these clubs. Companies are mobilizing to establish themselves as brands in sports clubs. In such a situation, they will need a skilled manager in the future. This whole scenario is indicating that soon sports management stream will also emerge under business management. Skilled and experienced experts are needed to make equipment/goods used in sports. Some companies involved in the production of sports equipment/goods require experts in sports. Under the Start-up India scheme, there are now many start-ups that are doing sports manufacturing.

ISSN : 2278-9308
December 2022

Many employment opportunities are expected to come in this field as well. People who are interested in sports and writing but do not want to get directly involved in sports can make a career in sports writing. For this, you can directly turn to newspapers or magazines. If you want, you can also do freelance writing.

For a few years, the demand for consultants is increasing due to the increasing trend of people in the health, fitness, nutrition, and medical field. The scope is increasing in the health and fitness business. Many parents are adopting individual fitness programs to make their children good sportsmen. Such programs are also opening up good career options for the players. Every game requires a referee or umpire. The way experiments are being done in our country regarding sports, it is estimated that the more the number of competitions, the more the number of referees/umpires will be needed. But to become a sports adjudicator, it is necessary to have a good knowledge of the rules of the game.

There are many career paths for sports coaches these days as well. At present, good schemes are being run for the players by the Government and the Sports Authority of India. In this, the best coaches are needed to make the players perform well. Good schools are also making room for good mentors. Not only this, but you can also open your own coaching. Many parents get their children admitted to a good trainer for coaching. In such a situation, if you have an interest in sports and you are a player, then you can make a career as a mentor. Not only while playing but also outside the field, you can get better employment opportunities just by being a player. As a sportsperson, you will win laurels by performing well in sports competitions, so you will grow through performance in sports as well as through earning. According to experts, better performance of players in individual games than in team games gives them opportunities at national and international levels.

At present, many universities, institutes, and colleges conduct many tasks for the preparation of a career in physical education, such as B. P.E./B.P.Ed, C.C.Ed. M.A. (Physical Education), M.P.E./M.P. Ed., B.Sc. (Sports & Physical Education), M. Phil., Doctorate (Physical Education), Diploma Course in Coaching, C.C. (Yoga), P.G. Diploma in Yoga, etc. There are immense career possibilities in these too. Career, glamor, and good position are all possible for sports, players, and people associated with it due to various matches and competitions held on a national and international level. Sports has now developed new dimensions of career. Due to the increasing scope of sports, today different types of careers and work are coming out in it. You can make a career in many such fields, such as sports management, preparing sports goods, training players, taking care of their food and health, etc.

A career in sports is as exciting as playing the sport itself. You can be a football coach and play a vital role in helping your team win, or you can work as a fitness coach to keep young players fit and active, you can also work as a sports teacher in a school. can do. You can join a sport and master it, you can play for the country at the national and international level, and you can make a name for yourself. Not only this, but you can also earn name and money by joining sports journalism. You can work in it by joining a good media institute.

Athletic trainers are healthcare professionals who work with the sports medicine team to provide medical care. As an athletic trainer, you can work with professional athletes or a high school football team. Athletic trainers help avoid unnecessary medical treatment and disruption of normal daily life, if you are injured, it is the athletics' job to provide you with healthcare. An athletics coach does how to keep you fit and fit for the game.

A high school athletics coach must have at least a bachelor's degree and a teaching license. They must have a teaching degree or a degree in exercise, kinesiology, physical education, or any relevant field. Athletic trainers need to have at least two years of clinical experience after a bachelor's degree and you can apply to the Board of Certification (BOC) for certification. Some of the services provided by athletic trainers are preventive service, emergency service, clinical diagnosis, and rehabilitation. Mostly Bachelor's degree is considered.

In the last few years, there is a lot of competition among people who want to make a career in sports in India and this is because of the love of people for sports as well as name and fame. From school to professional sports, athletics trainers are in high demand. With each level comes different responsibilities. Professional sports require a lot of talented athletic coaches. So to become a good-level coach one can start as a college coach and athlete and then gradually you can reach the level of head coach.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308 December 2022

Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXX.) 380 - A

Many people think that to make a career in sports, you need to be an athlete or do well in one sport. While the world of sports is very large and there are many different types of jobs and fields in it, for which you do not need to be athletic. You can also make a career in other career options in this field. If you like sports and you are fond of writing and you like to analyze the nuances of sports, then you can give a new direction to your career in sports journalism.

The organization of sports has provided a great opportunity to work in the field of sports management. For this, you must understand the need for sports. Acquire special skills to make it a success. There are many things involved in sports like advertising, marketing, spectators, security and food, etc. The managers must see how to manage all these. Today, a different crop of young managers has been prepared to make a career in sports management. The sports facility manager is responsible for the management of a sports ground or stadium, which includes administration services, soft services, and a host of technical services. They manage the operation and maintenance of sports facilities (buildings, grounds, and related equipment) used at football stadiums, golf courses, gymnasiums, swimming pools, baseball/softball fields, tennis courts, ice rinks, or track and field facilities. We do. These professionals work behind the scenes to put on any successful sporting event - golf, basketball, or football - so you can sit back and enjoy the sporting facilities. In clear words, sports management is the foundation of sports which prepares it for the future.

**Conclusion:**

In today's competitive world, every parent wants to make their child an engineer or a doctor. So that their future can be secured. Well, every parent wants this, but apart from all these options, if you want to make your future in sports, then there is a lot more than just playing that you can do in sports. If you love sports and healthcare, then athletic trainers stand out as a great career option. By the way, you do not need a special degree to make a career in sports. If you want to make a career as a sportsperson, then you have to perform well in school and college-level competitions. On the other hand, to become a sports coach and coach, you have to master sports and do a degree and diploma in subjects like physical education.

**Reference:**


- *Michael D. Hutchinson,Early Career Development In The Sport Industry:Factors Affecting Employment,Submitted To The Office Of Graduate Studies OfTexas A&M UniversityIn Partial Fulfillment Of The Requirements For The Degree OfMaster OfScience,May 2008.*
- *SueMinten, JackyForsyth, The careers of sports graduates: Implications for employability strategies in higher education sports courses, Journal of Hospitality, Leisure, Sport & Tourism Education, Volume 15, July 2014, Pages 94-102, https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/S1473837614000185*
- *Susan Rosemary Minten,Graduate Employability in the Sport and RecreationIndustry: An analysis of the transition from HigherEducation to the workplace,The Management SchoolUniversity of Sheffield, November 2007, https://etheses.whiterose.ac.uk/3631/1/487593_VOL1.pdf*
- *Mantu Baro,Career Opportunities in Physical Education,February 2014,https://www.researchgate.net/publication/273119317_Career_Opportunities_in_Physical_Education*
- *http://stsoldiermohali.com/wp-content/uploads/2020/04/VinayakPE-XI-Ch-1.pdf*
- *https://www.tv9hindi.com/career/career-in-sports-career-options-in-sports-know-how-to-get-jobs-974731.html*
- *https://leverageedu.com/blog/hi/changing-trends-and-career-in-physical-education-in-hindi/*
- *https://kuchsikhe.com/how-to-make-career-in-sport-management-in-hindi/*
- *https://fesn.in/article-view.php?pathid=3563&article=4*
- *https://careerpedia.in/sports-me-career-kaise-banaye-how-to-make-carer-in-sports/*
- *https://mobile.surenapps.com/2020/09/blog-post_948.html*
- *https://www.kreedon.com/top-5-high-paying-jobs-in-sports-for-non-athletes/*
- *https://www.naidunia.com/magazine/career-career-in-sports-754784*
- *https://www.learnhowtobecome.org/career-resource-center/careers-in-sports/*

# HEALTH & HUMAN RIGHTS

Editor
Dr. Archana S. Dahane

Aadhar Publications, Amaravati

# HEALTH & HUMAN RIGHTS


- **Dr. Archana S. Dahane**

- ***First published,* – 10th Dec. – 2022.**



- **© Editor&Publisher**



- **Published by**

Prof. Virag Gawande for

Aadhar Publications,

Behind Govt. VISH,

New Hanuman Nagar,

Amravati – 444 604.

- **Printed by**

Aadhar Publications,


- Notice

**The editor, publisher, owner, printer will not be responsible for the articles published in this issue. The articles published in this issue are the personal views of the authors.**


- Price : 400/-

- **ISBN-** 978-93-91305-91-8

# Index


| S.No | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Psychological Disability and Human Rights **Dr. Gosavi Shubhangi R.** | 1 |
| 2 | Assessment Of Selected Psychological Traits Of Nagpur Inter-Universityplayers **Dr.Pravin D. Lamkhade** | 7 |
| 3 | Women In World Of Sports: Development, Rights And Policies **Dr. Archana m. Falke** | 11 |
| 4 | The Highest Attainable Standard Of Health: The Human Rights **Dr. Prashant S. Khalatkar** | 17 |
| 5 | An Analysis Of Understanding The Concept Of Health **Dr.Swarooprani.k** | 24 |
| 6 | Health And Development: The Human Rights **Dr. Sunil Bhotmange** | 30 |
| 7 | The Study Of National Code Against Age Fraud In Sports And Its Current Status **Dr.Avinash Titarmare** | 36 |
| 8 | Suryanamaskar's impact on some fitness metrics among Nagpur City's stay-at-home population **Dr.Nitin N.Jangitwar** | 42 |
| 9 | United Nation and the World Initiatives to Uplift the Heath Care Facilities **Arijit Chakraborty** | 46 |
| 10 | Post-COVID-19: Global Health Strategies and Human Rights **Dalia Varghese** | 58 |
| 11 | Healthy Habits for Longevity **Dr. Prakash M. Chopade** | 65 |
| 12 | Mental Health And Human Rights. **Dr. Rahul Madhukarrao Rode** | 70 |
| 13 | Where Human Right is Still a Myth A Disability Studies Perspective **Shampa Bhul** | 75 |

# The Study Of National Code Against Age Fraud In Sports And Its Current Status

**Dr. Avinash Titarmare**
Shri Lemdeo Patil Mahavidyala, Mandhal, Dist. Nagpur
Mail.id. avinashltitarmare@gmail.com

**Abstract:**

To eliminate age fraud in sports and to ensure fair play, it is imperative to put in place an effective regulatory mechanism so that appropriate action is taken against athletes found guilty of age fraud. Therefore, the Government has decided that all sports federations/associations/bodies should take appropriate measures to prevent age fraud, as it amounts to fraud, which violates the very spirit of the game. Given the above, it has become necessary to adopt a National Code against age fraud in sports, backed by a well-established mechanism to prevent, detect and punish such offenses. In this research paper, National Code against age fraud in sports and its present status have been studied.

**Keywords:** Age Fraud, Sports, National Code, National Sports Federation

**Introduction:**

The National Code against Age Fraud in Sport, like the Competition Rules, forms part of the Sports Laws governing the rules of the game under which the game is played. Athletes and athlete support personnel are required to accept these Rules as a necessary condition for participating in any sporting event. The National Code against age fraud in sports is not subject to or limited by the requirements and legal standards applicable to criminal proceedings or employment matters. The policies and minimum standards outlined in the Code apply to all sports federations/associations/bodies. Under the Scheme of Assistance to National Sports Federations, the clause for suspension/de-recognition of recognition of NSFs applies for non-adherence to the eligibility criteria and code for recognition of National Sports Federations.

The National Code against age fraud in sports seeks to preserve the core values of sports which are honesty, fair play, and team spirit. Athletes indulging in age fraud in sports not only violate these core values but also put genuine athletes at a disadvantage. Furthermore, it also results in a sub-optimal level of performance for athletes who

commit such cheating, as they end up competing with their juniors and not their age group.

Promotion of sports in the country mainly through various sports promotion schemes by the recognized National Sports Federation, SAI, Sports Authority of India, Sports Control Boards managed by Government Departments and Public Sector Undertakings and State Governments and Union Territories and their Sports Authority This agency includes.

All recognized National Sports Federations must accept this Code and incorporate it either directly or by reference into their governing documents, constitution, and/or competition rules and thereby make it part of the rules governing the sport and its rights and obligations. being adopted as part of As a pre-condition to receiving financial and/or other assistance from the Government of India, National Sports Federations are to accept and abide by the letter and spirit of the Code, including the imposition of penalties against erring athletes.

**Research Methodology:**

The research paper has depended on secondary data.

**Objective of Research:**

1)To study the National Code against age fraud in sports.

2)To study the present status of National Code against age fraud in sports.

**National Code Against Age Fraud in Sports and its Current Status:**

Sports Authority of India implements this code for its various sports promotion schemes for different age groups and for conducting national coaching camps. The Sports Authority of India implements this code for its various sports promotion schemes for different age groups and for conducting national coaching camps. Sports Control Boards are managed by Government and Public Sector Undertakings, And the State Governments and Union Territories and their sports authorities enforce this Code. The above bodies are also required to take appropriate measures to adopt and implement the Code.

The Sports Authority of India, in its Sports Promotion Schemes and National Sports Federations, medically tests all athletes in age-level competitions at the time of registering an athlete or allowing a new athlete to participate in an event. and issues an identity card to the athletes as per the medical report. All existing athletes who are playing in age-level competitions with SAI or NSF, as the case may be, are also medically examined and issued identity cards. If a current athlete is still found to be over-aged after going through the appeals process, they

should be subject to a performance review before being re-adjusted to the appropriate age group as part of the normal weeding out process.

Medical and Scientific Examination Criteria on which medical examination is to be conducted. The Sports Authority of India notifies a panel of doctors and hospitals, preferably government hospitals, State/Territory-wise consisting of a Dental Surgeon, Radiologist, and Physician (Male and Female). The panel is notified annually in December. The physical examination of female athletes is done by female doctors only. The list notified by SAI is also applicable to NSFs. SAI also notifies the Appellate Panel and the list of hospitals, which are essentially government hospitals. The Medical Board shall also consist of a Dental Surgeon, Radiologist, and Physician (a female doctor in the case of a female athlete) and any other medical personnel deemed necessary by the Civil Surgeon. The list of Appellate Panels and Hospitals notified by SAI is also applicable to NSFs. The cost of medical examinations conducted by SAI and NSFs is reimbursed by the government.

The purpose/use of the identity card is to serve as proof of age, specifically for participation in age-restricted events and for training. The identity card will not serve as proof of age for any other purpose. The identity card once issued is valid for the entire sporting career of the athlete. In case of loss/damage, the issue of a duplicate card is permitted on payment of nominal cost by the athlete. The National Sports Federation / Sports Authority of India / Sports Control Board / State Government / State Sports Authority shall maintain a detailed record of age along with proof of age of the athletes to whom identity cards have been issued. Half-yearly reports are submitted by SAI and NSF on the number of overaged athletes.

The Board of Cricket in India (BCCI) will experimentally use software to detect age fraud along with the existing 'TW3' method, to save up to 80 percent in cost while getting results faster. The BCCI, which follows a zero-tolerance policy towards age fraud, currently uses the 'TWThree' method (based on X-rays of the left hand and wrist) for age determination.

The cost of each test in the current method is Rs 2400 and results take three to four days, whereas the proposed use of 'BoneXpert software' will give instant results and cost only Rs 288. For age verification, the BCCI conducts X-rays of the players' wrists in the presence of observers and then the State Cricket Association sends the X-ray copy to the BCCI AVP (Age Verification Department). The BCCI AVP refers him to two independent radiologists from his panel. After evaluating it, the

radiologist submits his report to the BCCI and the entire process takes a long time. BCCI has four radiologists to monitor players from 38 state associations.

There have been several cases of cheating in age group competitions in BCCI-run competitions. In June 2019, Jammu and Kashmir fast bowler Rasikh Alam was banned for two years after being found guilty of submitting a fake birth certificate. Earlier, Under-19 World Cup star Manjot Kalra, Kolkata Knight Riders, and Delhi batsman Ankit Bawne are among the cricketers who have been found guilty of concealing their age. In August 2020, the BCCI launched a voluntary scheme for correct age declaration for its registered players. The BCCI has a provision to ban cricketers who cheat on age for two years.

In the mega auction itself, Chennai Super Kings, captained by MS Dhoni, included Rajvardhan Hangargekar in their team. Maharashtra State Sports Commissioner Om Prakash Bakoria has written to the BCCI seeking strict action against Rajvardhan Hangargekar, a member of India's U-19 World Cup-winning team, for age fraud. In a letter written by Omprakash Bakoria to BCCI Secretary Jai Shah, the fast bowler changed his age from 10 January 2001 to 10 November 2002. Also, he was an over-age player while playing in the recently played Under-19 World Cup. Omprakash Bakoria wrote that Rajvardhan Hangargekar's conduct was against sporting integrity and ethics. Due to this, the fair play could not be done and the prestige of the country was damaged. Therefore, strict action is requested as per law. This letter has also been sent to Maharashtra Cricket Association Secretary Riyaz Baghban. Investigations and reports have revealed that Rajvardhan Hungergekar's schooling was at Terna Public School, Osmanabad. It is governed under the School Code of the Government of Maharashtra. He wrote that the date of birth of Rajvardhan Hangargekar was given as January 10, 2001, at the time of admission to the first class in Terna Public School, Osmanabad. Rajvardhan Hungergekar was born on 10 January 2001. The commissioner alleged that the school made unauthorized changes in Hungergekar's date of birth. He said that as per the General Register of Terna Public School, Osmanabad, his date of birth was 10 January 2001. It appears that the headmaster made unauthorized changes and his date of birth was mentioned as November 10, 2002, at the time of fresh application in class VIII.

If the headmaster needed to change the date of birth, he should have taken necessary approval from the education officer of the concerned district. However, no such approval was taken while changing the date of

birth of Rajvardhan Hangargekar. He said that in this way changes were made outside the rights and it was fraud and forgery of government records.

In September 2011, Maharashtra's Ankit Bawne was also dropped from the India Under-19 team after the date of birth on his passport did not match his birth certificate and BCCI records. The BCCI had decided to adopt a new policy regarding age-related irregularities in domestic cricket. The new rules applied to players participating in all age-group tournaments of the BCCI in the 2020-21 season. According to the new policy, if the player admits his mistake i.e. accepts that he has made an age-related error, then he can be saved. If the player is caught hiding this thing, then the BCCI can ban him for two years.

Under this new policy, the player who submits his fake documents and confesses that he has tampered with his date of birth, then he will not be banned. On telling the correct age, the player will be allowed to play in tournaments. The player will have to submit his signed letter/email, along with which he will have to submit the original date of birth documents after verification from the concerned department by 15th September. If a registered player is found not telling the truth and his documents are forged, he should be banned for two years and after completion of two years, such players will not be allowed to play in BCCI age group competitions.

Only players aged 14-16 can participate in BCCI's Under-16 tournament. A helpline number has also been created to give information about age-related errors. The player who commits residential disturbance, including senior women and men, will be banned for two years. The policy of admitting one's crime will not apply here. The BCCI has decided to adopt a new policy regarding age-related irregularities in domestic cricket. According to the new policy, if the player admits his mistake i.e. confesses that he has made age-related manipulation, then he can be saved and if the player is caught hiding this fact, then the BCCI can ban him for two years.

**Conclusion:**

To eliminate age fraud in sports and to ensure fair play, it is imperative to put in place an effective regulatory mechanism so that appropriate action is taken against athletes found guilty of age fraud. Age cheating in sports is to violate the very spirit of the game. It has become necessary to adopt a National Code against age fraud in sports, backed by a well-established mechanism to prevent, detect and punish such offenses. But it is also important to keep in mind that the innocent player

should not get trapped in it. It is necessary to use a qualified systems and software for fair justice and decision. There is a need to pay attention to the government and related sports associations on how to properly implement the National Code against age fraud in sports.

**Reference:**


- https://indianathletics.in/wp-content/uploads/2020/07/AFI-Manual-Age-fraud.pdf
- https://www.thehindu.com/sport/other-sports/National-code-against-age-fraud-soon/article16894595.ece
- https://www.ijlmh.com/paper/the-menace-of-age-fraud-in-indian-sports-extent-and-analysis/
- https://theprint.in/india/medical-tests-a-national-code-bans-have-not-been-able-to-stop-age-fraud-in-sports/256016/
- https://www.thenrai.in/details.aspx?view=2915
- https://thewire.in/sport/why-age-fraud-in-indian-sports-is-so-prevalent
- https://triathlonindia.com/age-fraud/
- https://thebridge.in/featured/menace-age-fraud-indian-sports-how-can-checked/
- https://www.dnaindia.com/sports/report-sports-ministry-issues-code-to-check-age-fraud-1361478
- https://www.sportengland.org/funds-and-campaigns/code-sports-governance
- https://khelnow.com/football/indian-football-national-sports-code-features
- https://www.linkedin.com/pulse/prevention-age-fraud-india-krida-legal-1f/?trk=organization-update-content_share-article
- https://www.insidesport.in/age-fraud-detection-software-bcci-aims-to-cut-costs-by-80-percent-with-experiment-on-age-detection-software/
- https://www.onlinescientificresearch.com/articles/the-importance-of-governance-in-sports.pdf
- https://www.freepressjournal.in/sports/maharashtra-sports-commissioner-seeks-action-against-rajvardhan-hangargekar-for-age-fraud

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

April - 2023

E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-320

## Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

## INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Theme of Disappointment Frustration Loneliness and Transformation in A.K.Abbas's 'The Sparrows' | Dr. Shrinivas Gadhe | 5 |
| 2 | Exploring the Theme of Degeneration in Anita Desai's Novels A Study of *'In Custody'*, *'Clear Light if Day'* and *'Fasting, Feasting'* | Prof. Kunal Katkade | 8 |
| 3 | Mass Media and English Literature | Dr. Mukund Bhandari | 12 |
| 4 | Social Media Classification Models using Data Mining Techniques: Performance of Decision Tree Algorithm | Dr. Yogesh Somwanshi | 15 |
| 5 | A Study of Buying and Selling Practices in Livestock Markets: with Reference to Select Livestock Markets in Jalna District | Dr. Nilesh Gawade | 20 |
| 6 | Use of REBT in Cognitive Counseling | Dr. Kalpana Vitore | 24 |
| 7 | A Comparative Study of Male and Female Literacy of Maharashtra State | Ms. Vijaya Sonawane, Dr. Anil Pawar | 27 |
| 8 | Implementation of RFID Technology in Digital Libraries towards Saving User's Time and for Efficient Security Set Up | Mr. Ashok Bagul | 31 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 9 | 'रश्मिरथी': आधुनिक युग की समस्याएँ | डॉ. सरोज सोलंकी | 35 |
| 10 | 'भारतीस्तव:' - मातृभूमि का स्तवन | डॉ. मृदुला काळे | 38 |
| 11 | राष्ट्रीय चेतना के विकास में बिलासपुर के साहित्यकारोंका योगदान : एक अध्ययन | अतुल कुमार मिश्रा | 44 |
| 12 | प्रशांत महासागरीय एल निनो दक्षिणी दोलन (एन्सो) के दायरें में वैश्विक जलवायु : एक विहंगावलोकन | डॉ. सुभाष दोंदे | 49 |
| 13 | अकोला क्षेत्र के राजकीय परिवर्तन में शंकरलालजी खंडेलवाल के योगदान का अध्ययन | निशिकांत देशपांडे, डॉ. धर्मराज पवार | 57 |
| 14 | भौगोलिक समुद्री सीमा के परिप्रेक्ष्य में भारतीय समुद्री मात्स्यिकी विधेयक २०२१: एक समीक्षात्मक अध्ययन | डॉ. सुभाष दोंदे | 64 |
| | **मराठी विभाग** | | |
| 15 | झाडीपट्टी रंगभूमीचे मूळ दंडार लोकनाट्यात | डॉ. तीर्थराज कापगते | 71 |
| 16 | लोकगीतांची भाषाशैली व मूल्यविचार | विकास बागलावे | 78 |
| 17 | बुद्ध तत्त्वज्ञान सोप्या भाषेत सांगणारा ग्रंथ - 'बा, तथागता !' | डॉ. धनराज धनगर | 85 |
| 18 | श्री ज्ञानदेव चरित्र : एक अभ्यास | प्रा.अर्चना धारराव (बोराडे) | 95 |
| 19 | संत तुकारामांच्या अभंगवाणीत आलेले : आदर्श जीवनशास्त्र | डॉ. निलिमा कापसे | 99 |
| 20 | महात्मा जोतीराव फुले आणि सत्यशोधक जलसे | डॉ. जितेंद्र गिरासे | 103 |
| 21 | महात्मा फुले यांच्या साहित्यातून प्रकट होणारे सामाजिक क्रांतीचे विचार | डॉ. गणेश चौधरी | 107 |
| 22 | १९९० नंतरच्या दलित कवितेतील बदलते संदर्भ | डॉ. विजय केसकर | 115 |
| 23 | गांधीवादी विचार आणि 'मिरला' कथासंग्रह | डॉ. संजय पाटील | 125 |
| 24 | 'मौर्चा' काव्यसंग्रहातील सामाजिक जाणिवा | प्रा. दिनेश गुजर | 132 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Issue - 320 : Multidisciplinary Issue | April-2023
Peer Reviewed Journal
Impact Factor 6.625

# झाडीपट्टी रंगभूमीचे मूळ दंडार लोकनाट्यात

डॉ.तीर्थराज कापगते
मराठी विभाग प्रमुख
श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ
8657049507, kapgate2022@gmail.com

महाराष्ट्राच्या अतिपूर्वेकडील झाडाझुडपांनी युक्त अशा भूप्रदेशाला 'झाडीपट्टी' असे संबोधले जाते. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि अलीकडील गोंदिया या चार जिल्ह्यांचा समावेश झाडीपट्टीत होतो. हा प्रदेश भरपूर पावसाचा, घनदाट वनराईचा आणि छोट्या-मोठ्या डोंगरांनी वेढलेला आहे. या झाडीपट्टीची स्वतःची एक वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण रंगभूमी आहे. तिला 'झाडीपट्टी रंगभूमी' असे म्हणतात.

'झाडीपट्टीची रंगभूमी' जशी समृद्ध आहे तशीच तेथील 'लोकरंगभूमी'ही समृद्ध आहे. तिला अनेक शतकांची परंपरा आहे. फार पूर्वीपासूनच या परिसरात खडीगंमत, राधा, भिंगीसोंग, तमाशा आणि दंडार अशी प्रयोगक्षम लोकनाट्ये मनोरंजनाचे कार्य करीत होती. ही लोकनाट्य म्हणजे झाडीबोलीतील आद्य सर्जनशील दृक-श्राव्य नाट्याविष्कार होत. या सर्व लोकरंजनाच्या प्रकारांमध्ये 'दंडार' हा मुख्य कलाप्रकार आहे. झाडीपट्टी रंगभूमीवरील नाट्य आणि संगीताची मुळे या परिसरातील पारंपरिक 'दंडार' या लोककलेत खोलवर रुजलेली आहेत.म्हणजे झाडीपट्टी रंगभूमीचे मूळ दंडार लोकनाट्यात आहे असे दिसून येते.

## मराठी रंगभूमी:

मराठी रंगभूमीला साडेतीनशे वर्षांची समृद्ध इतिहास आहे. "मराठी रंगभूमीची खरी सुरुवात ही तंजावरी नाटकांपासून ( १६७६ ) झालेली आहे" १.सुमारे दोन हजार वर्षांच्या भारतीय रंगभूमीला महाराष्ट्रातील मराठी रंगभूमीनेही महत्त्वाचे योगदान दिले आहे. साहित्य आणि कलेचा थोर वारसा असलेल्या महाराष्ट्रातील मराठी माणूस हा नाट्यवेडा आहे. नाटक ही त्याच्या मर्मबंधातील ठेव आहे.

## वैदर्भीय रंगभूमी:

पश्चिम महाराष्ट्रातील पुण्या-मुंबईप्रमाणेच वैदर्भीय माणूसही नाटकाचा दर्दी रसिक आहे. साहित्याच्या गौरवशाली परंपरेप्रमाणेच विदर्भालाही रंगभूमीची उज्ज्वल अशी परंपरा आहे. या वैदर्भीय रंगभूमीचे अभ्यासाच्या सोयीसाठी व-हाडची रंगभूमी , नागपूरची रंगभूमी आणि झाडीपट्टीची रंगभूमी असे तीन भागात विभाजन केले जाते. व-हाडात १९२७ पासूनच बालगंधर्वांनी दौरे काढून येथील नाट्यरसिकांच्या बळावर आपले संपूर्ण कर्ज फेडले, असे म्हणतात. नागपूर या उपराजधानीच्या शहरातील रंगभूमीचा इतिहास तर व-हाडच्याही पूर्वीचा आहे. संगीत नाटकाचा प्राण असलेली संवादिनी नागपुरात १८८६ मध्येच आली.

## झाडीपट्टीची रंगभूमी:

पश्चिम विदर्भाला जशी रंगभूमीची समृद्ध परंपरा आहे. तशीच ती पूर्व विदर्भातील झाडीपट्टीलाही आहे. प्राचीन काळापासून झाडीपट्टीतील माणूस नाट्यकला, संगीत आणि नृत्यकलेचा भोक्ता आहे. संगीत नाटक हे तर झाडीपट्टीतील माणसांच्या रक्तात भिनले आहे. झाडीपट्टीची रंगभूमी आजपर्यंत पश्चिम

महाराष्ट्राला अपरिचित होती; पण तिचे उपेक्षितपण आता संपले आहे. झाडीपट्टी रंगभूमीचे नाव आता सर्वत्र दुमदुमू लागले आहे. आपल्या वेगळ्या वैशिष्ट्यामुळे झाडीपट्टी रंगभूमी अनेकांच्या आस्थेचा आणि अभ्यासाचा विषय झाली आहे. "महाराष्ट्रात सर्वत्रच रंगभूमीचे प्रेम आहे ; पण झाडीपट्टीतील वेहिशेबी संगीत नाट्यवेडाला सीमा नाही,"[२] हा विद्याधर गोखले यांचा ३० वर्षांपूर्वीचा हा अभिप्राय झाडीपट्टी रंगभूमीचे महत्त्व अधोरेखित करतो.

**झाडीपट्टीचे आकर्षण जगभरात:**

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात या रंगभूमीचे वेगळेपण नजरेत भरेल असे आहे. अलिकडेच झाडीपट्टी रंगभूमीवरील प्रसिद्ध अभिनेते परशुराम खुणे यांचा राष्ट्रीय पातळीवर पद्म पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या रंगभूमीचे हे आकर्षण आता देशाच्या सीमा ओलांडत आहे ; कारण चित्रपटाचा पडदा हा जगभराचा प्रवास करत असतो. तृषार्त इंगळे नावाच्या दिग्दर्शकाने ' झॉलीवूड ' हा झाडीपट्टी रंगभूमीवर आधारित पहिला चित्रपट निर्माण केला. त्याची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली. या चित्रपटाला फ्रान्समधील इंडियन फेस्टिवल ऑफ तौलोसमध्ये विशेष ज्युरी अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. मागे प्राचार्य सदानंद बोरकर यांच्या 'आत्महत्या ' या झाडीपट्टी रंगभूमीवरील नाटकाची सार्क इंटरनॅशनल थिएटर महोत्सवासाठी भारताकडून निवड झाली होती. या रंगभूमीवर आधारित 'झॉलीवूड' या चित्रपटाला नुकताच उत्कृष्ट दिग्दर्शकाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. या पुरस्कारामुळे झाडीपट्टी रंगभूमीला नवी झळाळी मिळाली.

**झाडीपट्टीची हाऊसफूल रंगभूमी:**

एकीकडे आपण ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चित्र फार आशादायी नाही, असे म्हणतो ; आणि इकडे झाडीपट्टीच्या ग्रामीण रंगभूमीवर फक्त चार जिल्ह्यांमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. ही फार लक्षवेधक आणि आश्चर्यकारक गोष्ट आहे; आणि हे फार पूर्वीपासून सुरू आहे. डॉ. हरिश्चंद्र बोरकर म्हणतात ," सन १९३० ते सन् १९६० या कालखंडात मराठी रंगभूमीवर घनदाट अंधार पसरलेला असताना त्याच कालावधीत झाडीपट्टी रंगभूमी मात्र झगमगत्या प्रकाशात रंग देवतेची आराधना करण्यात निमग्न होती." [३] महाराष्ट्रातील रंगभूमीवरचे प्रयोग हाऊसफुल होण्याचे प्रमाण आता खूप कमी झाले आहे. प्रेक्षकांना तिकीट काढून नाटक पहायला अलीकडे आवडत नाही, अशी ओरड तिकडे उर्वरित महाराष्ट्रात होत आहे. दर्दी रसिक सोडला तर नाटकाची क्रेझ समाजातून कमी होत असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर झाडीपट्टी रंगभूमीवर मात्र चमत्कार घडतो आहे. दूरदर्शन आले. दरम्यान काही काळ सी. डी. प्लेअरचा सुळसुळाट झाला होता. आता मोबाईलवर मनोरंजन आले आहे. मध्ये कोरोनासारखी संकटे आलीत ; पण तेथील प्रेक्षकांचे नाट्यवेड मात्र आजही जिवंत आहे.

विशेष म्हणजे रांगेत लागून ऐंशी ते शंभर रुपयाचे तिकीट स्वखुशीने काढून नाटक पहायला येणारा प्रेक्षक हा प्रामुख्याने येथील कष्टकरी व सर्वसाधारण बहुजन समाज आहे ; आणि या रंगभूमीवर काम करणारा कलावंतही तळागाळातला आणि आडवळणी गावातला साधा माणूस आहे. या सामान्य लोकांच्या जीवनप्रवाहात पूर्वापार काळापासून लोकनाट्याची आवड भिनलेली आहे.

**रक्तात भिनलेली नाट्यसंस्कृती :**

झाडीपट्टीतील या पारंपारिक लोककला, विशेषतः दंडार आणि येथील रंगभूमी यांचा महाराष्ट्राला पाहिल्यांदा परिचय करून दिला तो झाडीपट्टीतील प्रसिद्ध चित्रकार धनंजय नाकाडे यांनी. नाटकाचे एक चोखंदळ रसिक , चिकित्सक नाट्य निरीक्षक , वक्ते व पत्रकार म्हणूनही ते प्रसिद्ध होते. ते झाडीपट्टीला नाट्यउन्मादक लोकांचा प्रदेश म्हणतात., "फार पूर्वीपासून नाट्यकला अभिनय , संगीत यांच्याशी या भागातील लोकांचा परिचय झाला आहे" [४] असे निरीक्षण ते नोंदवतात. झाडीपट्टीतील गावागावांत नाट्यवेडी मंडळी विखुरलेली आहेत. दिवाळीत दोन आणि पटात दोन अशी वर्षातून चार तरी नाटके झालीच पाहिजेत असा जणू गावाचा दंडकच असतो. देसाईगंज वडसा या गावाजवळचे कुरूड या छोटेश्या गावी आजही एकाच रात्री आठ-आठ नाटके होतात. गावोगाव नाट्यमंडळे आणि घरोघरी नाट्यवेड. झाडीपट्टी हा कमालीच्या नाट्यवेडाने झपाटलेला प्रदेश आहे. या रंगभूमीने अभिजात नाटके आणि लोकनाट्य यांचा सारख्याच उत्साहाने स्वीकार केला आहे. धनंजय नाकाडे म्हणतात, "बालगंधर्वांच्या नाटकांचा भपकेदारपणाही त्यांच्यात आहे , तर साधेसुधे दंडार नाट्यही त्यांच्यात सामावले आहे" [५] .म्हणूनच या परिसरात नाटकांचे अनेक प्रकार सादर केले जातात. त्यात जशी संगीत नाटके आहेत तशी गद्य नाटकेही आहेत. लावणी प्रधान नाटके तसेच वग नाट्येही आहेत.

या परिसरातील रंगभूमीवर अनेक लोकनाट्य प्रकार आजही साकारले जातात. पारंपरिक दंडार आणि खडीगंमत असे प्रयोगक्षम लोकनाट्याचे प्रकार आजपर्यंत जोमाने सुरू राहिले. राधा हे लोकनाट्य आता होत नाही ; पण दंडार मात्र अजूनही लोकप्रिय आहे.

**प्रत्येक रात्र नाटकाचा उत्सव:**

सबंध पाचसहा महिने झाडीपट्टी नाटकांनी गजबजली असते. त्या दिवसांतील प्रत्येक रात्र म्हणजे त्या गावातला एक नाट्योत्सव असतो. या पाच सहा महिन्यांच्या काळातील हा नाटकांचा हंगाम हे या परिसराची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक ओळख आहे. दिवाळी संपली की गावागावांतील नाट्यप्रेमी माणसे एकत्र येऊन यावर्षी कोणते नाटक करायचे याचे मनसुबे रचतात. ही गोष्ट त्या त्या गावात परंपरेने चालत आलेली आहे. येथील नाट्यसंस्कृतीचा तो एक भाग आहे. नाटकासंबंधी विचार करणारी ही मंडळी नाट्यप्रेमी प्रेक्षक असतात तसेच त्यापैकी अनेकजण नाटकाची चांगली जाण असणारे दर्दी रसिकही असतात. काही अंगात जन्मजात नाट्यगुण असणारे अभिनेते असतात तसेच काही संघटनगुण असणारे नाट्यनिर्मातेही असतात.

**शतकानुशतकांचे रंगभूमी प्रेम :**

ही सर्व मंडळी सतत नाटकासंदर्भात बोलतात. त्यांचातील मैत्रीचा दुवाही नाटक असते. तेव्हा हे नाट्यवेड केवळ शंभर दीडशे वर्षांच्या रंगभूमी परंपरेशी जोडले जाऊ शकत नाही तर ते शतकानुशतकांचे आहे हे लक्षात येते. नाटक ही संपूर्ण झाडीपट्टीच्या अंगवळणी पडलेली पिढीजात कला आहे. अभिनय आणि संगीत या लोकांच्या जणू रक्तातच आहे. संगीत नाटकांच्या काळात तालसूर माहीत नसूनही नाट्यप्रेमी मंडळी धुंदीत नाट्यगीते गात असायची. संगीत, दिग्दर्शक, पेटीवादक, तबला वादक , अभिनय , गायन करणारे , पेन्टर, पडदे ओढणारे अशी मंडळी स्वतःचा सहजधर्म म्हणून आवड आणि कौशल्याने ती कामे आजही स्वीकारतात.

आजपर्यंत झाडीपट्टीतील कलावंतांनी नाट्यलेखन सोडून रंगभूमीचे इतर सर्व घटक कुशलतेने हाताळले होते. अलिकडे विविध विषयांवर नाटके लिहिणारी लेखकमंडळी तयार झाली आहेत.

दिवाळीनंतर थंडी वाढत जाते. त्याच काळात इथे नाटकांचा हंगाम सुरू होतो. ऑक्टोबर ते मार्च दरम्यान नाटकाची तारीख निश्चित झाली की नाटकाची जागा ठरवली जाते. खुल्या जागेत थियटर उभारला जातो. शिवाय नाटकासोबत त्याच रात्री दंडार आणि अलीकडे नव्याने सुरू झालेला डान्स हंगामा असतो. झाडीपट्टीतील नाटके बंद सभागृहात न होता मंडप घालून रंगमंच तयार करून त्यावर पडदे लावून तयार केलेले अस्थायी सभागृह हे या नाट्यरंगभूमी चे फार मोठे वैशिष्ट्ये आहे. पूर्वी हे थेयटर उभारणीचे साहित्य जंगलातून आणावे लागत असे. अनेक गावात परंपरागत आणि कायमस्वरूपी चांगला स्टेज तयार असतो आणि थियटर खूर्च्या ठेवण्यासाठी समोर खड्डा असतो.त्याच मातीचा स्टेज तयार केला जातो. स्टेज समोर पेटी मास्तर तब्बलजी आणि व्हायोलीन वादक असतो.

**नाटकाचा संबंध लोकरंगभूमीशी:**

नाटकाच्या या खुल्या रंगमंचाचा थेट संबंध येथील लोकरंगभूमीशी आपण जोडू शकतो. प्रारंभीच्या काळात नाटके टेंभ्याच्या प्रकाशात दाखवली जात. पुढे गॅस बत्ती आली. त्यांच्यावर रंगीत कागद लावून रंग बदलले जायचे मग काही श्रीमंत मंडळे जनरेटर लावू लागले. साठनंतर गावांमध्ये वीज आली. प्रकाशाची व्यवस्था झाल्याने आता डिमर, लाईट स्ट्रोक असे प्रकाराने रंगभूमी रंगीत झाली. तेव्हा शेवटच्या प्रेक्षकांपर्यंत आवाज पोचण्याची समस्या होती. तेव्हा पौराणिक संगीत नाटके अधिक प्रमाणात होत असत. त्यातील संवाद मोठ्या आवाजात सादर केले जात. आता ध्वनिव्यवस्था आजही हा दणदणीत आवाज मात्र कायम आहे. पूर्वी रंगभूषेसाठी पेंटर असायचा. तो चेहरे रंगवायचा. त्यात आता आमूलाग्र बदल झाला. आता पेंटर दिसत नाही. प्रत्येक जण स्वतःचे मेकप बॉक्स ठेवू लागला. काळानुसार हे सर्व बदल झाले. आता तर समाजात जागतिकीकरणानंतरचे परिणाम दिसू लागले आहेत पण झाडी रंगभूमीचा मूळ गाभा मात्र अगदी जसा होता तसाच आहे. नाट्यरसिक जनहो ! अशी सुरुवात करत अमुक अमुक नाट्यमंडळ सहर्ष सादर करीत आहे , अशी अनाउन्समेन्ट लाउडस्पीकरवर सायंकाळी सुरू झाली की संपूर्ण गावाच्या अंगात नाटक येते आणि रात्री सारा गाव नाटक बघायला रंगमंचापुढे तल्लीन होऊन बसतो. झाडीपट्टीचे हे नाट्यप्रेम आणि ही रंगभूमी पारंपरिक लोकनाट्यकलेतून उगम पावली आहे.

**दंडारीतून झाडीपट्टी रंगभूमीचा उदय :**

लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या झाडीपट्टीतील लोकनाट्यांना अनेक शतकांची परंपरा आहे. झाडीपट्टी रंगभूमीची पाळेमुळे या दंडारीत रुजलेली आहेत. समूहाद्वारे अभिनित होणारे 'दंडार' हे समृद्ध लोकनाट्य तर बाराव्या शतकापूर्वीचे आहे. "बाराव्या शतकाच्या पूर्वीच झाडीपट्टीत सुरु झालेल्या ' दंडार ' या लोकनाट्य प्रवाहाने नावीन्याच्या हौसेने सतत बदलत जाऊन आधुनिक काळात विकसनशील नाट्यरूप धारण केले आहे"६, असे डॉ. राजन जयस्वाल नमूद करतात.

'झाडीपट्टीतील दंडारी ह्या संगीत, नाट्य आणि अभिनय संप्रदाय अभिप्रेत असलेल्या अनेकविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण समृद्ध अशा आहेत'७, असे सांगून दंडार ही प्राचीन ग्रामीण रंगभूमी होय, असे धनंजय नाकाडे यांच्या झाडीपट्टीची रंगभूमी या ग्रंथात नमूद करतात. "दंडार हेच झाडीपट्टीतील आद्य सर्जनशील दृक-

श्राव्य नाट्य होय. तथाकथित आधुनिक मराठी नाटकांची पाळेमुळे आपल्या दंडारीत आहेत."८, असा निष्कर्ष झाडीबोलीचे आणि झाडीलोककलेचे अभासक व संशोधक डॉ. हरिश्चंद्र बोरकरही काढतात. दंडारीला व्यवस्थित नेपथ्य आणि वेशभूषा आवश्यक असायची. प्रत्येक दंडार मंडळाकडे स्वतःचे तीन पडदे , बाजूच्या पट्ट्या आणि बागे , झोटे, तलवारी , बाण , मुकुट इत्यादी साहित्य तयार असायचे. याच साधनसामुग्रीवर येथील झाडीपट्टी रंगभूमीचे आजचे नाटक उभे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जागतिक रंगभूमी असो की भारतीय रंगभूमी. त्या रंगभूमीची मुळे परंपरागत आदिम लोकरंगभूमीतच रुजलेली आहेत. दंडारीतील नाट्याने विसाव्या शतकापर्यंत आपला चेहरा-मोहरा बदलण्यास सुरुवात केली ; आणि त्यातून झाडीपट्टी रंगभूमी विकसित झाली.

झाडीपट्टी रंगभूमीचा हा इतिहास चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगावपासून सुरु होतो ; नवरगावला नाटकाची पंढरी म्हटले जाते. तेथील बालाजी पाटील बोरकर यांनी १९०९ मध्ये वयाच्या आठव्या वर्षी नट म्हणून झाडीपट्टी रंगभूमीवर पाऊल ठेवले, अशी नोंद आहे. त्यापूर्वीच या परिसरात नाटके सुरु झाली. या गावात १४० वर्षापूर्वी श्री. व्यंकटेश नाट्य मंडळाची स्थापना झाली. झाडीपट्टीत पाहिले नाटक १८८७ मध्ये झाले असावे, असे सांगण्यात येते. सांगलीकर नाटक कंपनीचे नाटक नागपूला आले. ते नवरगावच्या जोशीबंधू या दंडारकर्मींनी पाहिल्यावर तेथील दंडारीच्या रंगमंचावर सांगलीकरांसारखे नाटक करण्यात आले. पुढे झाडीपट्टी रंगभूमीवर अशी संगीत नाटके सादर होऊ लागली.

झाडीबोली चळवळीचा उदय झाल्यानंतर डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी या लुप्त होऊ पाहणाऱ्या दंडारींचे पुनरुज्जीवन केले. त्यासाठी ते गावोगाव भटकले. रेंगेपार या स्वतःच्या जन्मगावी दंडारीला नव्या स्वरूपात सादर करणे सुरू केले. आणि त्यांच्या काकांनी स्थापन केलेल्या श्री. गुरुदेव दंडार मंडळाचा वारसा त्यांनी पुढे नेला. पुढे ती दंडार झाडीपट्टीची दंडार म्हणून विविध मंचावर सादर करण्यात आली. मान्यता पावली. त्यांना दंडरीचे गुरू म्हणून मान्यता मिळाली आहे.

**झाडीपट्टीतील लोकप्रिय दंडार :**

लोककला समूहाच्या सहभागातून निर्माण होते. दंडार सुद्धा समूहाद्वारे अभिनित होणारे लोकनाट्य आहे. ते नृत्य आणि गायनाच्या माध्यमातून आविष्कृत होते. दंडार आणि दंड या दोन शब्दांतील साधर्म्य लक्ष वेधून घेते. दंड या शब्दाचे शासन, काठी , हाताचा दंड हा अवयव. अनेक अर्थ आहेत. झाडीबोलीत दंड म्हणजे शेत. दंडार हे झाडीपट्टीतील मनोरंजनाचे महत्त्वाचे व परंपरागत आणि मुख्य साधन आहे. दंडार हा लोकरंगभूमीवरील तमाशा सारखाच नृत्य आणि अभिनय या दोन्हींचा समावेश असलेला एक कलाप्रकार असून डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी दंडार या शब्दाची उत्पत्ती झाडीबोलीत शोधली ती उचित वाटते. त्यांच्या मते "दन् + डार. झाडीबोलीत डार म्हणजे डहाळी किंवा फांदी. डहाळी हातात घेऊन व एकावर एक आदळून केलेले नृत्य म्हणजे दंडार '९. हातातील त्या डहाळीला 'टाहारा ' म्हणतात. मुळात दंडार हा गोंडी शब्द असून ते गोंडांचेही पारंपरिक नृत्य आहे. लोकसंस्कृतीचे अंग असलेली हा अतिशय प्राचीन असा लोकनाट्य प्रकार आहे.

'डायोनिस' या देवतेच्या उपासनाविधीशी ग्रीक नाट्याचा उगम जसा निगडित आहे. त्या ग्रीक रंगभूमीप्रमाणेच 'दंडार' हा सुद्धा झाडीपट्टीतील पुरातन रंगमंचीय नाट्यप्रकार होय. ग्रीकमध्ये देवतांच्या सन्मानार्थ सादर केलेल्या उत्सवात नाटक सादर केले जात असे. दंडारीचे कथानकही बहुतांशी धार्मिक आणि नैतिक स्वरूपाचे असते. झाडीपट्टीमध्ये ऐन दिवाळीच्या उत्सवात मंडईमध्ये 'दंडार' सादर केली जाते.

दिवाळीत बलिप्रतिपदेच्या सायंकाळी टहाऱ्याच्या पूजन करून दंडारीचा मोसम सुरु होतो.

भडकी दंडार आणि परसंगी (प्रसंगी ) दंडार असे दंडारीचे प्रमुख दोन प्रकार आहेत. भडकी दंडार हा एक आदिवासी नृत्य प्रकार आहे. त्यात स्त्री आणि पुरुष स्वयंस्फूर्तीने डफरा व तिरड्यांच्या तालावर समूहनृत्य करतात. यात पूर्वी स्त्रियांच्या ठिकाणी गोंडस आणि देखणी मुले निवडली असत. रंगमंचावर ती सादर करायला मागे एक पडदा पुरेसा असे. चेहऱ्याच्या मेकअपसाठी पोमेडमध्ये पिवळा रंग, गेरु , काजळ घोटून रंग तयार केले जात. शाब्दिक विनोद आणि अंगविक्षेप केला जातो.

परसंगीमध्ये गोपगोपींचे सामूहिक नृत्य असते. त्यात टहाऱ्याच्या सहाय्याने नृत्यमय लावणी किंवा झडती गायली जाते आणि सोंग काढले जाते. यात प्रमुख गायक सूत्रधार असतो. टाळ, ढोलक, तुणतुणे इत्यादी परंपरागत वाद्य असतात.यातील नृत्य फार वेगवान असते. सोबत लिखित साहित्य असते. एक नर्तक आपला टाहरा दुसऱ्याच्या टाहऱ्यावर आदळून नृत्याचा फेर घेतो.

दंडारीचे कोकणातील दशावतारी नृत्याशी, कर्नाटकातील यक्षगानाशी, गुजरातीतील गरब्याशी साम्य असून त्यातला आवेश हा पंजाबी भांगड्याचा असतो. अशा प्रकारचा संस्कृतीसंगम दंडारीत आला असल्याचे सांगत डॉ. बोरकर दंडारीचा संदर्भ दंडी नावाच्या संस्कृत कवीशीही जोडून पाहतात. हिंदीत दंडारीला नौटंकी म्हणतात. आपटे यांच्या शब्दरत्नाकर मध्ये दंडरचा अर्थ लळीत असा दिला आहे , तर भाऊ मांडवकर यांनी आपल्या कोलाम या ग्रंथात दंडार म्हणजे दंडधारी टिपऱ्यांचा खेळ असे स्पष्ट केले आहे.

बैठी आणि खडी असेही सादरीकरणाचे दोन प्रकार असून बैठीमध्ये बैठकीत बसून दंडार सादर केली जाते. गायक, शाहीर , ढोलक्या , तुणतुणेवाला , झांजवाला व इतर साथीदार मिळून पोवाडे व चौक गायले जातात. झाडीपट्टीत दंडार उदयाला आली तेव्हा त्यात सधन लोकांचा विशेषतः कोहळी समाजाचा सहभाग होता. कोहळी समाज हा दंडारीचा आजही प्रमुख आधारस्तंभ आहे. त्यांच्या अंगी पिढीजात अभिनय व गायन वादनाचे गुण आहेत. आजही दिवाळीत मंडईमध्ये प्रत्येक गावात किमान दोन दंडारी सादर होतात. निरीक्षणानुसार आजही झाडीपट्टीत वर्षभरात सुमारे सहा हजार दंडारीचे प्रयोग होतात. नाटक आणि तिचे मूळ असणारी दंडार यांनी आजही या रंगभूमीवर आपले स्थान सारखेच टिकवून ठेवले आहे.

## निष्कर्ष:

१. वैदर्भीय रंगभूमीचे अभ्यासाच्या सोयीसाठी वऱ्हाडची रंगभूमी , नागपूरची रंगभूमी आणि झाडीपट्टीची रंगभूमी असे तीन भागात विभाजन केले जाते. यातील झाडीपट्टी रंगभूमीला शंभर वर्षांची समृद्ध परंपरा आहे.

२. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात या रंगभूमीचे वेगळेपण नजरेत भरेल असे आहे. झाडीपट्टी रंगभूमीचे हे आकर्षण आता जगभरात पोचत आहे.

३. लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या झाडीपट्टीतील लोककलाळ्यांना अनेक शतकांची परंपरा आहे. समूहाद्वारे अभिनित होणारे दंडार हे समृद्ध लोककला तर बाराव्या शतकापूर्वीचे आहे.

४. झाडीपट्टीचे हे नाट्यप्रेम आणि ही रंगभूमी पारंपरिक लोककलेच्या कवेतून उभारी पावली आहे. येथील कष्टकरी व सर्वसाधारण बहुजन समाज आहे ; आणि या रंगभूमीवर काम करणारा कलावंतही

तळागाळातला आणि आडवळणी गावातला साधा माणूस आहे. या सामान्य लोकांच्या जीवनप्रवाहात पूर्वापार काळापासून लोकनाट्याची अभिरूची भिनलेली आहे.

५. नाट्यसंगीत हे झाडीपट्टी रंगभूमीचे एक वैशिष्ट्य आहे. झाडीपट्टी रंगभूमीवरील नाट्य आणि संगीताची मुळे येथील पारंपरिक लोककला असलेल्या दंडारीत रुजलेली आहेत असे लक्षात येते.

६. झाडीपट्टीतील नाटके बंद सभागृहात न होता मंडप घालून रंगमंच तयार करून त्यावर पडदे लावून तयार केलेले अस्थायी सभागृह हे या नाट्यरंगभूमी चे फार मोठे वैशिष्ट्ये आहे. नाटकाच्या या खुल्या रंगमंचाचा थेट संबंध येथील लोकरंगभूमीशी आपण जोडू शकतो. पूर्वापार चालत आलेल्या खुल्या मैदानात सादर होणाऱ्या दंडारीचा संबंध येथील रंगभूमीशी आहे.

७. 'दंडार' हा झाडीपट्टीतील आद्य सर्जनशील दृक-श्राव्य नाट्यप्रकार होय. झाडीपट्टी रंगभूमीवर प्राचीन काळापासून सुरू असलेल्या दंडारीतूनच पुढे 'झाडीपट्टी रंगभूमी' उदयास आली.

**संदर्भ:**

१. पावडे (डॉ.) सतीश, मराठी रंगभूमी : चर्चा आणि चिंतन, नभ प्रकाशन, २०२१ प्रस्तावना , पृ.१३
२. नाकाडे धनंजय, झाडीपट्टीची रंगभूमी, (प्रकाशक नमूद नाही) १९९२ प्रस्तावना
३. बोरकर (डॉ.) हरिश्चन्द्र (संपा.)झाडीपट्टी रंगभूमी, आकलन आणि आस्वाद राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, २०१७,पृ.२२
४. नाकाडे धनंजय, झाडीपट्टीची रंगभूमी , (प्रकाशक नमूद नाही)१९९२ पृ.१८
५. तत्रैव, पृ. १८८
६. जयस्वाल (डॉ.) राजन : झाडीपट्टी रंगभूमी, आकलन आणि आस्वाद, राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, १७ पृ.५२
७. नाकाडे धनंजय, झाडीपट्टीची रंगभूमी , (प्रकाशक नमूद नाही) १९९२ पृ.१७६
८. बोरकर (डॉ.) हरिश्चन्द्र, (संपा.) झाडीपट्टी रंगभूमी, आकलन आणि आस्वाद राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, १९१७,पृ.२२
९. बोरकर (डॉ.) हरिश्चन्द्र, झाडीपट्टीची लोकरंगभूमी, तारा प्रकाशन, साकोली २००४, पृ.१४३